




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार १८ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०










# अकोला पोलिसांतर्फे सीसीटीव्ही, त्रिनेत्र व रक्षा प्रकल्पाचा शुभारंभ

## अभिनव उपक्रम महाराष्ट्राला पथदर्शी- पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचे प्रतिपादन

**अकोला/प्रतिनिधीः-** अकोला जिल्हा पोलीस दलाचे कमांड अँड कंट्रोल कक्ष, त्रिनेत्र प्रकल्प व रक्षा प्रकल्प हे अभिनव उपक्रम महाराष्ट्राला पथदर्शी ठरतील, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी बुधवारी लोकार्पण प्रसंगी केले.पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक कार्यालयातील कमांड कंट्रोल कक्षाचा, तसेच प्रोजेक्ट रक्षा व त्रिनेत्र प्रकल्पाचा शुभारंभ झाला. जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक सी. के. रेड्डी, माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ किशन पनपलिया, मनीष करंदीकर, स्थानिक गुन्हे शाखाप्रमुख शंकर शेळके व अनेक पोलीस अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड.फुंडकर म्हणाले की, सीसीटीव्हीची यंत्रणा अद्ययावत असल्यामुळे प्रत्येक स्थळाची सुस्पष्ट प्रतिमा मिळून कक्षातून शहरातील सार्वजनिक



गणेश विसर्जनाच्या दिवशी शहरात घडलेल्या अत्याचाराच्या गुन्ह्याच्या संदर्भात ५००० किमीचा प्रवास करून आरोपीच्या मुसक्या आवळणाऱ्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे पोलिस निरीक्षक शंकर शेळके आणि अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव पालकमंत्री ना. आकाश फुंडकर यांच्या हस्ते करण्यात आला.

ठिकाणांचे संनियंत्रण शक्य होणार आहे. यामुळे गुन्हेगारांचा शोध घेणे आणखीन सोयीस्कर होणार असून निश्चितच गुन्हे शोधाचा आलेख वाढणार आहे. तर रक्षा प्रकल्पामुळे पोलीस ठाण्याचा परफॉर्मन्स वाढेल. पोलिसांची कार्यप्रणाली आणखीन पारदर्शी होणार आहे.


त्रिनेत्र प्रकल्पामुळे सवयीच्या गुन्हेगारांचा डेटा तयार होऊन गुन्हेगारी प्रवृत्तीचा बीमोड करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे, गुन्हेगारी सोडून चांगल्या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या गुन्हेगारांचे पुनर्वसन करणे यामुळे शक्य होईल. हा प्रकल्प पथदर्शी आहे. तो संपूर्ण राज्यात राबविण्यासाठी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री ना. फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. यावेळी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी प्रकल्पांची सखोल माहिती दिली.

जिल्हा पोलिसांतर्फे शहरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, अधीक्षक कार्यालयातील कमांड कंट्रोल कक्षातून आवश्यक संनियंत्रण करण्यात येणार आहे.

**रक्षा प्रकल्प-** प्रत्येक पोलिस ठाण्यात येथील कर्मचाऱ्यांचे काम नागरिककेंद्री पद्धतीने चालावे, यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्याला 'क्यूआर' कोड देण्यात आला आहे. त्याआधारे ठाण्यात येणारे अर्जदार, नागरिक यांना कर्मचाऱ्याच्या वर्तणुकीबाबत तक्रार असेल किंवा अडचणीचे निराकरण झाले नसेल तर त्यांना नोंद करता येणार आहे. तसा फॉर्म याप्रणाली द्वारे भरता येईल. अर्जदाराच्या नावाची गोपनीयता ही राखली जाणार आहे. हे विशेष!

**त्रिनेत्र प्रकल्प-** त्रिनेत्र प्रकल्पात वारंवार गुन्हे करणारे किंवा दोन किंवा दोनपेक्षा जास्त गुन्हे नोंद असलेल्या सवयीच्या गुन्हेगारांची एफआयआर, बाँड आदी माहिती एकत्र करून अद्ययावत तंत्रज्ञानाद्वारे त्यावर प्रकिया केली जाईल. त्यामुळे सवयींचा गुन्हेगारांचा मागोवा ठेवता येणे शक्य होणार आहे व भविष्यात घडणारे गुन्हेही रोखता येतील. यांसह जिल्ह्यातील गुन्हेगारांचा गुन्ह्याच्या वर्गीकरणानुसार १० वर्ष जुने गुन्हेगारी रेकॉर्ड सुद्धा मेन्टेन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# महिलांसाठी 'सशक्त' अभियान




१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत देशभरात राबविण्यात येणाऱ्या 'स्वस्थनारी, सशक्त परिवार'या अभियानाच्या माध्यमातून महिलांना निरोगी, सशक्त आणि आत्मनिर्भर करण्याचा निर्धार केला आहे. या अभियानाविषयी ही माहिती.

महिलांना त्यांच्या घराजवळ आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे तसेच त्यांना अधिक निरोगी, सशक्त आणि आत्मनिर्भर बनवणे या उद्देशाने देशभरात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे अभियान राबविण्यात येत आहे.

महिलांचे आरोग्य व सक्षमीकरण हे कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. याच उद्देशाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत 'स्वस्थनारी, सशक्तपरिवार' हे विशेष राष्ट्रीय अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे. या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ १७ सप्टेंबर रोजी इंदौर, मध्यप्रदेश येथे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते झाला असून या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण देशभरात सर्वत्र करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्रातील शुभारंभ सोहळा १७ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यभर झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मान्यवर या सोहळ्यास बीड येथून ऑनलाईनही सहभागी झाले आहेत.

**अनिल आलुरकर**
**उपसंचालक(माहिती)**
**विभागीयमाहितीकार्यालय, अमरावती**

**अभियानाची उद्दिष्टे-**

या अभियानाचा मुख्य उद्देश देशभरातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये महिला आणि मुलांसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिरांचे आयोजन आयुष्यमान आरोग्य मंदिरांमध्ये दररोज तपासणी आणि जनजागृती शिबिरांचे आयोजन ग्रामीण रुग्णालये/ उपजिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे येथे विशेषज्ञाव्दारे तपासणी शिबिरांचे आयोजन खासगी महात्मा फुले जनआरोग्य योजना संलग्नीत रुग्णालये व क्लिनिक येथे देखील विशेषज्ञ आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

या शिबिरांमध्ये विविध आरोग्य सेवा पुरवल्या जातील, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे:

**महिलांची आरोग्य तपासणीः-**

उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठी तपासणी करणे. तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी करणे. जोखीम असलेल्या महिलांसाठी क्षयरोग तपासणी किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी ॲनिमिया (रक्तक्षय) तपासणी आणि समुपदेशन. आदिवासी भागातील महिलांसाठी सिकल सेल तपासणी कार्ड वाटप आणि आदिवासी भागात सिकल सेल आजाराबाबत समुपदेशन.

माता आणि बाल आरोग्य सेवा-

गर्भवती महिलांसाठी प्रसूतिपूर्व काळजी, तपासणी व समुपदेशन, हिमोग्लोबिन तपासणी, तसेच पोषण आणि काळजी यावर समुपदेशन, बालकांचे आवश्यकतेनुसार लसीकरण.

आयुष सेवा-

या अंतर्गत आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी, सिध्द व नॅचरोपॅथी इ. पर्यायी उपचार पध्दतींची सेवा गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

जनजागृती आणि वर्तणूक बदल संवाद-

किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळीची स्वच्छता आणि पोषणाविषयी जागृती सत्रे महिला बचत गट आणि पंचायत प्रतिनिधींच्या माध्यमातून खाद्यतेल आणि साखरेचा वापर कमी करण्यावर समुपदेशन. पोषण विषयी समुपदेशन व निरोगी राहण्यासाठी मार्गदर्शन

रक्तदान शिबीरे-

१ ऑक्टोबर हा राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिन असून त्याअनुषंगाने राष्ट्रीय महास्वेच्छा रक्तदान या अभियानात राबविण्यात येईल. इंडियन रेड क्रॉस सोसायटी, अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषद इ. संस्थांच्या साहायाने १ लाख युनिट रक्त गोळा करण्याचे ध्येय असून, रक्तदात्यांची नोंदणी करण्याचेही प्रस्तावित आहे. My Gov पोर्टलद्वारे रक्तदान प्रतिज्ञा उपलब्ध करुन देण्यात येईल.

नोंदणी आणि कार्ड वाटप -

आयुष्यमान भारत डिजीटल मिशन कार्ड, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत नोंदणी व आयुष्यमान वय वंदना कार्ड वाटप सर्व गरजू व पात्र लाभार्थ्यांना करण्यात येईल.

क्षयरोग निर्मुलनासाठी निक्षय मित्र स्वयंसेवकांची नोंदणी-

क्षयरुग्णांना दत्तक घेऊन त्यांना पोषक आहार उपलब्ध करुन देण्यासाठी आणि क्षयरोगाविरुध्द जन आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी दानशुर व्यक्ती, संस्था आणि संघटनांना निक्षय मित्र बनवून सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. याकरिता माय भारत स्वयंसेवक अथवा इतर स्वयंसेवकाच्या मदतीने निक्षय मित्रांची नोंदणी वाढवण्यात येईल, जेणेकरुन क्षयरोग मुक्त भारताचे ध्येय साध्य करणे शक्य होईल. तपासणी शिबीरामध्ये (स्क्रिनिंग कॅम्प) आवश्यक असणाऱ्या रुग्णांना विशेषज्ञाकडून तपासणीसाठी संदर्भित केले जाईल व त्यांच्या आवश्यक त्या रक्त, लघवीच्या तपासण्या, सोनोग्राफी, क्षकिरण तपासणी व शस्त्रक्रिया मोफत व नियोजन करुन करण्यात येत आहेत.

७५ उपक्रमांचे आयोजन-

महाराष्ट्र राज्यात १७ सप्टेंबर २०२५ रोजी ७५ उपक्रमः राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये खालील उपक्रमांचा समावेश राहील.प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये आरोग्य शिबिरे, असंसर्गजन्य रोग तपासणी शिबिरे (मधुमेह, रक्तदाब, कर्करोग, हृदयरोग), मोफत चष्मा वाटपासह नेत्र तपासणी शिबिरे, दंत तपासणी शिबिरे, माता आणि बाल आरोग्य शिबिरे (प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण), महिला आणि बालकांसाठी पोषण जागरूकता सत्रे, ठिकाणी आयुष आणि योग शिबिरे, क्षयरोग जागरूकता आणि तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, अवयवदान प्रतिज्ञा शिबिरे, मोफत औषध वितरण शिबिरे, निदान शिबिरे (पॅथॉलॉजी, एक्स-रे, ईसीजी), कर्करोग जागरूकता आणि तपासणी शिबिरे, मानसिक आरोग्यसमुपदेशन शिबिरे, व्यसनमुक्ती जागरूकता सत्रे, किशोरवयीन आरोग्य सत्रे, शालेय आरोग्य तपासणी शिबिरे, स्वच्छता आणि स्वच्छता जागरूकता शिबिरे, ब्लॉक आणि जिल्हा स्तरावर आरोग्य मेळावे/ प्रदर्शने, दुर्गम भागांसाठी टेलिमेडिसिन सल्लामसलत. या उपक्रमांव्दारे आरोग्य सुविधा मिळणार आहेत.

सहभागी संस्था व केंद्रेः

राज्यातील १०,७६६ उपकेंद्रे १९३९ प्राथमिक आरोग्य केंद्रे ७९७ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे १,०४० शहरी सामुदायिक आरोग्य केंद्रे ३७२ ग्रामीण रुग्णालये, १०२ उपजिल्हा रुग्णालये, ८ सामान्य रुग्णालये, २२ स्त्री रुग्णालये, २ संदर्भ सेवा रुग्णालये व १९ जिल्हा रुग्णालये. राज्यातील सर्व आरोग्य केंद्रे, संस्था, वैद्यकीय महाविद्यालये व खासगी महात्मा फुले जन आरोग्य योजना संलग्न रुग्णालये सर्व खासगी वैद्यकीय व्यावसायिक संघटना यांचा अभियानात सक्रिय सहभाग लाभणार आहे. 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार'या


अभियानाच्या माध्यमातून देशातील, राज्यातील स्त्रीशक्तीला आरोग्यदायी आणि अधिक बळकट करण्याचा निर्धार आहे. आपण सर्वांनी या अभियानात सक्रीय सहभागी व्हावे व महिलांनी लाभ घ्यावा अशी अपेक्षा आहे.

## हृदय रुग्णांच्या सेवेत नवा अध्याय

# श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पीटल मध्ये अत्याधुनिक आयसीयू व विविध सुविधांचे लोकार्पण

अमरावती/प्रतिनिधीः- विदर्भ, मराठवाडा तसेच मध्यप्रदेशातून मोठ्या संख्येने येणाऱ्या हृदयविकारग्रस्त रुग्णांना अधिक प्रभावी, सुरक्षित आणि त्वरित उपचार मिळावेत या उद्देशाने श्री संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय, मार्डी रोड येथे नवीन सुविधा सुरू करण्यात आल्या आहेत. पाचव्या मजल्यावरील अत्याधुनिक ३२-बेडचे आयसीयू, चौथ्या मजल्यावरील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी खोल्या तसेच वैद्यकीय शिक्षणासाठी आवश्यक प्रशिक्षण केंद्र व वाचनालय यांचा लोकार्पण सोहळा परमपूज्य श्री संत सचिनदेव महाराज यांच्या शुभहस्ते १५ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी पाच वाजता संपन्न झाला.

नवीन आयसीयूमध्ये हॅमिल्टन व्हेंटिलेटर्स, अत्याधुनिक इन्फ्युजन पंप्स, आरामदायी फाउलर बेड्स यांसारखी अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. या तंत्रज्ञानामुळे गंभीर हृदयविकाराच्या रुग्णांचे उपचार अधिक सुरक्षित आणि प्रभावी पद्धतीने करता येणार आहेत. या प्रसंगी रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर यांनी सांगितले की, या आधुनिक आयसीयूमुळे रुग्णांच्या उपचार प्रक्रियेत मोठी सुधारणा होणार असून प्रशिक्षित डॉक्टर आणि परिचारिकांच्या संघामुळे जीवनरक्षणाची



संधी अधिक वाढेल.

रुग्णालय शहरापासून काही अंतरावर असल्याने दूरवरून येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी चौथ्या मजल्यावर स्वतंत्र व स्वच्छ खोल्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. मध्यप्रदेश, मराठवाडा तसेच ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांसोबत येणाऱ्या नातेवाईकांना या सुविधेमुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

रुग्णालयात वैद्यकीय संशोधन, शिक्षण आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी प्रशिक्षण केंद्र आणि वाचनालयाची उभारणी करण्यात आली आहे. डॉक्टर, परिचारिका व विद्यार्थ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी आणि सेवा अधिक प्रभावीपणे पुरविण्यात यावी, यासाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे.उद्घाटनावेळी परमपूज्य श्री संत सचिनदेव महाराज म्हणाले, 'येथे येणाऱ्या रुग्णांना केवळ वैद्यकीय उपचारच मिळत नाहीत, तर त्यांना श्री संत अच्युत महाराजांची दवा म्हणजे औषधोपचार आणि दुवा म्हणजे आशीर्वाद व मानसिक आधार देखील मिळतो. हा दवा आणि दुवा हाच या रुग्णालयाचा खरा आधारस्तंभ आहे.'

प्रास्ताविक रुग्णालयाचे सचिव प्रा. सागर पासेबंद यांनी केले, रुग्णालयात दर महिन्याला मोठ्या प्रमाणात अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टी होतात. तसेच दर महिन्याला ९० पेक्षा जास्त हृदय शस्त्रक्रिया ज्यात MICS, CABG, MVR, DVR इत्यादी यशस्वीपणे पार पडत आहेत. त्याच दिवशी इंजिनियर डे चे अवचित्य साधुन हॉस्पिटल मधिल सर्व इंजिनिअरचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुधीर जोशी यांनी केले. याप्रसंगी शुभदाताई पोतदार विश्वस्त राजेंद्र दिगंबर, राजु मुकवाने, लताताई देवते, भोजराज देवते, श्री लेंडे, चर्तुभुज, पांडे, अशोक देवते, ललीत देशमुख, डॉ. मनिष जाधव , डॉ. शिवराज शिंदे , डॉ. विजय लेवटे, डॉ. प्रतिक चोरे, डॉ. नागे , डॉ. बकाल, डॉ. तेली यांच्या सह रुग्णालयाचे सर्व संचालक, ट्रस्ट सदस्य व कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्येष्ठ इतिहास संशोधक गजानन भास्कर मेहेंदळे यांचे निधन

**पुणे/प्रतिनिधीः-** ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि शिवचरित्रकार गजानन भास्कर मेहेंदळे (वय ७८) यांचे आज सायंकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने पुण्यामध्ये निधन झाले. ते अविवाहित होते. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी उद्या (गुरुवार) सकाळी ११ वाजता भारत इतिहास संशोधक मंडळात ठेवण्यात येणार आहे व त्यानंतर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



गेली ५० वर्षे त्यांनी इतिहासाच्या संशोधन कार्याला वाहून घेतले होते. शिवचरित्र आणि युद्ध इतिहासाचे ते गाढे अभ्यासक होते. त्यांनी शिवचरित्रावर मराठी आणि इंग्लिशमध्ये खूप मोठे ग्रंथ लिहिले आहेत, जे आज इतिहास क्षेत्रामध्ये जगप्रसिद्ध आहेत. ते क्रियाशील संशोधक होते. फारसी, मोडी, इंग्लिश, फ्रेंच, जर्मन अशा विविध भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. इतिहासातील सत्य आणि असत्य हे उघड करणं हा त्यांचा आवडता विषय होता. सध्या ते इस्लामची ओळख आणि औरंगजेब या विषयावर संशोधन आणि लिखाण करत होते. १९७१ च्या युद्धात बांगलादेश आणि पाकिस्तान या दोन्ही सीमेवर युद्ध पत्रकार म्हणून स्वतः हजर होते, आणि त्यांचा त्यावरही अभ्यास होता. ते मिलिटरी सायन्सचे द्विपदवीधर होते. त्यांचा अनेक भाषांवर आणि इतिहासातल्या लिप्यांचा अभ्यास होता. त्यांनी शिवाजी झाला नसता तर, टिपू ॲज अ वॉर, शिवाजी लाईफ अँड टाईम, शिवचरित्र, मराठ्यांचे आरमार अशी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांचा भांडारकर संस्था, भारत इतिहास संशोधक मंडळ तसेच विविध संस्थांशी निकटचा संबंध होता. सध्या त्यांचे दुसऱ्या महायुद्धावरच्या पुस्तकाचे काम सुरू होते, ज्याची सुमारे पाच हजार पाने लिहून प्रकाशित होण्यासाठी तयार झालेली आहेत.

# १ व १० वरिल उर्वरित

## संविधानाकरिता लढणाऱ्यांनाच

उमेदवारी टाळा असा सल्ला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कायकर्ता मेळाव्या प्रसंगी दिला.

काँग्रेसभवन येथे बुधवारी कार्यकर्ता मेळावा व पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी व्यासपीठावर खासदार बळवंत, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजीमंत्री यशोमती ठाकुर, माजीमंत्री सुनिल देशमुख, वीरेंद्र जगताप, बबलू शेखावत, राजकुमार पटेल, विलास इंगोले, हरीभाऊ मोहोड, रोहित पटेल, किशोर बोरकर, पंकज मोरे, मिलिंद चिमोटे, भैय्या पवार, प्रविण मनोहर आदींची उपस्थिती होती. शासनावर टिका करीत प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यावेळी म्हणाले, आपली लढाई ही वैयक्तीक नसून संविधान वाचविण्याची लढाई आहे, मानवता टिकवुन आणि आदीवासींना वाचविण्याची लढाई आहे. कारण शासनाकडून आदींवासी बांधवांना वनवासी संबोधित या जमातीला वेगळे ठेवण्याचा डाव रचला आहे. तो डाव आता हाणून पाडायचा असेल तर पुन्हा एक एकसंघ होऊन मतांची लढाई लढावावी लागेल, असे आवाहन हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी केले.सत्तेकरिता लढण्यापेक्षा संविधान वाचविण्याकरिता लढू या, अशाच विचारांना आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारी द्या,जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, शहराध्यक्ष बबलू शेखावत यांच्या नावाचा उल्लेख करीत राज्याचे सर्व अधिकार आपणाला सोपवितो, परंतु जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरालिका आणि महापालिकेवर काँग्रेसचाच झेंडा फडकवा असे आवाहन देखील यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी पदाधिकाऱ्यांना केले. या बैठकीला जिल्हा कार्यकारीणीसह तालुका व शहर पदाधिकारी उपस्थित होते. आरक्षणाच्या नावाखाली देशात व राज्यात समाजा समाजामध्ये वाद निर्माण केले जात आहे.तोडो, फोटो आणि राज करो अशी या सरकारी रणनिती आहे.अशीच परिस्थिती देशात निर्माण करण्यात आली आहे. ख़ऱ्या अर्थाने देशातील सर्वच आरक्षण या सरकारला संपवायचे आहे, असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

काँग्रेसच्या कोणत्याही सक्रिय कार्यकर्त्यावर निवडणुकीमध्ये अन्याय होणार नाही. कारण यावेळी देखील जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि नगरपालिकांवर काँगेसचाच झेंडा कायम ठेवायचा आहे.त्यामुळे प्रत्येकांनी काँग्रेचाच विचार घेवून कामाला लागा. - **बबलू देशमुख,** जिल्हाध्यक्ष,अमरावती

## इर्विन चौकात आढळला

हालचाली वाढत असल्याची चर्चा रंगली आहे.

वनविभागाने नागरिकांना घाबरून जाऊ नये, मात्र काळजीपूर्वक वागण्याचे आवाहन केले आहे. लांडगा पुन्हा दिसल्यास त्वरित विभागाशी संपर्क साधावा, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या अनपेक्षित घटनेने शहरात भीतीसोबतच उत्सुकताही पसरली आहे.

## महिलेचा मोबाईल हॅक,

वॉट्सॲपवर एका अनोळखी क्रमांकावरून ट्रॅफिक व्हायोलेशन नोटीस आली. त्यासोबतच एक एपीके फाईल पाठवली गेली. ही फाईल महिलेने डाउनलोड केल्यानंतर तिचा मोबाईल हॅक झाला. १२ सप्टेंबर रोजी ती खरेदीसाठी गेली असता फोन पे ॲपवर पेमेंट करताना खात्यातील रक्कम अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे तिला दिसले. बँकेत चौकशी केली असता खात्यातून ५७ हजार ४०० रुपये उडाल्याचे स्पष्ट झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने सायबर सेलमध्ये तक्रार दाखल केली. प्राथमिक तपासानंतर गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात मोबाईल धारकाविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

## प्रा.धिरज कल्याणकर यांना

परिषदांमध्ये सादर झाले आहेत. याशिवाय त्यांनी ४ पेटंट्स देखील प्राप्त केले आहेत. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष योगेंद्र गोडे, सचिव तन्वी गोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सागर जिरापुरे, डीन अकॅडेमिक डॉ.हेमंत धनभार, भर्ती अधिकारी प्रा.अभिजित शहाडे, डॉ. अविनाश जाधव, तसेच सर्व विभागाचे विभाग प्रमुख शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रा.कल्याणकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## साक्षगंधानंतर भावी पत्नीवर

विश्वासघात करत तरुणीला घराबाहेर, हॉटेल व लॉजवर नेऊन जबरदस्ती शारीरिक संबंध ठेवले. एका प्रसंगी आरोपी पीडितेच्या घरी डब्बा घेण्यासाठी आला असता, तो तिच्या मोबाईलवर काही पाहत असल्याचे तरुणीने पाहिले. शंका व्यक्त करताच आरोपीने संतापून मोबाईल फोडला आणि घरातून निघून गेला. पीडितेने हा संपूर्ण प्रकार आई-वडिलांना सांगितल्यानंतर त्यांनी आरोपीच्या कुटुंबीयांशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपीने उलट पालकांशी शिवीगाळ केली व जीव घेण्याची धमकी दिली. तरुणीच्या तक्रारीवरून येवदा पोलिसांनी आरोपीविरुद्ध बलात्कार व धमकीसह संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा

उभे असलेले बॅनर शहरात विविध ठिकाणी लावण्यात आले आहे, ते बॅनर अतिशय गलिच्छ कचराकुंडी व मुतारी असलेल्या ठिकाणी लावले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व राजमुद्रेचा जो अपमान करण्यात आला आहे त्यामागे कोणी षडयंत्र रचले व या पद्धतीने छिंदवाडा येथून दोन अज्ञात इसम येऊन MH २८ ZC ७५९२ क्रमांकाची गाडी ने लावत असून या गाडी मालकावर तसेच कंपनीचे मालक व ठेकेदार तसेच यामागे असणारे मास्टर माईंड यांना शोधून त्यांच्या वर रीतसर कारवाई करावी,अशी मागणी करण्यात आली. त्या कंपनी चे लायसन्स रद्द करण्यात यावे असे निवेदन युवतीसेना जिल्हाप्रमुख कोमल बद्रे यांचा नेतृत्वात देण्यात आले. यावेळी सहसंपर्क प्रमुख अमरावती वर्षा भोयर, जिल्हा प्रमुख महिला आघाडी रेखा खारोळे, महानगरप्रमुख संतोष बद्रे, पश्चिम विदर्भ आरोग्य अध्यक्ष सोनाली देशमुख, उपजिल्हा प्रमुख सारिका जयस्वाल, संगीता मडावी, शहर प्रमुख अजय महले, मधुकर शिंदे, राजेश पाठक, तुलाराम चांदेकर, सुरज बर्डे, अमन मडावी आदी उपस्थित होते.

## बनावट जन्म प्रमाणपत्र प्रकरणः

रहिवासी असून, त्यांच्या कागदपत्रांत फक्त किरकोळ चुका होत्या. 'फक्त नावातील फरक किंवा साध्या स्पेलिंगच्या चुकांवरून गुन्हा नोंदवणे अन्यायकारक आहे,' असे त्यांनी सांगितले. या कारवाईविरोधात ते उच्च न्यायालयात अपील करणार असल्याचेही त्यांनी सांगीतले. दरम्यान या आरोपांना पोलिसांनी फेटाळून लावले आहे. 'संपूर्ण तपास तहसील कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अधिकृत तक्रारी व पुराव्यांवरच आधारित आहे. कोणत्याही राजकीय दबावाखाली कारवाई करण्यात आलेली नाही,' असे पोलिस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणासंबंधी आधीच दाखल असलेली याचिका उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. तिची पुढील सुनावणी २३ सप्टेंबर रोजी होणार असून, त्याआधीच पोलिसांनी १५ सप्टेंबरला चार्जशीट दाखल केली आहे. त्यामुळे आता पुढचा निर्णय न्यायालयाच्या हातात आहे.

## मालवाहू वाहनाच्या धडकेत

सायंकाळी ड्युटी संपवून त्या सुझुकी ॲक्सेस दुचाकीवर (एमएच २७ सीटी ०७९७) घरी परतत होत्या. साडे सहाच्या सुमारास राधाकृष्ण रेसिडेन्सीसमोर पोहोचताच समोरून भरधाव वेगात व निष्काळजीपणे येणाऱ्या टाटा मालवाहू वाहनाने (एमएच ०४ एचएस १२४३) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत बबीता यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली व त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन इर्विन रुग्णालयातील शवगृहात हलविण्यात आला. दरम्यान, गडगडेश्वर पोलीस ठाण्यात मालवाहू वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## घडा सावंगा गावात ढगफुटी,

देण्यात आला आहे. हातचे आलेले पीक नष्ट झाल्यामुळे व जनावरांसह घरांचं नुकसान झाल्यामुळे शेतकरी व नागरिकांनी प्रशासनाकडे मदतीची मागणी केली आहे. उल्लेखनीय म्हणजे दर्यापूर येथील तहसीलदार व प्रशासनाने नुकसान झालेल्या भागाचा आढावा घेतला असून उद्या प्रशासनातील अधिकारी नुकसान झालेल्या भागाची पाहणी करणार आहे. सततची नापिकी आणि त्यातच ढगफुटी या दुहेरी संकटामुळे शेतकऱ्यांना सर्वस्व गमावण्याची वेळ आली आहे. कशीबशी तडजोड करून शेतकऱ्यांनी यावर्षी आपले पीक उभे केले परंतु अस्मानी संकट ढगफुटी रूपाने शेतकऱ्याच्या माणगुटीवर बसले आणि परिसरातील शेतकरी पूर्णतः हकबल झाला. परिसरात झालेल्या नुकसानाची भरपाई सरकारने द्यावी अशी विनंती घडासावंगा गावातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## खून प्रकरणात १७ वर्षांपासून

न्यायालयीन प्रक्रियेत तो निर्दोष सुटला असला तरी, हा निर्णय आव्हान म्हणून सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे २०१२ साली क्रिमिनल अपील क्रमांक १०२१/२०१२ दाखल करण्यात आले. अपील प्रलंबित असतानाही खंडाते न्यायालयात अनुपस्थित राहिला. त्यामुळे त्याच्याविरुद्ध जिल्हा न्यायाधीश-५ तथा अपर सत्र न्यायाधीश, अमरावती यांनी पकड़ वॉरंट काढले होते.

**ठिकाणे बदलून पोलिसांना गुंगारा-**

जेलमधून बाहेर आल्यानंतर आरोपी मनोहर खंडाते याने आपले वास्तव स्थळ वारंवार बदलले. जेवड नगर, सर्वनिस प्लांट परिसर, महादेव घाट चांदूर रेल्वे आदी भागात तो राहत होता, अशी प्राथमिक माहिती होती. मात्र, काही काळानंतर तो कुठेच सापडेनासा झाला. त्याचा नेमका ठावठिकाणा मिळत नसल्याने पोलिसांनाही त्याचा शोध घेणे कठीण झाले होते.

**बांगडापुर शेतशिवारातील झोपडीत वास्तव्य-**

१६ जानेवारी २०२५ रोजी राजापेठ पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानुसार आरोपी वर्धा जिल्ह्यातील कारंजा घाडगे तालुक्यातील बांगडापुर गावाजवळील शेतशिवारातील झोपडीत राहत असल्याचे समजले. या माहितीनुसार १७ जानेवारी रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनित कुलट यांच्या मार्गदर्शनाखाली वॉरंट पथक तयार करण्यात आले. पो.हवा. आशिष विधे, विक्रम देशमुख, सतोष टपके, आबिद शेख व चालक विजय यादव यांनी कारवाई करत खंडाते याला सुखदेव धुर्वे यांच्या शेतातील झोपडीतून ताब्यात घेतले.

आरोपीस राजापेठ पोलीस ठाण्यात आणून, जिल्हा न्यायाधीश-५ तथा अपर सत्र न्यायाधीश, अमरावती यांच्या आदेशानुसार पकड़ वॉरंटच्या आधारे अटक करण्यात आली आहे. आता सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या अपीलसंदर्भात पुढील प्रक्रिया गतीमान होणार आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त शाम घुगे व सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

जनमाध्यम
अकोला | वाशिम | बुलडाणा
■ गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
एक प्रतिष्ठित सवय
epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

# एसटी प्रवर्गाच्या आरक्षणासाठी बंजारा समाज रस्त्यावर

■ प्रतिनिधी | मानोरा ■

**तहसील कार्यालयावर सकल बंजारा समाजाच्या वतीने हैदराबाद गॅजेटच्या आधारे महाराष्ट्रातील विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील या समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण देण्यासंदर्भात आयोजित मोर्चात हजारोच्या संख्येने बंजारा नागरिकांनी सहभाग नोंदवीला. समाजातील गणमान्यांच्या द्वारे तालुका प्रशासना मार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.**



आदिम लक्षणे असलेल्या मात्र राज्य शासनाने या समाजाला केंद्र सरकारच्या अनुसूचित जमातीच्या प्रवर्गाचे आरक्षण लागू करण्यासाठी न केलेल्या शिफारसी त्वरेने लागू करून अनेक वर्षांपासून सामाजिक अन्याय सहन करीत असलेल्या समाजाला न्याय देण्याच्या मागणीसाठी आज हजारो बंजारा समाज बांधव व भगिनींच्या उपस्थितीत तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

विधान परिषदेचे आमदार बाबूसिंग महाराज यांचे सह महाराज परिवारातील जवळपास सर्व सदस्य, वीज मंडळाचे माजी सदस्य अनिल राठोड, रमेश महाराज, संजय महाराज, सुनील महाराज, जितेंद्र महाराज, गोपाल महाराज, यशवंत महाराज सह समनक जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉ.अनिल राठोड, तांडा सुधार समितीचे महासचिव नामा बंजारा, गोरसेना, गोरसिकवाडी, राष्ट्रीय बंजारा परिषद आदी सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तथा समाजातील सर्व पक्षातील पुढारी. चळवळीमध्ये काम करणारे कार्यकर्ते, शहर व प्रत्येक तांड्यातील जागरूक नागरिक व तरुणांनी मोठ्या संख्येत आजच्या आरक्षण मागणीच्या आक्रोश मोर्चात सहभाग नोंदवून बंजारा समाजाला आंध्र प्रदेश, तेलंगणा राज्याच्या धर्तीवर हैदराबाद राजपत्राच्या आधारे तातडीने अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण देण्याचे शिफारस राज्य शासनाने केंद्राकडे करावे यासंबंधीचे निवेदन तहसीलदार मानोरा यांच्यामार्फत राज्याच्या शासन प्रमुखांना देण्यात आले. आंदोलनादरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

सामाजिक दृष्ट्या अतिशय माघारलेल्या व नियम व निकषात बसत असल्यामुळे राज्यातील बंजारा समुदायाला राज्य शासनाकडून निश्चितच कुणाही अन्य मागासवर्गीय समाजावर अन्याय न करता आदिवासी प्रवर्गाचे आरक्षण देण्यासंदर्भात पावले उचलली जातील व बंजारा समाजातील ज्या लोकांनी हे आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष केले आहे त्यांच्या संघर्षाचा आदर राज्य शासन नक्कीच करेल असा विश्वास या आंदोलनात सहभागी झालेले आ.बाबूसिंग महाराज यांनी व्यक्त केला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त कारंजा येथे सामाजिक व धार्मिक कार्यक्रम

■ प्रतिनिधी | कारंजा ■

भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर रोजी कारंजा शहरात स्वच्छता अभियान आणि धार्मिक पूजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. आमदार सईताई डहाके आणि जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली आणि पंतप्रधानांना दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली.



शहरातील विठ्ठल मंदिर परिसर, बेंबळपाट, छोटे राममंदिर आणि संत गाडगे बाबा स्मारक येथे सकाळी १० वाजता स्वच्छता अभियान राबविण्यात आली. यावेळी संत गाडगे बाबा यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास हारार्पण करण्यात आले. या कार्यक्रमात भाजपा शहर सरचिटणीस प्रसन्ना पळसकर, उपाध्यक्ष संतोष धोंगडे, चिटणीस अक्षय जोशी , ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष मयूर गुलवाडे , बूथ प्रमुख शुभम यंदे, सनी पिंपळे, राहुल कनोजे, संदीप कुऱ्हे, गिरीष बन्नोरे, जुनेद भाई, सचिन कोळसकर यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

तसेच, भाजपा महिला मोर्चाच्या वतीने शहरातील गणपती मंदिर, तुळजाभवानी मंदिर, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, गजानन महाराज मंदिर आणि महादेव मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यानंतर अभिषेक आणि पूजन करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी भाजपा शहर अध्यक्षा प्राजक्ता माहीतकर, महिला मोर्चा अध्यक्षा निशा गोलेच्छा, सरचिटणीस एकता गायकवाड, प्रतिक्षा देसाई, तसेच सदस्या निता बोन्कीले, प्रमिला देशमुख, माधुरी टोम्पे, निता जाधव, कविता पाटील, मोना देशपांडे, शितल काकडे, योगिता नेमाडे यांची उपस्थिती होती. शहरातील अनेक बूथवर अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती भाजपा शहर सरचिटणीस प्रसन्ना पळसकर यांनी दिली.

## शेतकऱ्यांचा सरकार विरोधात मोर्चा २५ सप्टेंबरला



■ प्रतिनिधी | रिसोड ■

संपूर्ण रिसोड तालुक्यात मे महिन्यापासून सुरू झालेल्या अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून शासनाकडून अद्याप कोणतीही मदत मिळालेली नाही. या पार्श्वभूमीवर भुमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांच्या नेतृत्वात २५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पुंडलीक चौक (लोणी फाटा) रिसोड येथून तहसील कार्यालयापर्यंत भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार उन्हाळी मुग, भुईमूग, सोयाबीन, तूर, कपाशी, हळद, उडीद, भाजीपाला व फळपिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. केनवड मंडळासह तालुक्यातील अनेक गावांमधून वारंवार पूर गेल्याने शेत पिकांसोबतच ड्रिप, स्प्रिंकलर, सोलार साहित्य, कृषी पंपाचे पोल-तारा, डीपी यांसारखे शेती उपयोगी साहित्य वाहून गेले आहे. तरीही शासनाने नुकसानीवरील मदत वाढविण्याऐवजी कमी केली असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे.

भुमिपुत्र शेतकरी संघटनेने मांडलेल्या प्रमुख मागण्या संपूर्ण रिसोड तालुका ओला दुष्काळग्रस्त घोषित करावा, तालुक्यातील शेतकऱ्यांचे नियमित व थकीत पीककर्ज पूर्णपणे माफ करावे, पीक नुकसानीसाठी कमी केलेली क्षेत्रमर्यादा रद्द करून मदतीत वाढ करावी,

खरडून गेलेल्या जमिनीचे स्वतंत्र पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, स्प्रिंकलर, ड्रिप, सोलार साहित्य व इतर शेती अवजारांची भरपाई करावी.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधीतील सेवा पर्वात महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणतर्फे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. वीज ग्राहकांनी योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सेवा पर्वातील उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करण्याची सूचना केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वीज ग्राहकांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या या योजनेला प्राधान्य देण्यास त्यांनी सांगितले आहे.प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी सुरू केली आहे. सर्वसामान्य घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी ही योजना आहे.

## स्वच्छ ही सेवा २०२५ या मोहिमेचा शुभारंभ



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्वच्छता ही सेवा या अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ मंगरूळपीर तालुक्यातील जनुना बु. या गावात (दि. १७) करण्यात आला. जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा मंगरूळपीर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कालिदास तापी यांच्या हस्ते गावातील कुटुंबांना प्रत्येकी दोन कचराकुंड्याचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सरपंच रूपाली नितेश खडसे, पंचायत विस्तार अधिकारी बाळकृष्ण अवगण, कृषी विस्तार अधिकारी रवींद्र वाढणकर, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे राम श्रृंगारे, पंचायत विस्ताराधिकारी इम्रान शेख आणि पंचायत समितीचे गट समन्वयक (बीआरसी) प्रवीण आखाडे यांची उपस्थिती होती. यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामसभा घेण्यात आली. ग्रामसभेला महिला व पुरुषांचे मोठ्या प्रमाणात उपस्थित होती.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची माहिती वाढणकर यांनी दिली तर स्वच्छता ही सेवा या अभियानाबाबत राम श्रृंगारे यांनी माहिती दिली.

**नितेश खडसे यांच्यामार्फत शाळेला प्रोजेक्टर :** जिल्हा परिषदेची शाळा डिजिटल करण्याच्या उद्देशाने गावातील सामाजिक कार्यकर्ते नितेश खडसे यांच्यामार्फत शाळेला एलसीडी प्रोजेक्टर भेट देण्यात आले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी तापी यांच्या हस्ते शाळेच्या मुख्याध्यापिका यांना प्रोजेक्टर भेट देण्यात आले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी कालिदास तापी यांनी यावेळी जनुना गावातील लोकसहभाग पाहून कौतुक केले. त्यांनी गावातील ग्राम पंचायत भवन, शाळा व अंगणवाडी तसेच ओपन जिमची पाहणी केली. ग्रामविकासाबाबत त्यांची सामाजिक कार्यकर्ते नितेश खडसे यांचे अभिनंदन केले. गावातील सर्व पदाधिकारी व नागरिकांनी एकजुटीने काम केल्यास जनुना बु. ही जिल्ह्यात आदर्श ग्राम पंचायत ठरेल असे भाकीत केले.

यावेळी नितेश खडसे यांनी लोकसहभागाच्या माध्यमातून गावात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' प्रभावीपणे राबविण्याचे आश्वासन दिले. यावेळी यावेळी उपसरपंच सुनील नवघरे, ग्रामपंचायत सदस्य अर्चना महेंद्र पाटील, वनिता रविंद्र मनवर, सुरक्षा नाना भुसारे, कोंडाबाई किसन धनकर, सुशिला मधुकर पाटील, पुरुषोत्तम बापुराव पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन ग्रामपंचायत अधिकारी अमोल जाधव यांनी तर आभार प्रदर्शन ग्रामपंचायत ऑपरेटर गोपाल वकटे यांनी केले.

## श्रीमती मनोरमाबाई बालचंद्र गुळकरी यांचे मरणोत्तर नेत्रदान



■ प्रतिनिधी | कारंजा ■

सराफ लाईन कारंजा येथील रहिवासी श्रीमती मनोरमाबाई बालचंद्र गुळकरी यांचे १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता वयाच्या ८६ व्या वर्षी वृध्दपकाळाने देह परिवर्तन झाले. निधनानंतर गुळकरी कुटुंबाने आपल्यावरील दुःखाचा डोंगर बाजुला सारून मुलगा सुहास गुळकरी ,सुदेश गुळकरी सचिन गुळकरी,सौ विलासीनी राऊळ यांनी गरजूंना या जगातील रंग पाहता यावे या उदात्त भावनेने नेत्रदानाचा निर्णय घेतला.

अमरावती येथील दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीला डॉ संजय किटे यांनी संपर्क केला. दिशा इंटरनॅशनल आय बँकेचे हिमांशू बंड,अनिल देशमुख,अंकुश अंबाडकर ही मंडळी तात्काळ कारंजा येथे पोहोचली व मरणोत्तर नेत्रकमळ दान करून घेण्याची डॉ.विजय जवाहरमलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रक्रिया पूर्ण केली.

यावेळी दिशा ग्रुप कारंजाचे , प्रज्वल गुलालकरी,हर्षल गंधक,पपिश कहाते,स्नेहल कहाते,सुनीता गुळकरी, मीनाक्षी गुळकरी, सोनल गंधक ,मंगेश वैद्य,केतन गुळकरी, अधिश गुळकरी परिवारात सदस्य उपस्थित होते. नेत्रदानाच्या सेवाभावी कार्यासाठी परिवारातील इतर सदस्यांचे देखील मोलाचे सहकार्य लाभले. त्याबद्दल दिशा एजुकेशन फाऊंडेशन व दिशा इंटरनॅशनल आय बँकच्या सर्व संचालक मंडळाने व कार्यकर्त्यांनी गुळकरी परिवाराचे आभार व्यक्त केले व स्व. मनोरमाबाई बालचंद्र गुळकरीयांना दिशा परिवार कडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित केली.

## सोयाबीन शेती दिन व कृषी चर्चासत्राचे आयोजन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशीम यांच्या वतीने, राष्ट्रीय खाद्यतेल अभियान व भारतीय कृषी तंत्रज्ञान अनुसंधान प्रसार संस्थान (ॲंघ) पुणे यांच्या सहकार्याने, तेलबिया प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत सोयाबीन शेती दिन व प्रक्षेत्र भेट कार्यक्रम मौजे शेलगाव राजगुरे, ता. रिसोड, जि. वाशीम येथे तसेच शास्त्रज्ञ प्रतिनिधींची प्रात्यक्षिक शिवारभेट पांगरी कुटे व सुकांडा (ता. मालेगाव) येथे बुधवार दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आर. एल. काळे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशीम होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारत सरकार कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयांतर्गत केंद्रीय कापूस संचालनालय, नागपूरचे तंत्र अधिकारी आकाशकुमार साबळे उपस्थित होते. तसेच कृषी विज्ञान केंद्रातील डॉ. एस. के. देशमुख (कृषी विस्तार तज्ञ), तुषार देशमुख (पीक शास्त्रज्ञ), कृषी सहाय्यक जाधव, सरपंच पंजाबजी सोनवणे, रामदासजी वाघ, प्रयोगशील शेतकरी दिलीप वाघ व ग्रामपंचायत सदस्य मान्यवर उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

**वि ४ थे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी अकोला यांचे न्यायालयात**

(नमुना क्रमांक ४)
आरोपी व्यक्तीस उपस्थित राहण्यास फर्मावणारी उदघोषणा
कलम ८२ पहा.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९४४/२०२३
सितल -वि- कृष्णकुमार
चौ. ता. २९/१०/२०२५

ज्याअर्थी सुरेंद्र प्रल्हाद वडोदे, रा. खोलेश्वर अपार्टमेंट, जवाहर नगर, ता. जि. अकोला, एन.आय ॲक्ट चे कलम १३८ खाली शिक्षा पात्र असलेला अपराध केला आहे. किंवा केला असल्याचा संशय आहे अशी फिर्याद माझ्यासमोर देण्यात आली आहे व त्यावरुन अटक वॉरंट काढले असता उक्त सुरेंद्र प्रल्हाद वडोदे सापडु शकत नाही असे प्रतिवेदन देण्यात आले आहे, आणि ज्याअर्थी, उक्त सुरेंद्र प्रल्हाद वडोदे फरारी झालेला आहे किंवा सदर वॉरंटाची बजावणी चुकवण्यासाठी तो गुप्तपणे वावरत आहे याबददल माझी खात्री पटवण्यात आली आहे.

म्हणुन, उक्त फिर्यादीचा जाब देण्यासाठी सुरेंद्र प्रल्हाद वडोदे, रा. खोलेश्वर अपार्टमेंट, जवाहर नगर, ता.जि. अकोला यांस दि. २९.१०.२०२५ रोजी वि. ४थे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, अकोला यांचे न्यायालयासमोर उपस्थित होण्यास फर्माविण्यात येत आहे अशी उदघोषणा करण्यात येत आहे. आज दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी न्यायालयाची मोहोर.

शिक्का

४थे अतिरिक्त मुख्य
न्यायदंडाधिकारी, अकोला

**दरपत्रक सूचना**

कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद वाशिम यांच्या आधिपत्याखालील जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत विविध ठिकाणी सोलर हायमास्ट लाईट पुरवठा करणे व बसविण्यासाठी विद्युत कंत्राटदार/पुरवठादार यांचेकडून दर पत्रक मागवणे आहे.

करिता विद्युत कंत्राटदार / पुरवठादार यांचेकडून सील बंद लिफाफा मध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहेत. खालील कामाकरिता बंद लिफाफा दिनांक २२/०९/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जिल्हा परिषद वाशिम आवक जावक विभागात मागवीत आहे.

1) Providing, Erecting & Testing of All In One Integrarted Solar Device 12V 50W x 4 Nos. led luminaries IP 66 Grade, LifePo4 battery with capacity of 12.8V-72Ah x 4Nos., min. 170Wp X 4, 12v SPV modules, mounted on octagonal Galvnised Pole with bottom of 200mm A / F, top 100mm A/F 7 mtr height along with J Bolt M24x750mm, brackets, Reinforced cement concrete foundation by considering the safe soil bearing capacity at site as 10 T/sq.m at 1.5m depth including supply of steel, concrete, excavation and fixing provided nut bolts with the help of template, as per design complete and necessary accessories light arm, Panel Stand, Waterproof inbuild light Luminary battery box, timer setting arrangement Auto Dimming Mode, GI / Powder coated module structure, with first 6 hr. full intensity light output and following 6 hr. with half intensity light output along with solar power supply charging facility complete, With earthing protection, above housing of Pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete, Power Factor Protector. QTY 01 NO

2) Providing, Erecting & Testing of All In One Integrarted Solar Device 12V 24W x 3 Nos. led luminaries IP 66 Grade, LifePo4 battery with capacity of 12.8V-36Ah x 3Nos., min. 120Wp, 12v SPV modules, mounted on octagonal Galvnised Pole with bottom of 130mm A / F, top 70mm A / F6mtr height along with J Bolt, brackets, Reinforced cement concrete foundation by considering the safe soil bearing capacity at site as 10 T/sq.m at 1.5m depth including supply of steel, concrete, excavation and fixing3provided nut bolts with the help of template, as per design complete and necessary accessories light arm, Panel Stand, Waterproof inbuild light Luminary battery box, timer setting arrangement Auto Dimming Mode, GI/ Powder coated module structure, with first 6 hr. full intensity light output and following 6 hr. with half intensity light output along with solar power supply charging facility complete, With earthing protection, above housing of Pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete, Power Factor Protector. QTY 01 NO

3) Providing, Erecting & Testing of All In One Integrarted Solar Device 12V 30W x 4 Nos. led luminaries IP 66 Grade, LifePo4 battery with capacity of 12.8V-36Ah x 4Nos., min. 120Wp, 12v SPV modules, mounted on octagonal Galvnised Pole with bottom of 200mm A/F, top 100mm A/F 7 mtr height along with J Bolt M24x750mm, brackets, Reinforced cement concrete foundation by considering the safe soil bearing capacity at site as 10 T/sq.m at 1.5m depth including supply of steel, concrete, excavation and fixing provided nut bolts with the help of template, as per design complete and necessary accessories light arm, Panel Stand, Waterproof inbuild light Luminary battery box, timer setting arrangement Auto Dimming Mode, GI / Powder coated module structure, with first 6 hr. full intensity light output and following 6 hr. with half intensity light output along with solar power supply charging facility complete, With earthing protection, above housing of Pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete, Power Factor Protector. QTY 01 NO

**अटी व शर्ती :-** वरील कामाबाबतचे दरपत्रक दि. २२/०९/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जिल्हा परिषद वाशिम आवक जावक विभागात सादर करता येतील. शक्य झाल्यास दरपत्रके दिनांक २३/०९/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता उपस्थित कंत्राटदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात येतील. बंद लिफाफ्यात पुरवठा दार यांनी दरपत्रक, जी. एस. टी. प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्रसोबत जोडावे. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद वाशिम यांनी राखून ठेवला आहे. वरील कामासंमधी इतर शर्ती व अटी कार्यालयीन वेळेत जिल्हा परिषद वाशिम बांधकाम विभागात पहावयास मिळतील.

जा.क्र / जीपवा / बांध / तांत्रिक/१९५२ / २०२५
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वाशिम दिनांक : -१७/०९/२०२५

**कार्यकारी अभियंता,**
**जिल्हा परिषद वाशिम**

## जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी घेतला कृषी विभागाचा आढावा

### नैसर्गिक शेती, खत उपलब्धता, महाविस्तार ॲपवर भर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी आज जिल्ह्यातील कृषी विभाग व आत्मा अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, कृषी उपक्रम व कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी रासायनिक खतांची उपलब्धता जिल्ह्याच्या संकेतस्थळावर नियमितपणे प्रसिद्ध करणे, बायो फर्टिलायझरच्या वापराबाबत व्यापक जनजागृती करणे, महाविस्तार ॲपचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे, कृषी समृद्धी योजनेतील निधी स्थानिक गरजांनुसार खर्च करणे, शेतीशाळांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणे, याशिवाय चिया पिक, गहू, हरभरा आणि चिया लागवडीचा खर्च, आत्मा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कार्यशाळा, प्रात्यक्षिके, शेतकरी शेतीशाळा, खरेदीदार-विक्रेता संमेलन, तांत्रिक मार्गदर्शन, कृषी विस्तार व बाजारपेठेची माहिती या विषयांवरही विशेष भर दिला.



तसेच डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन २०२५-२६, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत केंद्र शासनाचे मंजूर आवंटन व जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ यावर सविस्तर विचारविनिमय झाला. बैठकीत आंतरराज्य, राज्यांतर्गत व जिल्हा अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण, पीक प्रात्यक्षिके, अभ्यास दौरे, शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद व क्षेत्रीय किसान गोष्टी कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले. याशिवाय वाशिम शेती शिल्प कृषी विपणन कक्ष, वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा, जलतारा उपक्रम, वत्सगुल्म स्मार्ट पेरणी स्पर्धा यांचा आढावा घेऊन अधिकारी वर्गास आवश्यक दिशा-निर्देश दिले. यासह प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री फसल विमा योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, राष्ट्रीय कृषी विकास योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोक्रा), मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा योजना, बैठकीस प्रकल्प संचालक आत्मा अनिसा महाबळे, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके, कृषी विकास अधिकारी अभिजित देवगीरकर, सर्व तालुका कृषी अधिकारी आदी उपस्थित होते. माहितीचे सादरीकरण अनिसा महाबळे यांनी केले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २९१ ■ गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' ग्रामीण भागाला अधिक बळकट करेल-पालकमंत्री डॉ. भोयर

## -पालकमंत्र्यांच्या हस्ते सालोड येथे अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ

### -अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार

**वर्धा जनमाध्यम :** ग्रामीण भागातील पंचायतराज व्यवस्था अधिक मजबूत व्हावी आणि विकासाच्या प्रक्रियेमध्ये कोणतेही गाव मागे राहू नये यासाठी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' सुरू करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागाला विकासाची नवी दिशा मिळेल, नागरिकांना चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध होतील आणि ग्रामीण भाग अधिक सक्षम बनेल, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. भोयर यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ कार्यक्रम सालोड (हिरापूर) येथे आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक अनुराग जैन, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, सालोडचे सरपंच अमोल कन्हाके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल



भोसले, उपसरपंच आशिष कुचेवार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

पालकमंत्री डॉ.भोयर पुढे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानात उत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना बक्षिसे मिळणार आहे. सर्वांगीण विकास साधण्यासाठी लोकसहभाग अत्यंत आवश्यक आहे. लोकसहभागातून गावाचा विकास कसा साधता येईल, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

महिलांना आर्थिक सक्षम बनविण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण सारखी महत्वाकांक्षी योजना सुरू केली. आगामी काळात ग्रामीण भागात पतसंस्था देखील सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे गावातील पैसा गावातच राहील आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल. आपल्या ग्रामपंचायतीने चांगले काम केल्यास नक्कीच बक्षीस मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. पालकमंत्री डॉ.भोयर यांच्याहस्ते सालोड ग्रामपंचायतीच्या संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना घराची चाबी व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाविषयी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे प्रमुख घटक सुशासन युक्त पंचायत तयार करणे, स्वनिधी व सामाजिक दायित्व निधीतून ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण, गावातील संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास, सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदान यांच्या माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे हे आहेत. या अभियानांतर्गत गावांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यात गावांमधील पाणीटंचाई, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार निर्मिती अशा बाबींचा समावेश आहे. ग्रामपंचायतीचे १०० गुणांचे मूल्यांकन होईल. मुल्यांकनामध्ये गावातील स्वच्छतेपासून ते पाणी व्यवस्थापनापर्यंत, आरोग्य सुविधांपासून ते शिक्षणापर्यंत अनेक बाबींचा समावेश असेल. उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार दिले जाणार आहे.

# मावस भावाचा जीवनदायी त्याग:२२ वर्षीय करणला यकृत प्रत्यारोपणाने नवे जीवन

## -यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी मुख्यमंत्र्यांची मदत

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाटचा २२ वर्षीय तरुणाचे यकृत निकामी झाल्याने गेली दोन वर्षे तो उपचार घेत होता. डॉक्टरांनी शेवटी यकृत (किडणी) प्रत्यारोपण हा एकमेव पर्याय असल्याचे सांगितले. मात्र तब्बल ३० लाखांचा खर्च उभा करण्यास त्याच्या कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती अपुरी पडत होती. या कठीण प्रसंगी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने पुढाकार घेतला आणि कुटुंबीयांनी उभारलेल्या रकमेसोबतच उर्वरित खर्च भागवून उपचाराची दारे खुली झाली.

या प्रसंगात करणाचा मावसभाऊ चैतन्य बगाडे (वय



२४, पुणे) मोठा आधार ठरला. त्याने स्वतःच्या यकृताचा एक भाग दान करून करणला जीवनदान दिले. गेल्याच आठवड्यात पुण्यातील सह्याद्री रुग्णालयात प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली असून करणची प्रकृती सध्या स्थिर आहे.

करणचे वडील लहानपणीच वारले. आईला पक्षाघात असल्याने घराची जबाबदारी त्याच्या खांद्यावर होती. अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात तो शिक्षणासोबत घरखर्चही भागवत होता. अशा बिकट संकटसमयी मिळालेली ही मदत आणि भावाचे त्यागमय निर्णय यामुळे करणला नवे जीवन मिळाले. या संपूर्ण प्रक्रियेत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी महत्वाची भूमिका बजावत मुख्यमंत्र्यांपर्यंत प्रकरण पोचवले. मुख्यमंत्र्यांची संवेदनशीलता, नाईक यांची तत्परता आणि मावसभाऊचा त्याग – या त्रिसूत्रीमुळे माझ्या भावाचे प्राण वाचले, असे करणची बहिण अश्विनी हिने सांगितले.

# धोकादायक विहिरीवर अंबिका हिंगमिरे यांची जिद्दी कारवाई

**बोरगाव मेघे जनमाध्यम :** वॉर्ड क्र. ३ मधील देशमुख फोटोग्राफी यांच्या घरामागे असलेली धोकादायक खाजगी विहीर अनेक दिवसांपासून ग्रामस्थांच्या डोळ्यांत धाक निर्माण करत होती. शेवटी ग्रामस्थांचा आवाज बनून अंबिका हिंगमिरे मैदानात उतरल्या आणि थेट घटनास्थळी जाऊन जबाबदारांना जाब विचारला.

हिंगमिरे यांनी ग्रामसेवक व संबंधित मालकांना पाचारण करून प्रत्यक्ष घडामोडींची पाहणी करवली. नागरिकांनाही सोबत घेत विहिरीची बिकट अवस्था दाखवून दिली. ग्रामस्थांच्या



नावाने दाखल केलेले निवेदन हातात धरून हिंगमिरे यांनी ग्रामसेवकांवर शब्दांचा चिमटा घेताच तातडीने व्ँ बोलावण्यात आला आणि विहीर बुजवण्याचे आदेश देण्यात आले. वर्षानुवर्षे ग्रामस्थांच्या अंगावर आलेला हा धोक्याचा डोंगर हिंगमिरे यांच्या पुढाकारामुळे शेवटी पडलाच.

या कारवाईनंतर ग्रामस्थांमध्ये दिलासा व्यक्त होत आहे. हिंगमिरे यांच्या जिद्दी स्वभावाची पुन्हा एकदा प्रचिती आली असून नागरिकांनी त्यांना दणदणीत दाद दिली आहे.

# विरूळ आणि पिंपळगाव ग्रामपंचायतीत समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामसभा

**विरूळ (आ,) जनमाध्यम :** येथे वेरूळ आणि पिंपळगाव ग्रामपंचायत समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामसभा दिनांक १७ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली,

सशक्त पंचायत समृद्ध महाराष्ट्र, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामसभा पार पडली. महसूल अधिकारी माळोदे मॅडम यांच्या अध्यक्षस्थानी झालेल्या या ग्रामसभेत ग्रामपंचायत अधिकारी पी. आर. मनभे यांनी प्रोसिडिंग पार पाडले. कृषी सहाय्यक नाचणे मॅडम, कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका वडनेरकर मॅडम यांच्यासह ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. गाव विकासासाठी अभियानातील सात मुख्य घटकांवर चर्चा करीत सुशासन, लोकसहभाग, जलसंवर्धन, स्वच्छ हरित गाव व उपजीविकावाढीच्या संकल्पना ग्रामसभेत मांडण्यात आल्या.



**पिंपळगाव वडाळा :** राज्य सरकारच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा शुभारंभ पिंपळगाव वडाळा ग्रामपंचायतीत ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागात झाला. ग्रामपंचायत कार्यालयात भरलेल्या सभेत गावाच्या सर्वांगीण विकासाची दिशा ठरली. 'प्रश्नांकडे बोट दाखविण्यापेक्षा स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन योगदान द्या,' असे आवाहन सरपंच सुचिता जाधव यांनी केले. त्यांच्या आवाहनाला ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. अभियानांतर्गत शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, स्वच्छता आदी क्षेत्रांत विकास घडवण्याचे उद्दिष्ट आहे. सरपंच सुचिता जाधव, उपसरपंच खुशाल बमनोटे, ग्रामसेवक नितीन साव यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व नागरिक उपस्थित होते. ग्रामस्थांनी अभियानातून गाव समृद्ध होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# आर्वी शहरात 'स्वच्छता ही सेवा' अभियानाचा शुभारंभ

## -२ ऑक्टोबर पर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन

**आर्वी जनमाध्यम :** स्वच्छ भारताच्या संकल्पनेला पुढे नेण्यासाठी 'स्वच्छता ही सेवा' या राष्ट्रीय अभियानाचा शुभारंभ आर्वीत करण्यात आला आहे. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) यांच्या मार्गदर्शनाखाली १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान या मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

याअंतर्गत १८ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते १० वाजेदरम्यान शिवाजी चौक ते गांधी चौक येथे मोहिमेचे उद्घाटन होणार आहे. तर, २६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत आठवडी बाजार परिसरात 'एक दिवस - एक तास - एक साथ' या संकल्पनेनुसार सामूहिक श्रमदान करण्यात येणार आहे.

शहरात स्वच्छता मोहिमेला गती देण्यासाठी विविध संस्था, शैक्षणिक संकुले व स्वयंसेवी संघटनांचा सहभाग राहणार आहे. तसेच नागरिकांनीही यात सक्रिय सहभाग नोंदवून स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी आर्वी घडविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पत्नीला अटक होताच मुख्य आरोपीचे आत्मसमर्पण

## -जीएस फायनान्स कंपनी फसवणूक प्रकरण

**वर्धा जनमाध्यम :** जीएस फायनान्स कंपनीत तब्बल ४१ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी मुख्य आरोपी गजानन सातव आणि त्याची पत्नी स्वाती मगर पोलिसांच्या जाळ्यात अडकले आहेत. मंगळवारी (१६ सप्टेंबर) स्वाती मगरला सेवाग्राम येथील रुग्णालय परिसरातून ताब्यात घेण्यात आल्यानंतर बुधवार (१७ सप्टेंबर) रोजी गजानन सातवने स्वतःहून पोलिसांकडे आत्मसमर्पण केले. न्यायालयाने दोघांनाही २२ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

गजानन सातव, पत्नी स्वाती आणि भागीदार कमलेश धोटे या तिघांनी मिळून जीएस फायनान्स कंपनी सुरू केली होती. बँकांकडून विविध कर्जे मंजूर करून ती रक्कम कंपनीच्या खात्यात जमा करण्यात आली. मात्र, कर्जाची परतफेड टाळण्यात आली तसेच अनेक गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचे पुढे आले. या तिघांनी जवळपास ४१ लाख रुपयांचा गंडा घातल्याची फिर्याद पोलिसांकडे दाखल झाली आहे.

### दोघेही २२ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडीत

पोलिसांनी काही महिन्यांपूर्वीच भागीदार कमलेश धोटेला अटक केली असून तो न्यायालयीन कोठडीत आहे. त्यानंतर मंगळवारी स्वाती मगर आईला भेटण्यासाठी सेवाग्राम रुग्णालयात आली असता पोलिसांनी तिला जेरबंद केले. पत्नीला अटक झाल्याची माहिती मिळताच मुख्य आरोपी गजानन सातवने थेट पोलिस ठाण्यात जाऊन आत्मसमर्पण केले. या प्रकरणातील दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता २२ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. पुढील तपास पोलिस निरीक्षक संतोष टाले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# चोरीच्या दोन दुचाकीसह दोन आरोपी अटक

## वर्धा गुन्हे शाखेची धडक कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने हिंगणघाट परिसरात धडक कारवाई करत दोन चोरीच्या दुचाक्यांसह दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत अल्लीपुर (जि. वर्धा) व राळेगाव (जि. यवतमाळ) पोलिस ठाण्यातील दोन गुन्ह्यांचा उलगडा करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १६ सप्टेंबर रोजी हिंगणघाट परिसरात गुन्हेगार तपासणीदरम्यान पथकाला गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार शुभम सुभाष मिसाळ (३०, रा. संत कबीर वार्ड, हिंगणघाट) व आकाश उर्फ काल्या देविदास भोस्कर (३२, रा. शास्त्री वार्ड, हिंगणघाट) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान या दोघांनी चोरीच्या मोटारसायकली विक्रीसाठी ग्राहक शोधत असल्याचे



कबूल केले. यांच्याकडून हिरो होंडा स्प्लेंडर (क्र. एम एच ४९ ए सी ७८२०) किंमत ६० हजार रुपये ही अल्लीपुर पोलिस ठाण्यातील अप. क्र. ४८२/२०२५ मधील चोरीची दुचाकी व हिरो होंडा फॅशन प्रो (क्र. एम एच २९ ए जे ३५२०) किंमत ६० हजार रुपये ही राळेगाव पोलिस ठाण्यातील अप. क्र. २८३/२०२५ मधील दुचाकी असा एकूण १ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपी व दुचाकी पुढील तपासाकरिता पोलिस स्टेशन अल्लीपुर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे व पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पो.उपनि. प्रकाश लसुंते, स.फौ. मनोज धात्रक, शेखर डोंगरे, पो.हवा. महादेव सानप, पवन पन्नासे, अक्षय राऊत, विकास मुंडे, पो.अ. विनोद कापसे व शुभम राऊत आदींचा समावेश होता.

# जिल्हा रुग्णालयात दुचाकी चोरी, सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात भर गर्दीत व अधिकृत वाहनतळावर ठेवलेली दुचाकी एका तासाच्या आत चोरीला गेल्याची धक्कादायक घटना उघड झाली. त्यामुळे रुग्णालय प्रशासनाच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील कर्मचारी हिरा दिलीप पारटकर या सकाळी ११ वाजता रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी आल्या होत्या. त्यांनी आपली दुचाकी (क्र. एमएच-३२ एएल-७८१५) अधिकृत पार्किंगमध्ये ठेवून पावतीही घेतली. तथापि, परत १२.३० वाजता आल्यावर दुचाकी गायब झाल्याचे लक्षात आले. सुरक्षा व्यवस्थेतील उणिवांकडे बोट रुग्णालय परिसर हा सतत गजबजलेला असूनही चोरीच्या घटना घडत असल्याने सुरक्षा व्यवस्थेतील हलगर्जी उघड होत आहे. वाहनतळावर शुल्क आकारले जात असूनही वाहनधारकांच्या सुरक्षेची जबाबदारी गांभीर्याने न घेतल्याचे चित्र दिसत आहे.

### नागरिकांची संतप्त प्रतिक्रिया

दरम्यान, वारंवार होणाऱ्या चोरीच्या घटनांबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. 'रुग्णसेवेसोबतच वाहनांची सुरक्षा ही रुग्णालय प्रशासन व ठेकेदाराची जबाबदारी आहे; मात्र ती पूर्णपणे बेजबाबदारपणे निभावली जात आहे,' अशा शब्दांत नागरिकांनी प्रशासनाला जाब विचारला आहे.

# जीएसटी दरकपातीने सामान्यांना दिलासा

## वर्धा भाजपाची पत्रकार परिषद

**वर्धा जनमाध्यम :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जीएसटीचे दर कमी करण्याचा निर्णय घेतला असून यामुळे सामान्य नागरिकांसह विविध उद्योगांना दिलासा मिळणार आहे, अशी माहिती माजी खासदार रामदास तडस यांनी दिली. भाजपा जिल्हा कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी हा निर्णय स्वागतार्ह ठरवला.

माजी खासदार तडस म्हणाले की, शासनाने ५ आणि १८ टक्क्यांची सरलीकृत कररचना स्वीकारल्याने कृषी, वस्त्रोद्योग, ऑटोमोबाईल्स, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधांसारख्या प्रमुख क्षेत्रांना मोठा फायदा होईल. तसेच जीएसटी अपिलीय न्यायाधिकरण सुरू झाल्याने वाद निवारण प्रक्रिया वेगवान होणार असून निर्यात प्रक्रियेत सुलभता येईल. या संधीचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी १५ ते ३० सप्टेंबरदरम्यान जिल्ह्यात व्यापक अभियान राबवण्याचे नियोजन केले असल्याचे जिल्हाध्यक्ष संजय गाते यांनी सांगितले. नगरपरिषद, ग्रामपंचायत व व्यापारी संघटनांतून मोदी सरकारचे अभिनंदन करण्याचे ठराव घेतले जाणार आहेत. शहर, तालुका व मंडळ स्तरावर धन्यवाद सम्मेलनांचे आयोजन होणार असून १३ ऑक्टोबर रोजी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत



'धन्यवाद मोदीजी सम्मेलन' आयोजित करण्यात येणार आहे. या सम्मेलनात वर्धा जिल्ह्यातील १५ ते २० उद्योजक सहभागी होतील. आयुर्विमा क्षेत्रावरील जीएसटी कमी झाल्याने टॅक्सचा भार घटून मध्यमवर्गीयांना मोठा फायदा होईल असे मत माजी खासदार सुरेश वाघमारे यांनी व्यक्त केले. पत्रकार परिषदेस भाजपा जिल्हाध्यक्ष संजय गाते, माजी खासदार सुरेश वाघमारे, भाजपा महामंत्री कमलाकर निंभोरकर, शहराध्यक्ष निलेश किटे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## कमलाबाई घोटकर यांचे निधन

**आर्वी –** येथील बारी समाजातील वरिष्ठ व प्रतिष्ठित नागरिक तसेच सेवानिवृत्त शिक्षिका श्रीमती कमलाबाई लक्ष्मणराव घोटकर यांचे बुधवार, १७ सप्टेंबर रोजी, पहाटे १.३० वाजता वयाच्या ८४ व्या वर्षी दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, सून व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर स्थानिक मोक्षथाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.


## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर L५९५५२५५वरील माझे **FATMA BEGUM NIYAMAT ALI** असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील **SHAHENAJ BEGAM NIYAMAT ALI** हे नाव नमूद आहे. वरील नाव पासपोर्ट वर नमूद करावे.

पत्ता :-
शिवाजी वॉर्ड हिंगणघाट,
वर्धा ४४२३०१

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर J१९७७४४८ वरील माझे **ABEDA BANO SAYYAD** असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील **ABEDA BANU SAYYED AMINUDDIN** हे नाव नमूद आहे. वरील नाव पासपोर्ट वर नमूद करावे.

पत्ता :-
हनुमान नगर रब्बानी मस्जिद,
वर्धा ४४२००१

## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार आशिष रमेश राजुरकर व निमा आशिष राजुरकर यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा नागठाणा (रोठा), ता. जि. वर्धा येथील ग्राम पंचायत नागठाणा च्या हद्दीतील शेत सर्वे कं. ७३ मधील प्लॉट कं. २ ज्याची एकुण आराजी ८२५.०० चौ. मी. यावर बांधलेली आर. सी. सी पध्दतीची इमारत कं. टाईप अ व्यंकटेश नगरी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या बिल्डींग/इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट कं. ४०१ ज्याची एकुण बांधकाम आराजी ९८६.०० चौ. फुट म्हणजेच ९१.६४ चौ. मी असुन ज्याचा जमीनीतील अविभक्त हिस्सा ४.०६३ इतका असुन त्याची चतुःर्सिमा :-

पुर्वेसः फलॅट कं. ४०२,
पश्चिमेसः बिल्डींग मार्जीन जागा,
उत्तरेसः बिल्डींग मार्जीन जागा,
दक्षिणेसः फलॅट कं. ४०६,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. १५,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

जनमाध्यम


epaper www.janmadhyam.com ■ गुरुवार १८ सप्टेंबर २०२५ एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त

# भुजबळ यांच्या अडचणीत वाढ

## बेनामी मालमत्ता प्रकरण पुन्हा सुरू करण्याचे विशेष न्यायालयाचे आदेश

**मुंबई/प्रतिनिधी :**महायुती सरकारमधील कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. मुंबईच्या विशेष न्यायालयाने छगन भुजबळ आणि



इतरांविरोधातील २०२१ च्या बेनामी मालमत्ता प्रकरण पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. मुंबईच्या विशेष कोर्टाने हे आदेश १६ सप्टेंबरला दिले आहेत. खटला रद्द करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले आदेश मेरिट वर नसून केवळ तांत्रिक मुद्यांवर असल्याचे विशेष न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ६ ऑक्टोबरला होणार आहे.इन्कम टॅक्स विभागाने २०२१ मध्ये छगन भुजबळ आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य, त्यांचे फर्म आर्मस्ट्रांग इन्फ्रास्ट्रक्चर प्राइवेट लिमिटेड, परवेश कंस्ट्रक्शन प्राइवेट लिमिटेड आणि देविशा कंस्ट्रक्शन प्राइवेट लिमिटेड विरोधात बेनामी संपत्ती प्रकरणी कार्यवाही सुरु केली होती. विशेष कोर्टाने नोव्हेंबर २०२१ मध्ये या प्रकरणात समन्स जारी केले होते. हे समन्स छगन भुजबळ, पंकज भुजबळ आणि समीर भुजबळ यांना जारी करण्यात आले होते. भुजबळ यांनी आयकर विभागाच्या कारवाईला मुंबई हायकोर्टात आव्हान दिले होते. डिसेंबर २०२४ मध्ये उच्च न्यायालयाने तक्रार रद्द करण्याचे आदेश दिले होते. ज्यामध्ये कथित बेनामी संपत्तीचा आरोप करण्यात आला होता. त्या मालमत्ता त्यांच्याशी संबंधित तीन कंपन्यांच्या नावावर होती. ज्या मालमत्ता मुंबई, नाशिकची गिरणा शुगर मिल्सचा समावेश आहे. एमपी/एमएलए प्रकरणांचे विशेष न्यायाधीश सत्यनारायण नावंधर यांनी मंगळवारी एक आदेश देताना म्हटले की मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले आदेश मेरिटवर नसून केवळ तांत्रिक मुद्यांवर होते. दरम्यान, या प्रकरणी छगन भुजबळ यांच्या बाजूने प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

# शिवभोजन थाळी केंद्रचालकांचे थकलेले दोनशे कोटी सरकार देणार

**मुंबई :** महाविकास आघाडी सरकारच्या काळात सुरू करण्यात आलेली शिवभोजन थाळी योजना महायुती सरकारच्या काळात रखडली आहे. फेब्रुवारी महिन्यापासून शिवभोजन केंद्रचालकांना अनुदानच न मिळाल्याने १८०० केंद्रचालकांनी ठिकठिकाणी उपोषण करीत निदर्शने केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानासमोरही



निदर्शने करण्यात आली. अखेर या शिवभोजन केंद्रचालकांचे थकलेले दोनशे कोटी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. राज्यभरात १८०० शिवभोजन थाळी केंद्रे आहेत. कोरोनाकाळात १० रुपयांत मिळणा-या या शिवभोजन थाळी केंद्रांचा गरीब गरजू नागरिक, बांधकाम मजुरांना मोठा आधार मिळाला. त्यानंतर तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने ही योजना पुढे चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दरवर्षी अर्थसंकल्पात २७० कोटींची तरतूद करण्यात येत होती. मात्र महायुती सरकार आल्यानंतर लाडकी बहीण योजनेसाठीच्या अनुदानाचा प्रश्न निर्माण झाल्याने या योजनेकडे दुर्लक्ष झाले. ही योजना बंद पडण्याच्या मार्गावर असून काही केंद्रचालकांना डिसेंबरपासून तर काही केंद्रचालकांना फेब्रुवारीपासून अनुदान मिळालेले नाही. या शिवभोजन थाळी केंद्रचालकांचे सुमारे २०० कोटी रुपये सरकारकडे थकित राहिल्याने केंद्रचालक आर्थिक अडचणीत सापडले. केंद्रचालकांनी शिवभोजन संघटना स्थापन केली. सात महिन्यांपासूनची थकित बिले मिळालीच पाहिजेत अशी मागणी करीत या केंद्रचालकांनी सर्व मंत्री आणि आमदारांच्या घरासमोर जोरदार आंदोलन करण्याचा इशारा दिला. केंद्र चालविण्यासाठी द्यावे लागणारे जागेचे भाडे, कामगारांचे पगार, किराणामालाचे थकलेले बिल यामुळे केंद्र चालविण्यात अडचणी निर्माण झाल्याचे पत्र या केंद्रचालकांकडून सरकारला देण्यात आले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि आमदारांना निवेदन देउनही सरकार दुर्लक्ष करीत असल्याचे केंद्रचालकांचे म्हणणे होते. या विषयावर मंत्रिमंडळ बैठकीत आज चर्चा करण्यात आली. त्यानुसार केंद्रचालकांचे थकलेले बिल देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्याचे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. त्यामुळे या केंद्रचालकांच्या थकलेल्या अनुदानाविषयी सरकारकडून तत्काळ तजवीज केली जाणार आहे. सरकारकडून अर्थसंकल्पात शिवभोजन थाळी योजनेसाठी २७० कोटींची आवश्यकता आहे. मात्र यंदा केवळ ७० कोटींची तरतूद करण्यात आली असून मात्र त्यापैकी केवळ २० कोटी रुपयांचेच वितरण झाले आहे. या केंद्राच्या माध्यमातून राज्यभरात दररोज अडीच लाख गरजूंना दहा रुपयांत थाळी दिली जाते.

# वेळ येणार, नद्या आणि धरणांसह संपूर्ण काश्मीर आमचा असेल

## पहलगाम हल्ल्याचा मास्टरमाइंड सैफुल्लाह कसूरीची भारताला धमकी!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या २०-२५ वर्षांपासून तो दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी आहे. कसूरी वेळोवेळी भारताविरोधात वक्तव्ये करत असतो आणि पाकिस्तानी



लष्कर आणि आयएसआयच्या कार्यक्रमांमध्येही सहभागी होतो. महत्वाचे म्हणजे, त्याच्या सुरक्षिततेसाठी नेहमीच आधुनिक शस्त्रांनी सज्ज दहशतवादी तैनात असतात. जम्मू-काश्मीरातील पहलगाम येथे, याच वर्षात २२ एप्रिल रोजी पाकिस्तानच्यादहशतवाद्यांनी २६ निष्पाप नागरिकांची हत्या केली. यानंतर मे महिन्यात भारताने ऑपरेशन सिंदूरअंतर्गत यशस्वी कारवाई करत, पाकिस्तानातीलदहशतवादी तळांना लक्ष्य केले. या कारवाईनंतर पाकिस्तान अक्षरश? गुडघ्यावर आला. आता लष्कर-ए-तय्यबाचा उपप्रमुख सैफुल्लाह कसूरी याने पुन्हा एकदा भारताला पोकळ धमकी दिली आहे. सैफुल्लाह कसूरी म्हणाला, 'भारत सरकारने कान उघडून ऐकावे आणि आपल्या क्रूर समाजालाही सांगावे की, ती वेळ येणार आहे, जेव्हा या नद्या, ही धरणे आणि संपूर्ण जम्मू-काश्मीर आमचा असेल. आज जे काही घडत आहे, त्याचा बदला घेतला जाईल. आम्ही आमच्या जीवावर खेळू आणि आमच्या देशाच्या प्रत्येक भागाचे रक्षण करू. आम्ही आपल्या वतन-ए-अजीजच्या इंचा-इंचाचे संरक्षण करू.'

**कसूरीच्या धमकीनंतर यंत्रणा सतर्क** -कसूरीच्या धमक्यांनंतर भारतीय सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. देशात दहशतवादी कारवाया रोखण्यासाठी सर्व संभाव्य पावले उचलली जात आहेत. याचबरोबर, भारत दहशतवादाविरोधात आणखी कठोर कारवाई करत आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटना रोखल्या जाउ शकतील. सैफुल्लाह कसूरी हा पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील रहिवासी असून लष्कर-ए-तय्यबाचा उपप्रमुख आहे. कसूरी हा दहशतवादी हाफिज सईदचा जवळचा सहकारी असल्याचे मानले जाते. गेल्या २०-२५ वर्षांपासून तो दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी आहे. कसूरी वेळोवेळी भारताविरोधात वक्तव्ये करत असतो आणि पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआयच्या कार्यक्रमांमध्येही सहभागी होतो. महत्वाचे म्हणजे, त्याच्या सुरक्षिततेसाठी नेहमीच आधुनिक शस्त्रांनी सज्ज दहशतवादी तैनात असतात.

# खेडकर कुटुंब कुठे गायब झाले? अपहरण प्रकरणानंतर फोन बंद

## ◆ ऑनलाईन व्यवहारही नाही; पोलिसांचा शोध सुरू

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे आणि नवी मुंबई पोलीस बडतर्फ आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या कुटुंबियांचा शोध घेत आहेत. तीन दिवसांपूर्वी नवी मुंबईतून एका



ट्रक चालकाचे अपहरण केल्यानंतर खेडकर कुटुंबियांच्या पुण्यातील घरी सदर चालक आढळून आला होता. सोमवारपासून पोलीस दिलीप खेडकर यांचा शोध घेत असून त्यांचा फोन बंद आहे. तसेच खेडकर कुटुंबातील एकाही सदस्याने तीन दिवसांत एकही ऑनलाईन व्यवहार केलेला नाही, अशी माहिती आता समोर येत आहे.पोलीस अधिका-यांनी द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना म्हटले की, आम्ही खेडकर कुटुंबियांचा शोध घेत आहोत. पण त्यांनी त्यांचे फोन बंद ठेवले आहेत. तसेच ते संपर्कात नाहीत. आता आम्ही त्यांच्या निवासस्थानाच्या आसपास असलेले सीसीटीव्ही कॅमेरे तपासत आहोत, जेणेकरून ते ज्या वाहनातून पळाले, त्याची माहिती मिळू शकेल. नवी मुंबईच्या रबाळे येथून सिमेंट मिक्सर वाहन चालक तरुणाचे पूजा खेडकर यांचे वडील दिलीप खेडकर यांनी अपहरण केल्याचे पोलीस तपासात उघड झाले होते. यानंतर एकच खळबळ उडाली. मिक्सर वाहन चालक प्रल्हाद कुमार (२२ वर्षे) व त्याच्या सहका-याशी अपघातानंतर नुकसानभरपाईच्या वादावरून हा सर्व प्रकार घडल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांनी दिली. शनिवारी (१३ सप्टेंबर) रात्री मिक्सर वाहन चालक तरुण आणि दिलीप खेडकर यांच्या लँड क्रूझर गाडीचा किरकोळ अपघात झाला. अपघातात गाडी घासली घेल्याने खेडकर यांनी नुकसानभरपाईची मागणी केली असता, चालकाने पैसे देण्यास नकार दिला.

# स्व.मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग फेकला

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईच्या शिवाजी पार्क परिसरात असलेल्या मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर अज्ञात समाजकंटकांनी रंग फेकल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आज सकाळी घडलेल्या या प्रकारामुळे शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला आहे. सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली असून पुतळ्यावर आणि आजूबाजूच्या परिसरात लाल रंग पडलेला आढळून आला. या घटनेमुळे संतप्त झालेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आज सकाळी १० वाजण्याच्या सुमारास मीनाताईंच्या पुतळ्यावर आणि पुतळ्याच्या पायथ्याशी लाल रंग पडलेला आढळला. यानंतर ठाकरे गटाचे अनेक शिवसैनिक तातडीने शिवाजी पार्क येथे जमा झाले. संतप्त कार्यकर्त्यांनी तात्काळ पुतळ्याची साफसफाई सुरू केली. त्यांनी पुतळ्यावरील रंग काढण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले



आहे. यावर प्रतिक्रिया देताना ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला. कुणीतरी रंग फेकण्याचा प्रयत्न केला आहे. या समाजकंटक किंवा भेकडांच्या औलादीला कोणती संस्कृती, कोणते संस्कार झालेले नसतील. यांचा पोलिसांतर्फे शोध घेतला जात आहे. जे व्हायचं ते होईल, अशा प्रवृत्तींना पोलिस किंवा सरकारी यंत्रणा काय, आज तुमचे जे काही कर्तव्य आहे, ते नेमकं त्यावर काय चाललंय का, याचा निषेध करण्यापलीकडील या गोष्टी आहेत आणि त्यामुळे सरकार अपयशी ठरले हे आपल्याला प्रत्येक वेळी जाणवत आहे, असे अनिल देसाई म्हणाले.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पुतळा परिसरात धाव घेतली. सध्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे राजकीय वर्तुळातही जोरदार चर्चा सुरू झाली आहे. सध्या शिवाजी पार्क परिसरात पोलिस बंदोबस्तही वाढवण्यात आला आहे.

## महाराष्ट्र पेटवण्याचा प्रयत्न

आजचा प्रकार अत्यंत निंदनीय होता. ज्याला स्वतःच्या आई-वडिलांची नावं घ्यायला शरम वाटते, त्याने हे केलं असावं. महाराष्ट्र पेटवण्याचा हा



प्रयत्न असू शकतो. पोलिस या सगळ्या गोष्टीचा शोध घेत आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले. मुंबईत दादर शिवाजी पार्क येथे मीनाताई ठाकरे यांचा पुतळा आहे. शिवसैनिक त्यांना आदराने माँ साहेब म्हणतात. या मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर आज रंग फेकण्यात आल्याची घटना घडली. हा प्रकार शिवसैनिकांना समजल्यानंतर तिथे मोठ्या संख्येने शिवसैनिक जमा झाले. वातावरण तापले होते. त्यानंतर दुपारी तीनच्या सुमारास उद्धव ठाकरे तिथे आले. त्यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. बिहारमध्ये मोदींच्या मातोश्रीचा अपमान केला. त्या निमित्ताने बिहार बंद करण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. तसा हा महाराष्ट्र पेटवण्याचा प्रयत्न असू शकतो असे उद्धव ठाकरे म्हणाले. आठ-दहा वर्षांपूर्वी मीनाताई ठाकरेंच्या पुतळ्यासोबत असाच प्रकार घडला होता, त्यावर उद्धव ठाकरे म्हणाले की, भावना त्यावेळी तीव्र होत्या, आजही तीव्र आहेत. आम्ही शांत रहायला सांगितले आहे. मी म्हटलं तसं यामागे दोन प्रकारच्या व्यक्ती असू शकतात. ज्याला आई-वडिलांचे नाव घ्यायला शरम वाटते, अशा लावारिसने हे केले असावे.

## २४ तासांच्या आत आरोपींना शोधा

स्व. मीनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग फेकण्यात आल्याने शिवाजी पार्क परिसरात काहीशी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. अज्ञात व्यक्तीने मीनाताई



बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्यावर लाल रंग फेकला होता. त्यामुळे शिवसैनिक चांगलेच आक्रमक झाले आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही घटनास्थळावर भेट देत माहिती घेतली. यावेळी पोलिस अधिका-यांना राज ठाकरे यांनी तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी मीनाताई ठाकरे यांच्या मुंबईतील दादर शिवाजी पार्क परिसरात असलेल्या पुतळ्यावर अज्ञाताने रंग टाकल्याचे समोर आल्यानंतर तणाव निर्माण झाला आहे. सकाळच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आल्यानंतर शिवाजी पार्क परिसरामध्ये शिवसैनिक आणि ठाकरे गटाचे नेते दाखल झाले. त्यानंतर पुतळ्याची स्वच्छता करून घेण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेउन तपास सुरू केला. दुसरीकडे राज ठाकरे यांनीही २४ तासांच्या आत आरोपींना शोधून काढण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या आहेत. मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग फेकल्याचे कळल्यानंतर राज ठाकरे शिवाजी पार्कात दाखल झाले होते. यावेळी माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी त्यांना माहिती दिली. त्यानंतर राज ठाकरे यांनी पोलिस अधिका-यांना सूचना दिल्या. तसेच सीसीटीव्ही तपासून तात्काळ रिपोर्ट द्या असेही राज ठाकरे म्हणाले. २४ तासांच्या आत कळलं पाहिजे, असे राज ठाकरे यांनी म्हटले.

# कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप सुरू

***छ. संभाजीनगर /प्रतिनिधी-*** आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या निमित्ताने कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. बीडमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज पाच मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे आंदोलनाला यश मिळाल्याची भावना व्यक्त होत असून अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले आहेत. मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर २ सप्टेंबर २०२५ च्या काढलेल्या जीआरनंतर राज्यात अनेक जिल्ह्यांत कुणबी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले असून आज बीडमध्ये पाच जणांना कुणबी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.हैदराबाद गॅझेटच्या आधारे प्रमाणपत्र दिल्याची माहिती उपविभागीय अधिका-यांनी प्रमाणपत्रधारकांना दिली आहे. सर्व



प्रमाणपत्रांवर कुणबी असा उल्लेख करण्यात आला आहे. राज्यात ठिकठिकाणी कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप सुरू झाले आहे. कुठे-कुठे प्रमाणपत्र देण्यात आले, मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून धाराशिवमध्ये कुणबी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे. मराठवाड्यात पहिल्यांदाच धाराशिवमध्ये कुणबी प्रमाणपत्राचे वाटप झाले असून पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते चार कुणबी प्रमाणपत्रं देण्यात आली.तर हिंगोलीमध्येदेखील ५० कुणबी प्रमाणपत्र वितरित करण्यात आली. पालकमंत्री नरहरी झिरवळ यांच्या हस्ते ५० मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाले. हैदराबाद गॅझेटियरमध्ये नोंदी असलेल्या ५० मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले.दरम्यान मराठा आरक्षणाची मागणी लावून धरत सातत्याने आंदोलन करणारे मनोज जरांगे यांनीही यावर भाष्य केले आहे. मराठवाडा मुक्तिदिनानिमित्त त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. मराठवाड्याला मुक्ती मिळाली, पण मराठ्यांना मुक्ती मिळाली पाहिजे असे ते म्हणाले.

# नीटच्या विद्यार्थ्याची हत्या करणा-या आरोपीचा पोलिसांकडून एन्काउंटर

**गोरखपूर :** नीट परीक्षेची तयारी करत असलेल्या एका विद्यार्थ्याची गोतस्करांनी हत्या केल्याची घटना घडल्याने खळबळ उडाली होती. तसेच या घटनेविरोधात लोकांकडून तीव्र आंदोलनही होत होते. दरम्यान, या विद्यार्थ्याची हत्या करणा-या आरोपीचा पोलिसांनी एन्काउंटर केल्याची माहिती गोरखपूरमधून समोर आली आहे. एन्काउंटर करण्यात आलेल्या आरोपीचे नाव रहीम असे असून या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. गोरखपूरचे एसएसपी राजकरण नैय्यर यांनी सांगितले की, या घटनेतील आरोपींपैकी एक असलेल्या अजब हुसेन याला ग्रामस्थांनी पकडले होते. सध्या त्याची प्रकृती गंभीर असून तो रुग्णालयात उपचार घेत आहे. याशिवाय आणखी एक आरोपी असलेल्या रहीम याचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत होता.


# 394 नगरपरिषदा, नगरपंचायतींमध्ये नमो उद्यान विकसित करणार

## -उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई :**राज्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये वैशिष्ट्यपूर्ण व नवीन नगरपंचायत, नगरपालिका योजने अंतर्गत एक उद्यान विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करतानाच या उद्यानांना नमो उद्यान नाव देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. यानिर्णयामुळे राज्यातील एकूण ३९४ नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये नमो उद्यान वर्षभरात विकसित करण्यात येतील. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्राने दिलेली ही भेट असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले.नव्याने विकसित झालेल्या या उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

# दिशा पटानीच्या घरावरील गोळीबार प्रकरणातील दोन संशयित हल्लेखोरांचा मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ब?लीवूड अभिनेत्री दिशा पटानीच्या घरावर ११ सप्टेंबर रोजी रात्री गोळीबार करण्यात आल्याची घटना समोर आली होती. उत्तर प्रदेशातील बरेलीतील सिव्हिल लाईन्स परिसरात ही घटना घडली होती. या घटनेनंतर या प्रकरणातील हल्लेखोरांचा तपास पोलिसांकडून करण्यात येत होता. दरम्यान, यात या गोळीबार प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. पोलीस चकमकीत दोन संशयित हल्लेखोरांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.दरम्यान, उत्तर प्रदेश स्पेशल टास्क फोर्सने मंगळवारी गाझियाबाद येथील ट्रोनिका सिटी परिसरात केलेल्या कारवाई दरम्यान झालेल्या चकमकीत दिशा पटानीच्या बरेली येथील घरावरील गोळीबार प्रकरणात सहभागी असलेल्या दोन संशयितांचा मृत्यू झाला आहे. या



संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

वृत्तानुसार, रवींद्र उर्फ कल्लू आणि अरुण असं या चकमकीत मृत्यू झालेल्या संशयित हल्लेखोरांचं नाव आहे. हे दोन्ही गुन्हेगार रोहित गोदारा आणि गोल्डी ब्रार यांच्या टोळीतील सक्रिय सदस्य होते. ११ सप्टेंबर रोजी रात्री पटानीच्या घराबाहेर झालेल्या गोळीबारात वापरलेल्या मोटारसायकलवरून त्यांचा माग काढण्यात आला. दरम्यान, दिल्ली पोलीस, उत्तर प्रदेश आणि हरियाणा पोलिसांनी संयुक्तपणे केलेल्या कारवाई दरम्यान चकमक झाली. या चकमकीत दोन्ही गुन्हेगार गंभीर जखमी झाले. त्यानंतर रुग्णालयात दाखल करण्यात आलं मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला, असे पोलिसांनी एका निवेदनात ही माहिती दिल्याचं वृत्तात म्हटलं आहे. गोळीबाराच्या घटनेबाबत एफआयआर दाखल करण्यात आला होता आणि यामध्ये अभिनेत्री दिशा पटानीच्या वडिलांनी अनेक गंभीर आरोप केले होते. हल्लेखोरांचं लक्ष्य दिशा पटानीचे वडील जगदीश पटानी होते असा आरोप त्यांनी केला होता.



# कार-ट्रकच्या भीषण अपघातात 7 जागीच ठार

## ◆ मृतक एकाच कुटुंबातील ◆

**नेल्लोर/वृत्तसंस्था :** आंध्र प्रदेशातून हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. येथील नेल्लोर जिल्ह्यात बुधवारी वाळूने भरलेला ट्रक आणि कारमध्ये भीषण अपघात झाला, ज्यात एकाच कुटुंबातील सात जणांना जागीच आपला जीव गमवावा लागला. सर्व मृत नेल्लोर शहरातील रहिवासी होते आणि आत्मकुर सरकारी रुग्णालयात नातेवाईकांना भेटण्यासाठी जात होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेल्लोर जिल्ह्यातील संगम मंडलजवळ वाळूने भरलेला ट्रकने कारला जोरदार धडक दिली. यात एकाच कुटुंबातील १५ वर्षीय मुलीसह सात जणांचा मृत्यू झाला. धडक इतकी भीषण होती की, वाहन ल?रीखाली चिरडले गेल्यामुळे मृतदेह ओळख पटवणेही कठीण झाले. अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून लगेचच पळून गेला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी चालकाचा शोध सुरू आहे. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले. त्यांनी अधिका-यांना शोकग्रस्त कुटुंबांना पूर्ण पाठिंबा आणि मदत देण्याचे निर्देश दिले. चंद्राबाबूंनी अपघाताची सखोल चौकशी करण्याचे आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांनीदेखील या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले. भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी त्यांनी अधिका-यांना आवश्यक त्या सर्व खबरदारीच्या उपाययोजना करण्याचे आवाहन केले.

# 2 महिला नक्षलींचा खात्मा

## एटापल्लीच्या जंगलात पोलिस आणि नक्षलवाद्यांत जोरदार चकमक

**गडचिरोली :** एटापल्ली तालुक्यातील गट्टा जांबिया पोलिस ठाणे हद्दीतील मोडस्के जंगल परिसरात झालेल्या चकमकीत दोन महिला नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात पोलिसांना १७ सप्टेंबर रोजी यश



आले आहे. घटनास्थळावरून ए-४७ रायफल, अत्याधुनिक पिस्तूल, जिवंत दारुगोळा व नक्षली साहित्य मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात आले आहे. या चकमकीमुळे नक्षली संघटनांना मोठा धक्का बसला आहे. मोडस्के जंगल परिसरात काही नक्षली दडून बसल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार, अहेरी येथून अपर अधीक्षक सत्यसाई कार्तिक यांच्या नेतृत्वात सी-६० जवान १७ रोजी सकाळी सात वाजता रवाना केले होते, केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या १९१ बटालियनची कंपनी व गट्टा जांबिया ठाण्यातील पथकाच्या मदतीने सी- ६० जवानांनी संपूर्ण जंगलाला वेढा टाकून १ नक्षलविरोधी अभियान सुरु केले.

**मृतांची ओळख पटविणे सुरु** -या अभियानादरम्यान माओवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार केला, यास जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. चकमकीनंतर परिसरात घेण्यात आलेल्या सर्च ऑपरेशनमध्ये दोन महिला नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळले. त्यांची ओळख पटविण्याचे काम सुरू असून ते गट्टा दलमशी संबंधित असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्तकेला आहे. घटनास्थळावरून पोलिसांनी एक ए-४७ रायफल, एक अत्याधुनिक पिस्तूल, जिवंत दारुगोळा तसेच नक्षली साहित्य जप्त केले आहे. या धडक कारवाईमुळे नक्षलवाद्यांची कंबर मोडली असून जवानांचे अभियान अजूनही सुरू आहे असे पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितले.

# महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करा

## ◆ विजय वडेट्टीवार यांची मागणी ◆

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने तब्बल ३० जिल्ह्यात नुकसान झाले आहे. राज्यातील १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर इतके क्षेत्र या पावसाने बाधित झाल्याने नुकसानीचे पंचनामे करून राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ



पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून केली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. सोयाबीन, मका, कापूस या पिकांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे शेतक-यांचा रब्बी हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतक-यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी. तसेच बँकेकडून शेतक-यांची होणारी वसुली थांबवावी. पिक विमा कंपन्यांनी तातडीने शेतक-यांना मदत करावी असेही वडेट्टीवार यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

# EVMवर आता उमेदवारांचे रंगीत छायाचित्र असेल

## ● मतदारांना सहज वाचता यावे म्हणून नावे मोठ्या अक्षरात असतील ● बिहार निवडणुकीपासून सुरुवात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ईव्हीएम मतपत्रिकेवर आता उमेदवारांचे रंगीत छायाचित्रे असतील. शिवाय, उमेदवारांचे क्रमांक आणि फॉन्ट आकार मोठा असेल, ज्यामुळे मतदारांना ते वाचणे आणि पाहणे सोपे होईल. एएनआय वृत्तसंस्थेनुसार, निवडणूक आयोग (ईसीआय) बिहार विधानसभा निवडणुकीपासून या उपक्रमाची सुरुवात करेल. यासाठी निवडणूक आयोगाने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

निवडणूक आयोगाने सांगितले की, मतदारांची सोय आणि निवडणूक प्रक्रिया सुधारण्यासाठी गेल्या सहा महिन्यांत राबविण्यात आलेल्या २८ सुधारणांचा हा एक भाग आहे. ईव्हीएम मतपत्रिकेत सर्व उमेदवारांची नावे, निवडणूक चिन्हे आणि छायाचित्रे असतात. मतदार हे पाहून मतदान करतात. निवडणूक नियम, १९६१ च्या नियम ४९ब अंतर्गत, ईव्हीएम मतपत्रिकेच्या डिझाइन आणि छपाईसाठी विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्यांची स्पष्टता आणि वाचनीयता वाढविण्यासाठी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**ईव्हीएम मतपत्रिकेत फान्ट आकार ३० आणि ठळक अक्षरात असेल**-निवडणूक आयोगाने सांगितले की उमेदवार/नोटा क्रमांक आंतरराष्ट्रीय स्वरूपात भारतीय अंकांमध्ये (म्हणजे १, २, ३...) छापले जातील. स्पष्टतेसाठी, फान्ट आकार ३० आणि ठळक असेल. निवडणूक आयोगाच्या निवेदनानुसार, ईव्हीएम मतपत्रिका ७० जीएसएम कागदावर छापल्या जातील. विधानसभा निवडणुकीसाठी विशेष आरजीबी




गुलाबी कागद वापरला जाईल. सर्व उमेदवार/नोटा नावे एकाच फॉन्ट प्रकारात आणि फॉंट आकारात, मोठ्या अक्षरात छापली जातील.

**SIR बाबत निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण:**अर्ध्याहून जास्त मतदारांना कागदपत्रे मागणार नाही, १९८७नंतर जन्मलेल्यांना पालकांची कागदपत्रे द्यावे लागतील.निवडणूक आयोगाने (EC) बुधवारी सांगितले की, बहुतेक राज्यांमधील अर्ध्याहून अधिक मतदारांना विशेष सघन पुनरावृत्ती (SIR) दरम्यान कोणतेही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही कारण त्यांची नावे मागील SIR च्या मतदार यादीत समाविष्ट आहेत.पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, आयोगाच्या अधिका-यांनी सांगितले की, शेवटचा एसआयआर प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या वर्षांत करण्यात आला होता. बहुतेक ठिकाणी ही प्रक्रिया २००२ ते २००४ दरम्यान झाली. ज्यांची नावे त्यावेळी मतदार यादीत होती त्यांना त्यांची जन्मतारीख किंवा जन्मस्थान सिद्ध करण्यासाठी कोणतीही नवीन कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. उदाहरणार्थ, बिहारमध्ये, २००३ च्या एसआयआर यादीचा वापर मतदानासाठी आधार म्हणून करण्यात आला. त्या यादीत सुमारे ५ कोटी मतदार (६०%) आधीच नोंदणीकृत होते, त्यामुळे त्यांना कोणतेही अतिरिक्त कागदपत्रे देण्याची आवश्यकता नव्हती. सुमारे ३ कोटी नवीन मतदारांना (४०%) ११ विहित कागदपत्रांपैकी एक कागदपत्र देण्यास सांगण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, आधार कार्ड देखील १२ वे कागदपत्र मानले गेले.

# संपादकीय

प्रबंध संपादकः प्रदीप देशपांडे

## साहित्यिक ‘विश्वास’

९९ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि पानिपतकार विश्वास पाटील यांची निवड यंदा बहुमताने करण्यात आली. साहित्यिकांच्या सरकारी पैशाने मिरवण्याचा उत्सव असे जे स्वरूप या उत्सवाला आले होते त्याला यंदा विश्वास पाटील यांच्यासारख्या समर्थ साहित्यिक आणि कादंबरीकाराच्या निवडीमुळे छेद दिला गेला,असे म्हणावे लागेल. विश्वास पाटील हे नाव साहित्य जगतात आदराने घेतले जाते. ते सनदी अधिकारी तर होतेच पण ‘पानिपत’, ‘महानायक’ आणि 'झाडाझडती' सारख्या काही प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्यांचे लेखकही आहेत. त्यामुळे साहित्यिक म्हणून त्यांचा दरारा कायम आहे. यापूर्वी काही अध्यक्ष होऊन गेले. मध्यंतरी साहित्य संमेलने नकोतच असे म्हणणारा गट निर्माण झाला होता. पण संमेलने चालू आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत त्यांचे प्रत्येक लेखन हे आदरास पात्र असते. भले ते कुणाला आवडो अथवा न आवडो पण साहित्यिक म्हणून त्यांचे मूल्यमापन करता येईल. त्यादृष्टीने विश्वास पाटील यांची निवड ही अत्यंत योग्य आहे. साताऱ्यासारख्या शहरात होणाऱ्या संमेलनात ती यथार्थ आहे. साहित्य संमेलन आणि वाद काही नवे नाही. अगदी पहिल्या संमेलनात म्हणजे १८७८ साली झालेल्या साहित्य संमेलनात वाद गाजला होता, तो म्हणजे तेव्हाचे वंचितांचे पुढारी महात्मा जोतिबा फुले यांना आमंत्रण देऊनही ते स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला होता आणि त्यामुळे हा वाद गाजला होता. १९७५ च्या साहित्य संमेलनात तर दुर्गा भागवत यांनी मंत्री यशवतराव चव्हाण यांना व्यासपीठावर बसण्यास मनाई केली होती. त्यामुळे यशवंतराव तेव्हा सभागृहात बसले होते. साहित्य समेलनांना वादाची पार्श्वभूमी आहे. यापूर्वी झालेल्या साहित्य संमेलनात सरकारी हस्तक्षेपामुळे संमेलनच नको म्हणून ते गाजले होते. याला अपवाद गेल्या वर्षी दिल्ली येथे झालेल्या साहित्य संमेलनाचाही करता येणार नाही. कारण त्या संमेलनात सरकारी हस्तक्षेप सरळ सरळ दिसत होता. सरकारी हस्तक्षेपास कुणाचाच विरोध नाही, पण त्यालाही एक मर्यादा हवी. पण साहित्यिकच आपल्या माना जर राजकारण्याच्या हातात देणार असतील तर मग त्यांना दोष देता येणार नाही. आजवर असेच होत आले आहे. दुर्गा भागवतांसारखे अपवाद सोडले तर बरेचसे साहित्यिक सरकारपुढे नांग्या टाकणारे ठरले आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत तसे म्हणता येणार नाही. सरकारपुढे नांग्या टाकू नका. याचा अर्थ नेहमीच त्यांच्याविरोधात तलवारी उपसून बसा असेही नाही. पण योग्य वेळी आपला स्वाभिमान दाखवला पाहिजे.विश्वास पाटील यांनी सरकारी नोकरी करताना वेळोवेळी तसा स्वाभिमान दाखवला आहे; परंतु विश्वास पाटील यांच्याबाबतीत असे वाद होण्याची शक्यता दिसत नाही, कारण त्यांचे साहित्यिक स्थान आज प्रचंड उंच आहे आणि त्यामुळे त्यांच्यावर कुणी प्रश्नचिन्ह उपस्थित करणार नाही. शिवाय विश्वास पाटील यांची निवड एकमताने झाली आहे. मुख्य प्रश्न हा आहे, की मराठी साहित्य वाचणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे आणि मराठी वाचन तर हल्ली दुर्मीळच झाले आहे. त्याबाबतीत विश्वास पाटील हे काही तरी करू शकतील. त्यांनीच सांगितले आहे, की नुसते एक गाव वाचनालयाचे म्हणून चालणार नाही तर गावोगावी वाचनालय चळवळ सुरू करावी लागेल. याबाबतीत विश्वास पाटील यांनी वर्षभराच्या मुदतीत काही तरी ठोस करावे हीच अपेक्षा त्यांच्याकडून आहे. आज मराठी साहित्यापुढे अनेक प्रश्न आहेत. मराठी शाळा बंद पडत आहेत आणि मराठी लोक महाराष्ट्रापासून दूर जात आहेत. परभाषिकांनी आक्रमण केले आहे आणि प्रत्येक क्षेत्रात मराठी लोक मागे हटत आहेत किंवा हटवले जात आहेत. याबाबतीत विश्वास पाटील यांनी चळवळ उभारावी हे अपेक्षित आहे. कारण त्यांनी वाचनालय चळवळ उभारण्याचे संकेत दिले आहेत तसेच ते मराठी शाळा वाचवण्यासाठी काही तरी करतील. प्रत्येक मराठी साहित्य संमेलनाने या अगोदर शब्द दिला होता. पण पुढे काहीही झाले नाही. मराठी वाचकांची संख्या फारच कमी आहे आणि आपल्याकडे ना. सी. फडके, आचार्य अत्रे वगैरे वाचणाऱ्यांची पिढी एकेकाळी होती, ती आता अस्तंगत झाली आहे. नव्या पिढीला हॅरी पॉटर वाचण्याचे वेड आहे आणि तेही जाऊन आता मोबाइल आणि इतर गॅझेटेचे वेड आहे. त्यापासून नव्या पिढीला वाचवायचे कसे असा यक्षप्रश्न आहे. तो विश्वास पाटील आणि त्यांच्यासारख्या साहित्यिकांवर ही फार मोठी जबाबदारी आहे. कारण त्यांच्यावरच हे शिवधनुष्य पेलण्याची ताकद आहे आणि त्यांच्याकडे तितकी प्रतिभाही आहे.विश्वास पाटील हे शेतकरी कुटुंबातून आलेले. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील नेर्ले येथे झाला. त्यांचे वडील चौथी पास होते, तर आईने शाळाही पाहिली नाही. त्यांचा विश्वास हा पुत्र आज सनदी अधिकारी म्हणून निवृत्त झाला. त्यांनी प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्या लिहिल्यात. ‘पानिपत’ आणि ‘महानायक’ ही सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावरील कादंबरी प्रचंड गाजली. शेतकरी कुटुंबातून आलेल्या विश्वास यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची दुःखे आणि वेदना यांचा जवळून परिचय होता, पुढे ते शासकीय सेवेत रुजू झाले तेव्हा त्यांच्या ते कामी आले. शासकीय सेवेत असताना त्यांनी शासकीय योजनांचा लाभ लोकांना कसा देता येईल हे पाहिले. पण त्यांच्या साहित्यिक योगदानाविषयी बोलताना असे म्हणता येईल, की त्यांची साहित्यिक वीण ही त्यांना कादंबरी लेखनाकडे घेऊन गेली. ‘महानायक’ असो की 'झाडाझडती' या सर्व कादंबऱ्यांतून उपेक्षित वर्गाची तडफड दिसते. पानिपतचा अपवाद वगळता त्यांची ही उपेक्षितांची तडफड नेहमीच केंद्रस्थानी राहिली आहे. साहित्य संमेलन म्हणजे केवळ तीन दिवस मिरवण्याचा उत्सव ही प्रथा विश्वास पाटील बदलून टाकतील यात काही शंका नाही. साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने जनसामान्यांची चळवळ कशी होईल हे पाटील पाहतील यात शंका नाही. विश्वास पाटील यांच्या निवडीने एक सर्वोत्कृष्ट कादंबरीकार आणि साहित्यिकाची निवड झाली आहे. त्यांच्याकडून मराठी रसिकांना अपेक्षाही तितक्याच आहेत.

# नव्या दोस्तीची अमेरिकेला धास्ती

**डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ नीतीमुळे चीन, भारत, रशिया अमेरिकेची व्यूहनीती झुगारून एकत्र आले. अमेरिकन तज्ज्ञांकडून तसेच परराष्ट्र व्यवहारातील जाणकारांकडून त्याबाबत ट्रम्प यांना इशारे दिले जात होते. शांघाय सहकार्य परिषदेनंतर त्याची जाणीव व्हायला लागल्यामुळे ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले. हे तीन देश एकत्र येण्याची अमेरिकेला धास्ती का आहे, याचा हा लेखाजोखा.**



चीनने गेल्या आठवड्यात आपल्या शक्तीचं प्रदर्शन केले. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीला ८० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित लष्करी परेडमध्ये हे शक्तिप्रदर्शन करण्यात आले. हजारो किलोमीटर अंतरावर वॉशिंग्टन डीसीमध्ये उपस्थित असलेले अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पदेखील यावर लक्ष ठेवून होते. ते म्हणाले, की मी ते पाहावे अशी त्यांची इच्छा होती आणि मी ते खरोखर पाहत होतो. तियानमेन चौकात झालेल्या या भव्य समारंभाबद्दल अमेरिकन अध्यक्षांनी तपशीलवार काहीही सांगितले नाही; परंतु त्यांनी ‘खूप, खूप प्रभावी’ असे वर्णन केले. दुसरीकडे, ट्रम्प आणि उर्वरित जगासाठी चीनचा संदेश अगदी स्पष्ट होता. तो संदेश असा होता की, जगात एक नवीन शक्ती केंद्र तयार होत आहे. ते शंभर वर्षे जुन्या अमेरिकन वर्चस्व व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी सज्ज आहे. ही लष्करी परेड आयोजित केली जात होती, त्या दिवशी ट्रम्प ओव्हल ऑफिसमध्ये पोलंडच्या राष्ट्राध्यक्ष कॅरोल नवरात्स्की यांना भेटत होते. त्या वेळी ते चीनच्या या लष्करी परेडबद्दल जास्त काही बोलले नाही. चीनसोबतच्या ‘टॅरिफ वॉर’ दरम्यान घडलेल्या घटनांबद्दल ट्रम्प यांच्या विधानांमध्ये उदासीनता, तक्रार आणि चिंता यांचे मिश्रण स्पष्टपणे दिसून येत होते. परेडबद्दल ट्रम्प निष्काळजी दिसले. त्यांनी सांगितले, की दोन डझनहून अधिक राष्ट्रप्रमुखांसमोर चीन करत असलेल्या शक्तिप्रदर्शनाची चिंता नाही. तथापि, चीन दुसऱ्या महायुद्धातील योगदानाचे श्रेय अमेरिकेला देत नाही, याबद्दल त्यांनी तक्रार केली. तुम्ही अमेरिकेविरुद्ध कट रचत असताना कृपया पुतीन आणि किम जोंग उन यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा कळवा, असे ते उपहासाने म्हणाले. एकंदरीत, इतर राष्ट्रांचे एकत्र येणे ट्रम्प यांना अस्वस्थ करत आहे.

ट्रम्प यांना परेड आणि लष्करी शक्तीच्या प्रात्यक्षिकांबद्दल विशेष प्रेम आहे. गेल्या महिन्यात त्यांनी अलास्कामध्ये पुतीन यांचे लाल कार्पेटवर स्वागत केले. त्यांच्या डोक्यावरून स्टेल्थ बॉम्बर आणि अमेरिकन जेट उडत होते. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी अमेरिकन सैन्याच्या २५०व्या वर्धापन दिनानिमित्त वॉशिंग्टनमध्ये लष्करी परेडचे आयोजन केले होते. चीनची नवीनतम लष्करी परेड उच्च तंत्रज्ञानाची शस्त्रे आणि शिस्तबद्ध मार्चिंगसाठी ओळखली गेली. त्या तुलनेत अमेरिकेच्या लष्करी इतिहासाची आठवण करून देणारी अमेरिकन परेड ही एक सामान्य घटना होती. तिथे दुसऱ्या महायुद्धात वापरले जाणारे टँक आणि क्रांतिकारी काळातील सैनिक व्हाईट हाऊसजवळील कॉन्स्टिट्यूशन अव्हेन्यूवर आरामात फिरताना दिसले. ट्रम्प यांच्या ‘मेक अमेरिका ग्रेट अगेन’ या घोषणेवर आधारित ही एक प्रकारची आठवणींना उजाळा देणारी घटना होती. अमेरिकेच्या गौरवशाली इतिहासाकडे मागे वळून पाहताना आणि या कार्यक्रमाद्वारे ट्रम्प १९व्या शतकातील त्या काळाची आठवण करताना दिसले. त्याला ते ‘अमेरिकन इतिहासातील सर्वात महान युग’ म्हणतात.चीनच्या लष्करी परेडमध्ये त्याची भविष्यातील शस्त्रे प्रदर्शित करण्यात आली आणि तेथील कम्युनिस्ट सरकारने हेदेखील दाखवण्याचा प्रयत्न केला की दुसऱ्या महायुद्धात फॅसिझम आणि साम्राज्यवादाला पराभूत करण्यात चीनने मोठी भूमिका बजावली. त्या युद्धाने तथाकथित ‘अमेरिकन शतका’ची सुरुवात केली असेल, तर चीन आता नवी जागतिक व्यवस्था निर्माण करण्यात यशस्वी होईल, असा त्यांचा दावा आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात त्यांचे सहाय्यक असलेले रिचर्ड विल्की म्हणाले की दुसऱ्या महायुद्धात जपानच्या पराभवात चिनी राष्ट्रवादी आणि अमेरिकन सैन्याचे योगदान चिनी कम्युनिस्ट सैन्याच्या योगदानापेक्षा जास्त होते. तथापि, या आठवड्यात चीनची लष्करी परेड हे अमेरिकेला चिंता करण्याचे एकमेव कारण नव्हते. याशिवाय अमेरिकन धोरणकर्त्यांना चिंता वाटावी, अशी आणखी बरीच कारणे होती. तियानजिनमधील शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दरम्यान, चीन आणि भारतातील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचे एक मोठे कारण म्हणजे ट्रम्प यांनी भारतावर लादलेले शुल्क. त्याचा भारत आणि अमेरिकेतील मैत्रीवर विपरीत परिणाम झाला आहे. ट्रम्प यांच्या ‘अमेरिका फर्स्ट’ धोरणामुळे जगाचे आर्थिक आणि राजकीय ध्रुवीकरण बिघडले आहे. प्रतिस्पर्धी मानले जाणारे चीन, रशिया आणि भारत हे देश बदललेल्या परिस्थितीत एकत्र कसे येऊ शकतात याचे एक उत्तम उदाहरण आहे.ट्रम्प यांनी अमेरिकन उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी आणि सरकारसाठी नवीन महसूल उभारण्यासाठीच्या योजनेचा एक भाग म्हणून शुल्कांचे समर्थन केले आहे. ट्रम्प समर्थित ‘अमेरिका फर्स्ट फॉरेन पॉलिसी इन्स्टिटयूट’मधील अमेरिकन सिक्युरिटीचे सह-अध्यक्ष रिचर्ड विल्की म्हणतात, कोरियन, जपानी, फिलिपिन्स आणि व्हिएतनामी लोकांना हे चांगलेच ठाऊक आहे की खरा धोका त्यांच्या अमेरिकेसोबतच्या व्यापार भागीदारीतील किरकोळ अडथळे नसून चीनच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याचा आहे. ट्रम्प अनेकदा इतर देशांमधील संघर्ष आणि चिंतांबद्दल उदासीन राहिले आहेत. त्याबाबत मदत करत नाही. त्याऐवजी ते ग्रीनलँड, पनामा आणि कॅनडासारख्या भौगोलिकदृष्ट्या अमेरिकेच्या जवळ असलेल्या देशांमधील समस्यांबद्दल उत्सुकता दाखवत आहेत. विजय दिनाच्या परेडमध्ये चीनने जगाला आपले लष्करी सामर्थ्य दाखवले. त्यातून लक्षात आले की, ट्रम्प यांच्या व्यापार धोरणांमुळे अमेरिकेचा विजय होण्याऐवजी अपयश येण्याचा धोका आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या अमेरिका केंद्रित व्यापार व्यवस्थेचा भाग म्हणून लादलेले शुल्क अमेरिकन न्यायालये रद्द करू शकतात. नव्हे, तशी चिन्हे वाढत आहेत. गेल्या आठवड्यात एका अपील न्यायालयाने निर्णय दिला, की ट्रम्प यांचे बरेच शुल्क संघीय कायद्याच्या चुकीचा अर्थ लावण्यावर आधारित होते; पण ट्रम्प यांनी या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयात ट्रम्प यांचे समर्थक मानले जाणारे रूढीवादी न्यायाधीशांचे वर्चस्व असले, तरी काँग्रेसच्या परवानगीशिवाय प्रमुख धोरणे अमलात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रपतींविरुद्ध त्यांनी खूप कठोर भूमिका घेतली आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्या शुल्कांवर ते सौम्य भूमिका घेतील, अशी शक्यता कमी आहे. व्यापाराच्या बाबतीत ट्रम्प नेहमीच त्यांच्या मनाचे ऐकत आले आहेत. त्यांनी अनेक पारंपरिक धोरणे बदलली असून नवीन व्यापारी भागीदार बनवले आहे. ट्रम्प यांनी दावा केला आहे, की त्यांचे व्यापार धोरण अमेरिकेला ‘दुसऱ्या सुवर्णयुगाकडे’ घेऊन जाईल; पण तियानमेन चौकातील चिनी लष्करी परेड असो किंवा अमेरिकन न्यायालये; ट्रम्प यांच्या शुल्कामुळे निर्माण झालेला धोका काल्पनिक नाही, तर वास्तविक आहे. भारताच्या वृत्तीबद्दल ट्रम्प यांची चिडचिड वाढत असल्याचे दिसून आले. एकीकडे भारत अमेरिकेच्या दबावापुढे झुकला नाही, तर दुसरीकडे अमेरिका आपल्या देशातच अनेक समस्यांनी वेढली गेली आहे. असे असूनही, ट्रम्प यांची हेकेखोरी कायम होती; परंतु आता त्यांना वास्तवाची जाणीव झाली असावी. त्यामुळे अगोदर त्यांनी चीनमुळे भारत, रशियासारखे मित्र आम्ही गमावले, असे म्हटले होते. त्यानंतर दोनच दिवसांमध्ये त्यांनी भारताचे आणि मोदी यांचे कौतुक केले. भारत आणि अमेरिका यांच्यात एक विशेष संबंध आहे. इतकेच नाही, तर त्यांनी आपण नेहमीच मोदी यांचे मित्र राहू असे म्हटले. ते एक महान पंतप्रधान आहेत, अशीही पुस्ती जोडली. ट्रम्प यांचे बदललेले सूर पाहता भारताच्या दबावाच्या परराष्ट्रनीतीचा परिणाम झालेला दिसतो.

**प्रा. जयसिंग यादव**

# बिहारमध्ये कॉंग्रेसची पत वाढली !

बिहारमध्ये कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी नुकतीच जी व्होटर अधिकार यात्रा काढली होती, त्या यात्रेला बिहार मधील जनतेने चांगला प्रतिसाद दिला होता.त्या यात्रेचा मते मिळवण्यासाठी किती फायदा होईल,हे येणारा काळच ठरवेल.परंतु त्यामुळे बिहार मधील कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये मात्र उत्साहाचे वातावरण पहायला मिळत आहे.१९९० नंतर बिहारमध्ये कॉंग्रेसची जी घसरगुंडी सुरू झाली,ती अद्याप कायम असली तरी, राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेमुळे कॉंग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले,ही गोष्ट कबूल करावीच लागेल.

गेली ३५ वर्षे बिहारमध्ये दुय्यम स्थान पत्करणाऱ्या कॉंग्रेसने या खेपेस जागा वाटपात आक्रमक भूमिका घेण्याचे ठरवलेले दिसत आहे.अर्थात कॉंग्रेसच्या बिहार मधील बिकट परिस्थितीला पक्षाचे चुकीचे धोरणच कारणीभूत ठरले आहे.लालूप्रसाद यादव यांच्या पक्षाबरोबर सतत निवडणुक समझोता केल्यामुळे, कॉंग्रेसची बिहार मधील वाढ खुंटली.लालूप्रसाद यादव हे जागा वाटपात जेवढ्या जागा सोडतील,त्यावर कॉंग्रेसने समाधान मानल्यामुळे, कॉंग्रेसचा पारंपरिक मतदार पक्षापासून दूर गेला.गेली अनेक वर्षे मोजक्याच जागांवर लढल्यामुळे, कॉंग्रेसला राज्यभर आपले हातपाय पसरता आले नाहीत.



कॉंग्रेसचा जो निष्ठावान मतदार होता,तो कॉंग्रेसची साथ सोडून इतर पक्षांकडे वळला.राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेनंतर, इतकी वर्षे कॉंग्रेसपासून दुरावले ला, मतदारवर्ग काही प्रमाणात कॉंग्रेसकडे परतल्या स,लवकरच होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणु कीत, कॉंग्रेसची कामगिरी पुर्वा पेक्षा चांगली होऊ शकेल. २०१५ मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत जागावाटपात कॉंग्रेसच्या वाट्याला ४१ जागा आल्या होत्या.त्यापैकी २७ जागा जिंकून कॉंग्रेसने बऱ्यापैकी कामगिरी केली होती.मात्र २०२० च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसने आपल्या ताकदीपेक्षा जास्त जागांची मागणी केली आणि कॉंग्रेसचे गणित तिथेच चुकले. २०२० च्या विधान सभा निवडणुकीत कॉंग्रेसला जागा वाटपात ७० जागा सोडण्यात आल्या होत्या.मात्र कॉंग्रेसला त्यापैकी फक्त १९ जागाच जिंकता आल्या आणि तब्बल ५१ जागांवर कॉंग्रेसला पराभव पत्करावा लागला.

कॉंग्रेसचे आपल्या पराभवा बाबत असे विश्लेषण होते की ज्या जागांवर बरीच वर्षे महाआघाडीचे (राजद, कॉंग्रेस, कम्युनिस्ट वगैरे) उमेदवार विजयी झाले नाहीत,अशा पडीक जागा मोठ्या प्रमाणात कॉंग्रेसला सोडण्यात आल्या होत्या.मात्र या खेपेस मागचा अनुभव लक्षात घेऊन, कॉंग्रेसने आपल्या धोरणात सुधारणा करण्याचे ठरवलेले दिसत आहे.कॉंग्रेसने लढवण्यासाठी चांगल्या जागा आणि वाईट जागा असे वर्गीकरण केले असून,ज्या ठिकाणी सहज विजय मिळवता येईल त्या चांगल्या जागा आणि ज्या ठिकाणी विजयाची खात्री देता येणार नाही त्या वाईट जागा, असे पृथक्करण केलेले दिसत आहे.गेल्या खेपेस कॉंग्रेसने ज्या जागा (१९) जिंकल्या होत्या त्यावर जागा ा ा ट प ा ा त ा , कॉंग्रेस,आपला दावा सांगेलच, शिवाय कॉंग्रेस ज्या जागांवर पाच हजारच्या आसपास मतांनी गेल्या खेपेला हरली,त्या जागांवरही, कॉंग्रेस या खेपेस आपला दावा सांगण्याची शक्यता आहे.

भारंभार जागा लढविण्या पेक्षा ज्या जागा जिंकण्याची पक्षाची क्षमता आहे,त्या जागा लढवण्याचा निर्णय कॉंग्रेसने घेतलेला दिसत आहे.अर्थात आघाडीच्या जागावाटपात प्रत्येक घटक पक्षाला आपली मागणी तुटेपर्यंत ताणता येत नाही.शेवटी तडजोड ही करावीच लागते.राजद प्रणित महाआघाडीचे जागा वाटप वाटते तितके सोपे असणार नाही,याची कल्पना सर्व घटक पक्षांना असेलच.मात्र राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेमुळे कॉंग्रेसची बार्गेनिंग पॉवर निश्चितपणे वाढली आहे. महाआघाडीतील प्रत्येक घटक पक्षाला जास्तीत जास्त जागा लढवायच्या आहेत. राजद हा महाआघाडी मधील सर्वात मोठा घटक पक्ष आहे.गेल्या खेपेस राजदने १४४ जागा लढवल्या होत्या आणि त्यापैकी ७५ जागांवर पक्षाला विजय मिळाला होता.१७ जागांवर पक्षाला पाच हजारच्या आसपास मतांनी पराभव पत्करावा लागला होता.त्यामुळे त्या ९२ जागांवर पक्षाचा दावा पक्का असेल.राजदचे असे म्हणणे आहे की गेल्या खेपेला मित्र पक्षांच्या दबावाखाली येऊन, पक्षाने २०१५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकलेल्या काही जागा, मित्र पक्षांसाठी सोडल्या होत्या.त्यामुळे तेथील पक्षाच्या विजयी उमेदवारांनी बंडखोरी केली आणि त्यामुळे आघाडीच्या काही उमेदवारांना पराभव पत्करावा लागला.ही गोष्ट लक्षात घेता, यावेळी जागा वाटप करताना, प्रत्येक घटक पक्षाने गेल्या खेपेला ज्या जागा जिंकल्या होत्या,त्या जागा त्याच पक्षाला सोडण्याचा निर्णय घेतला जाईल,असे दिसत आहे.अर्थात याबाबतीत काही जागांचा अपवाद केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मध्यंतरी राजदचे नेते तेजस्वी यादव यांनी स्वतःला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार घोषित केले होते.त्यावर कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी प्रतिक्रिया व्यक्त करणे, टाळले होते.मात्र महाआघाडीतील सर्वात मोठ्या पक्षाचे नेते म्हणून तेजस्वी यादव यांनी स्वतःला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून घोषित करणे यामध्ये गैर असे काहीच नाही.प्रश्न एवढाच आहे की महाआघाडीतील इतर घटक पक्षांशी सविस्तर चर्चा करून मगच तेजस्वी यादव यांनी तशी घोषणा करायला हवी होती.राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेमुळे कॉंग्रेसच्या अपेक्षा वाढल्या आहेत.त्यामुळे जागा वाटपाच्यावेळी काही समस्या निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.त्यातच विकासशिल इन्सान पार्टी आणि पशुपती पारस यांच्या नेतृत्वाखालील लोक जनशक्ती पार्टी हे दोन पक्ष नव्याने महाआघाडीत सामील झाले आहेत.

त्यांच्याकरता काही जागा सोडाव्या लागणार आहेत.त्याशिवाय झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखालील झारखंड मुक्ती मोर्चा या पक्षाने, महाआघाडीकडे काही जागांची मागणी केली आहे.या सर्व गोष्टी लक्षात घेता, महाआघाडीतील जागा वाटप नक्कीच सोपे असणार नाही.

**अभय गोखले**

## तुळजाभवानी नवरात्र उत्सवाला प्रमुख राज्य महोत्सवाचा दर्जा

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या आणि अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या आदिशक्ती, कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या शारदीय नवरात्र महोत्सवाला राज्याच्या प्रमुख महोत्सवाचा प्रतिष्ठित दर्जा मिळाला आहे. २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत, घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत साजरा होणारा हा नवरात्र महोत्सव कर्नाटकाच्या म्हैसूर येथील दसरा महोत्सवाच्या धर्तीवर आयोजित करण्यात येणार असून यावेळी धार्मिक विधींसोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. यामध्ये स्थानिक लोककला, गोंधळी गीत, भारूड, जाखडी नृत्य इत्यादी पारंपरिक कलांचे सादरीकरण होणार आहे. तसेच गोंधळ, भजन आणि कीर्तन या अनुषंगाने धार्मिक-सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे नवरात्र थीमवर आधारलेला व ३०० ड्रोनद्वारे साकारलेला भव्य लाईट शो हे या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण असणार आहे. या महोत्सवासाठी महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, कर्नाटक, तेलंगणा इत्यादी राज्यातून ५० लाख भाविक देवीच्या दर्शनार्थ तुळजापुरात येतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. शारदीय नवरात्र उत्सवाला राजमान्यता मिळाल्यामुळे महाराष्ट्राची धार्मिक व सांस्कृतिक ओळख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक दृढ होण्यासोबतच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे ही जमेची बाजू आहे.

**प्रदीप मोरे**

## कोल्हापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा

सातारा येथे १ ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या ९९ व्या. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी मराठी साहित्य परंपरेला समृद्ध करणारे ज्येष्ठ लेखक आणि पानिपतकार विश्वास पाटील यांची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे कोल्हापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांची ‘पानिपत’ ही ऐतिहासिक कांदबरी साहित्य विश्वातील मराठीत मैलाचा दगड ठरली आहे. त्याचबरोबर झाडाझडती, नागकेशर, मृगजळ, चंद्रमुखी आशा कादंबऱ्यांनी वाचकांच्या मनावर छाप पडली आहे.विश्वास पाटील आज मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले ही कोल्हापूरकरांसह या भागांतील सर्वांसाठी अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या या निवडीमुळे मराठी साहित्यविश्वात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**राजू जाधव**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जिल्ह्यात १७ सप्टेंबरपासून 'सेवा पंधरवडा

## पाणंदरस्ते, सर्वांसाठी घरे व लोकअदालतींची मोहिमस्तरावर अंमलबजावणी : जिल्हाधिकारी विकास मीना

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : महसूल विभागातर्फे महत्वाच्या विषयांवर मोहिम स्वरुपात कामे करून नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानात राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन 17 सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि. 2 ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येणार आहे.

सेवा पंधरवड्यात राबवण्यात येणारे कार्यक्रम हे निरंतरपणे राबविले जाणारे कार्यक्रम आहेत. तथापि, या कालावधीत ते मोहिम स्वरुपात युद्धपातळीवर राबविण्यात येतील. हे अभियान 'पाणंद रस्तेविषयक मोहीम', 'सर्वांसाठी घरे' योजनेच्या अंमलबजावणीसाठी पूरक उपक्रम आणि जिल्हा प्रशासनामार्फत लोकअदालतीचे आयोजन अशा तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत शिव पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण करुन ज्या पाणंद रस्त्यांची नोंद निस्तार पत्रक किंवा वाजिब उल अर्जामध्ये करण्यात आलेली नाही त्याची नोंद घेण्याबाबत कार्यवाही करणे, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करुन देण्यासाठी संमती पत्र घेणे, रस्ता



अदालत आयोजित करुन शेतरस्त्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे आदी कामे करण्यात येणार आहेत. राज्यातील प्रत्येक नागरिकाला परवडणारे व सुरक्षित घर मिळाले पाहिजे यासाठी केंद्र सरकारबरोबरच राज्य शासन प्रयत्नशील आहे. या अनुषंगाने 23 ते 27 सप्टेंबरच्या कालावधीतील दुसऱ्या टप्प्यात 'सर्वासाठी घरे'योजनेत घरे बांधण्यासाठी निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध असलेली शासकीय जमीन कब्जेहक्काने प्रदान करण्यात येईल. या उपक्रमासाठी अस्तित्वातील रहिवासी प्रयोजनासाठी असलेली शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमातील तरतुदीनुसार नियमानुकूल करण्यात येतील. या टप्प्यामध्ये सर्वांसाठी घरे या योजनेंतर्गत शासकीय जमिनी वाटप केलेल्या, अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या लाभार्थ्यांना जमिनींचे पट्टे वाटप केले जातील. सर्व गटविकास अधिकारी यांनी तात्काळ गावनिहाय पात्र अतिक्रमणधारकांच्या याद्या तयार कराव्यात व सर्व उपविभागीय अधिकारी यांनी तात्काळ शक्ती प्रदत्त समितीची बैठक घेऊन अतिक्रमण नियमानुकूल करण्याची कार्यवाही नियमाप्रमाणे करावी , असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले आहेत.

अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात 28 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर या कालावधीत जिवंत सातबारा मोहिमेत प्रलंबित अर्जावर कार्यवाही करुन सातबारा अद्यावतीकरण, मंडळ स्तरावर महाराजस्व अभियान राबवून नागरिकांना प्रमाणपत्र वाटप, अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या महसूली केसेस तडजोडीने सोडविण्यासाठी लोकअदालतींचे आयोजन, उभारी योजनेंतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. या उपक्रमात नागरिकांना महसूल विभागाच्या सेवांचा लाभ जलदगतीने मिळवून देण्यासाठी यंत्रणेतील प्रत्येक घटकाने प्रयत्न करावे व नागरिकांनीही या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. विकास मीना यांनी केले आहे.

# भारत मुक्ती मोर्चा व बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क ने केले धरणे आंदोलन

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद : भारत मुक्ती मोर्चा, बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा व राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा यांच्या माध्यमातून समस्त भारतीयांचा मताधिकार हा मौलिक अधिकार आहे. संविधान तथा लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी व बहुजन समाजाचे मौलिक व संविधानिक अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांच्यावर होणारे अन्याय अत्याचाराच्या विरोधात, न्याय हक्कासाठी बहुजन समाजाच्या हजारो संघटनाद्वारे चरणबद्ध आंदोलन घोषित करण्यात आले आहे. त्यामध्ये धरणा प्रदर्शन,जेलभरो आंदोलन आणि जन आक्रोश रॅली होणार आहे. भारतातील सर्व निवडणुका ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, ओबीसीची जाती आधारित जनगणना करणे,आदिवासी वर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात, एससी -एसटी -ओबीसी व महिलावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात, कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे,नवीन शिक्षण धोरण -२०२० च्या विरोधात हे आंदोलन होत आहे तसेच बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्कद्वारे घोषित झालेले आंदोलनाचे मुद्दे बौद्धगया चे महाबोधी महाविहार ब्राह्मणांच्या ताब्यातून मुक्त करणे, दीक्षाभूमी ही अकॅडमिक शिक्षण केंद्र न ठेवता धम्म शिक्षण केंद्र बनविणे, दीक्षाभूमीचे सौंदर्यीकरण झाले पाहिजे या अनेक मुद्द्यावर उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयासमोर राष्ट्रीय स्तरावर सुरु असलेले धरणे आंदोलन पुसद येथे सुध्दा करण्यात आले व उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत महामहीम राष्ट्रपती यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष मा.विद्वान केवटे, राष्ट्रीय आदिवासी छात्र संघाचे प्रदेशाध्यक्ष गजानन गंडाळे, लहुजी क्रांती मोर्चा चे प्रदेश उपाध्यक्ष पुंडलिक तलवारे, राष्ट्रीय आदिवासी एकता परिषदेचे जिल्हाध्यक्ष गणपत गव्हाळे, विठ्ठल खडसे सर (धम्मभूषण पुरस्कार प्राप्त ), बहुजन क्रांती मोर्चाचे संयोजक लक्ष्मण कांबळे, बार्टी चे विषयतज्ञ अंबादास वानखेडे, अश्विनी पाईकराव, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे जब्बार शेख इत्यादींनी आंदोलनाच्या विषयावर आपले विचार मांडले.

# किरीट सोमय्याने बांगलादेशी शोधण्याच्या नावाखाली मुस्लिम समाजाला टार्गेट करू नए : डॉ. मोहम्मद नदीम

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - आज १७ सप्टेंबर रोजी डॉ.मोहम्मद नदीम यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले की केंद्रशासन व राज्य शासनाच्या विविध योजनाचा लाभ घेण्यासाठी तसेच विद्यार्थांना महाविद्यालयात प्रवेश घेण्याकरिता आधार कार्ड, पॅन कार्ड, सारखी कागद पत्रे लागतात आणि ही कागद पत्रे तयार करण्यासाठी जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असते. ज्यांची नोंद नाही त्यांना आप आपल्या नोंदी करण्याकरिता २७ एप्रिल २०२६ ही शासनाने शेवटची तारीख ठरवली आहे. म्हणून ज्यांची जन्मनोद नाही ती मंडळी जन्मनोंदी तयार करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

नगर परिषद किवा ग्रामपंचायत कडून जन्मनोंदी नसल्याचा दाखला घेऊन त्यासोबत आवश्यक कागद पत्रे सादर करून सबंधित कार्यालयातून त्याबाबतची चौकशी केली जाते परंतु वर्ष भरापूर्वी पासून माजी खा. भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी बांगलादेशी आणि रोहनगीया नागरिकांचे भारतात शिरकाव झाला आहे असे सांगून बांगलादेशी नागरिक शोधाच्या मुद्द्यावरून सम्पूर्ण महाराष्ट्रमध्ये मुस्लिम समाजाला लक्ष करण्याचा काम केल्या जात आहे त्याचाच एक भाग म्हणून किरीट सोमय्या दोन वेळा पुसद येथे येऊन गेलेले आहे कुठल्याही मुद्याबाबत प्रशासना कडे तक्रार करण्याचा किवा चुकीच्या घटना बद्दल प्रशासनाला अवगत करण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे परंतु किरीट सोमय्या या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहे केंद्र आणि राज्यात त्यांच्या पक्षाची सरकार आहे. बैठकीत प्रशासकीय अडचण समझून घेण्यापेक्षा अधिकार्यांना मी सांगतो त्या पद्धतीने काम करा असे निर्देश ते देत आहे ही बाब सहन करण्यासारखी नाही. जन्मनोंदी हा विषय कोण्या एका समाजापूरता मर्यादीत नाही त्यांच्या या विनाकारण च्या कृती मुळे सर्व सामान्य नागरिक वेठीस धरल्या जात आहे त्यांच्या या उपद्रव आणि भ्रामक वक्त्याव्यामुळे शासनाने दि.१२ मार्च २०२५ रोजी जन्मनोद करण्याकरिता दिशा निर्देश देण्यासाठी शासनाने अध्यदेश काढला आहे त्यात जन्मनोंदी नसल्याचा दाखला मिळविण्याकरिता सुद्धा १३ कागदपत्रांची यादी प्रकाशित केली आहे, ही अट त्रासदायक आहे. त्यामुळे मुस्लिम समाजामध्ये नाराजी निर्माण झाली आहे आणि त्याचा प्रतिकार करावा अशी जनभावना निर्माण झाली होती परंतु सामाजिक सलोखा बिघडू नये या साठी जबाबदार व्यक्तींनी पुढाकार घेऊन थांबवले होते.

अशा वेळी किरीट सोमय्या यांना कोणतेही संविधानिक पद नसतांना त्यांना शासकीय यंत्रनेत हस्तक्षेप करण्याचा तसेच या प्रकरणात अधिकार्याच्या बैठका घेऊन त्यांना आदेश देण्याचा व दमदाटी करण्याचा कोणताही नैतीक अधिकार नाही.किरीट सोमय्या शहरात येऊन वातावरण खराब करण्याचे काम करीत आहे ते खपवल्या जाणार नाही किरीट सोमय्या शहरात येऊन वातावरण खराब करण्याचा काम करीत असतील तर त्या गोष्टीचा प्रतिकार होईल त्यामुळे काही अनुचित प्रकार घडल्यास त्या साठी किरीट सोमय्या आणि प्रशासन जवाबदार राहील याची प्रशासनाने नोंद घ्यावी.असे डॉ नदिम यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना सांगितले. सदर पत्रकार परिषदेत शहर कॉंग्रेस अध्यक्ष झिया शेख, सामाजिक कार्यकर्ते मसूद मिर्झा, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा अध्यक्ष तहेसीन खान, कॉंग्रेस जिल्हा वाहतूक उपाध्यक्ष सय्यद जाणी, अल्प. शहर अध्यक्ष जब्बार लाखे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# महागाव येथील न्यायालयात राष्ट्रीय लोकादालतीचे यशस्वी आयोजन



जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - 13 सप्टेंबर 2025 रोजी महागाव येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात राष्ट्रीय लोक आदालत 2025 चे यशस्वी आयोजन करण्यात आले.

सदर लोक अदालत पॅनलचे अध्यक्ष स्थान माननीय न्यायमूर्ती साहिल राकेश चैन व पॅनल सदस्य एडवोकेट एस . एन . लकडे वकील यांनी भूषविले या लोक अदालती मध्ये एकूण 115 पेक्षा अधिक प्रकरणाचे निपटारे करण्यात आले तसेच त्यात एकूण त्यांचा दंड 58,400 / - ( आठ्ठवन्न हजार चारशे रुपये )दंड वसूल करण्यात आला तसेच 25 पेक्षा अधिक प्रकरणे दाखल पूर्व विभाग स्तरावरच निकाली काढण्यात आली व त्यांची वसुली रक्कम रु 3,99 ,600 / -करण्यात आले.

त्यामुळे वादांचे जलद आणि मैत्रीपूर्ण समाधान साध्य झाले. तालुका बार असोसिएशन महागाव व पोलीस स्टेशन महागाव यांनी महत्त्वाची भूमिका बजावली तसेच न्यायालयीन कर्मचारी वर्गाने आपल्या सोयीच्या चौकटी बाहेर जाऊन परिश्रम घेतले.

सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे महागाव येथे झालेल्या राष्ट्रीय लोक अदालत 2025 यशस्वीरित्या पार पडली व लोकांसाठी सुलभ ,मैत्रीपूर्ण व वेळेत न्याय मिळवून देण्याचे उद्दिष्ट साध्य झाले.

# भारतीय जनता पार्टी ग्रामीण व शहर घाटंजीच्या वतीने सेवापंधरवडा प्रशिक्षण कार्यशाळा



जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी आणि शासनाच्या योजनांचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी १७ सप्टेंबर देशाचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्रजी मोदी यांच्या जन्मदिनापासून सुरु होणाऱ्या 'सेवा पंधरवडा'कार्यशाळेचे एल. एस. डी. हॉल घाटंजी येथे भारतीय जनता पार्टी च्या वतीने आयोजन करण्यात आले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिन १७ सप्टेंबर पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) हा उपक्रम युद्धपातळीवर राबविला जाणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत ग्रामस्वच्छता अभियान,पादणरस्ते विषयी मोहीम सुरू करण्यात येणार आहे.शेतकऱ्यांसाठी शिव पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण करून नोंदी अद्ययावत करणे, शेतरस्त्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, मोजणी व सीमांकन करणे यांसारखी कामे केली जातील.महिला सक्षमीकरण,पक्षाच्या वतीने रक्तदान शिबीर, डोळ्यांचे शिबीर, असे विविध उपक्रम राबविण्यात येतील,शासकीय जमिनीचे कब्जेहक्काने वाटप केले जाईल. या कार्यशाळेला विजय बैस तालुका अध्यक्ष, गजुभाऊ ढवळे शहराध्यक्ष,सुरेशजी डहाके सर जिल्हा सचिव भाजपा, संदीपजी माटे, अभिजित झाडे,राम खांडरे, साधनाताई माडुरवाड, कानतोडे सर, डोहाळे सर, प्रभाकर चटूले,अनुपजी देठे, रितेश जी बोबडे, अमितजी मह्हले, अभिजीत झाडे, महेश जाधव, देवीभाऊ आडे, अरविंद जाधव, रोहिदास जाधव, गजू भाऊ बिजेवार, राजूभाऊ चापले, प्रकाशजी मोहिते, कबीर भाई शेख, कैलास मोरले, इंदल राठोड. व भारतीय जनता पार्टी च्या सर्व ज्येष्ठ नेते,पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख,बूथ प्रमुख सर्व आघाडी, सेल व कार्यकर्ते हजर होते.

# रावेरी ग्रामसभेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा उत्साहात साजरी

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - रावेरी येथे महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत रावेरी ग्रामपंचायतीची ग्रामसभा दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. ग्रामसभेला ग्रामस्थ, शेतकरी, महिला बचतगट सदस्य आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ग्रामसभेचे अध्यक्षस्थान ग्रामपंचायत सरपंच राजेंद्र तेलंगे यांनी भूषविले. मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, या अभियानाच्या माध्यमातून गावात लोकसहभागातून विकासाला गती मिळणार असून प्रत्येक ग्रामस्थाने यात सक्रिय सहभाग नोंदवावा.या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून श्रीमती किनाके (नायब तहसीलदार, राळेगाव) उपस्थित होत्या.

याशिवाय ग्रामपंचायतचे उपसरपंच गजानन झोटिंग, सदस्य विनोद काकडे, सौ. विद्या ठावरी, ग्राम महसूल अधिकारी जयश्री गेडाम, कृषी सहाय्यक श्रद्धा वानखडे आदी मान्यवर ग्रामसभेला उपस्थित होते.सुशासनयुक्त पंचायत सक्षम पंचायत (स्वनिधी व लोकवर्गणी) जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण उपजीविका विकास व रोजगार निर्मिती गृहनिर्माण व सामाजिक न्याय लोकसहभाग व श्रमदानातून लोकचळवळ उभारणी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे या घटकांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास रावेरी ग्रामविकासाच्या दिशेने मोठी झेप घेईल, असे यावेळी अधोरेखित करण्यात आले. सेवा पंधरवडा आणि योजनांचा लाभ ग्रामसभेत सेवा पंधरवडा या उपक्रमाची माहिती देण्यात आली. या कालावधीत शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना थेट ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. तसेच पांदण रस्त्यांच्या विकासावर विशेष भर देऊन शेतकऱ्यांना शेतीसाठी सोयीस्कर मार्ग उपलब्ध करून देण्यावर चर्चा झाली. ग्रामस्थांचा उत्साह आणि सूचना ग्रामसभेत पाणीपुरवठा, स्वच्छता, शैक्षणिक सुविधा, अंगणवाडी, रस्ते विकास, शेतीविषयक योजना, महिला बचतगटांचे बळकटीकरण तसेच रोजगाराभिमुख उपक्रमांवर चर्चा झाली.

# 'एकच पर्व, ओबीसी सर्व 'च्या घोषणांनी दुमदुमली औदुंबर नगरी

## आरक्षण अबाधित ठेवण्यासाठी उमरखेडात ओबीसींचा विशाल जनसागर उसळला

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड - महाराष्ट्र शासनाने हैदराबाद व सातारा गॅझेटीयनच्या संदर्भाने 2 सप्टेंबर रोजीच्या शासन निर्णयामुळे मूळ ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धोका निर्माण झाला आहे. संविधानाने दिलेले आपले आरक्षण अबाधित राहावे यासाठी ओबीसी समाज खडबडून जागा झाला आहे. आपला आरक्षणाचा न्याय हक्क अबाधित राहावा यासाठी सकल ओबीसी समाज संघटनेच्या वतिने दि 17 सप्टेंबर रोजी स्थानिक श्रीराम मंगल कार्यालय येथे तालुक्यातील हजारो ओबीसी बांधव महिला पुरुष एकत्र आले तेथे झालेल्या प्रमुख ओबीसी नेत्यांच्या मार्गदर्शनानंतर 'एकच पर्व, ओबीसी सर्व' च्या गगनभेदी घोषणा देत वाजत गाजत उपविभागिय अधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा नेण्यात आला.

यावेळी सकल ओबीसी समाज संघटनेच्या वतिने राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणविस यांना उपविभागिय अधिकाऱ्यांमार्फत आपल्या 10 प्रमुख मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या मोर्चाचे नेतृत्व बाळासाहेब चंद्रे अॅड संतोष जैन भास्करराव पंडागळे राजुभैया जयस्वाल तालुका समन्वयक बाळासाहेब ओझलवार दिलीप सुरते सुनिल पाटील चिंचोलकर प्रकाश दुधेवार पुंडलिक कुबडे राजेश कवाने सुनिल हिंगमिरे बळवंतराव नाईक, आदिंनी केले. मुळ ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला असून ओबीसींचे आरक्षण आर्थिक सामाजिक शैक्षणिक व राजकिय मागासलेपण विचारात घेऊन बहाल करण्यात आले होते . मुळ ओबीसींना 27 टक्के राजकिय व 19 टक्के शैक्षणिक व इतर सर्व आरक्षण असून या आरक्षणात इतर सुखसंपन्न व सामाजिक दृष्ट्या उच्च दर्जा असणाऱ्या समाजाचा यात हैदराबाद व सातारा गॅझेटीयनच्या संदर्भाने महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेला शासन निर्णयामुळे समावेश होत असल्याने मुळ ओबीसी नेस्तनाबुत होऊन ओबीसींचे अस्तित्वावर मोठे संकट निर्माण झाले आहे. या सर्व घटनाक्रमामुळे समाजा समाजामध्ये तेढ निर्माण होत आहे याचा ओबीसींवर दुरगामी परिणाम होणार आहे.

# जनआरोग्य योजनेत अपात्र नेमणूक – रुग्णांवर गंभीर अन्याय; युवा टायगर फोर्सची संतप्त तक्रार

जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा : यवतमाळ जिल्ह्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीत गंभीर नियमभंग झाला असल्याचा आरोप युवा टायगर फोर्सचे संयोजक व माजी आरोग्य सभापती अंकित नैताम यांनी करत शासन आणि जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेवर रोष व्यक्त केला आहे.

नैताम यांनी राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, यवतमाळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, Mediassist TPA जिल्हा प्रमुख व जिल्हा समन्वयक या अत्यावश्यक पदांवर वैद्यकीय पदवी नसलेल्या अपात्र व्यक्तींना नेमले गेले आहे. ही नेमणूक शासन धोरणे व कायदे धाब्यावर बसवणारी असून थेट रुग्णांच्या जीविताशी खेळ करणारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

विशेष म्हणजे, संबंधित अधिकाऱ्यांना रुग्णांच्या नातेवाईकांना आजार वा उपचारासंबंधी मार्गदर्शन करावे लागते. मात्र ते वैद्यकीय तज्ञ नसल्याने त्यांना सल्ला देण्याचा कायदेशीर अधिकारच नाही. यामुळे रुग्ण व नातेवाईक गोंधळतात, चुकीची माहिती मिळते आणि योजनेविषयी अविश्वास निर्माण होतो.

निवेदनात उघडपणे नमूद करण्यात आले आहे की : शासन निर्णय क्र. मफुयो २०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य दि. २८/०७/२०२३ – जिल्हा समन्वयक व TPA प्रमुख पदासाठी वैद्यकीय पदवी अनिवार्य आहे.राज्य आरोग्य हमी सोसायटीचा आदेश (दि. १३/०४/२०१७) – पदभरतीसाठी पात्रता निकष निश्चित केले आहेत.बीजीटी शासन निर्णय दि. २२/०३/२०२३ – पदभरतीतील गव्हर्नन्स निकष.भारतीय वैद्यकीय परिषद कायदा, कलम १५ – वैद्यकीय पदवी प्राप्त व्यक्तीलाच सल्ला देण्याचा अधिकार. या सर्व तरतुदींचे सरळसोट उल्लंघन करून अपात्र व्यक्तींची नियुक्ती केली गेली असल्याचे तक्रारीत ठळकपणे नमूद आहे.

### युवा टायगर फोर्सच्या मागण्या

जिल्हा समन्वयक व Mediassist TPA प्रमुख पदांवरील अधिकाऱ्यांची पात्रता तातडीने तपासावी.वैद्यकीय पदवी नसलेल्या अपात्रांना पदावरून हटवावे. जबाबदार अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी. चौकशीचा संपूर्ण अहवाल सार्वजनिक करावा.

# दारव्हा नगरपरिषद तील कोट्यावधी च्या कामावर भ्रष्टाचाराचा आरोप : मनसेचा इशारा घंटा

जनमाध्यम प्रतिनिधी

दारव्हा - नगरपरिषदेत चालू असलेल्या कोट्यावधी रुपयाचे कामामध्ये थेट भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष लाला पांडे यांनी केला आहे. त्यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी. उपविभागीय अधिकारी. आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करत" नगरपरिषदेतील कारभार पूर्णपणे बेफिकीर आणि ठेकेदार शाही च्या पंखा खाली चालतो आहे. असा थेट आरोप लावला आहे.

शहरात नाट्यगृह. क्रीडा संकुल, नाले, रस्ते, यवतमाळ रोडवरील सर्विस नाले.दिग्रस बायपासवरील सर्विस रस्ते. अशी कोट्यावधी रुपयाची कामे सुरू आहेत. मात्र.या सर्व कामावर देखरेख करणारे अभियंता विकी कलोसे यांनी डोळे झाक केले असून ठेकेदारांना मोकळे रान दिले आहे. त्यामुळे कामाची गुणवत्ता खालावत असून नागरिकांची दिशाभूल केली जात आहे. भ्रष्टाचाराची हे उघड उघड मेजवानी नगर परिषदच. पुरवत आहे. असा आरोप पांडे यांनी केला. त्याचबरोबर शहरात काही नाले. शहरात काही सरळ घराच्या आत बांधल्या जात असल्याचे धक्कादायक प्रकार पांडे यांनी उघड केले. अतिक्रमण कारवाईत ही दुहेरी निकष लावले जात असल्याचे त्यांनी म्हटले. गरीब आणि सर्वसामान्यांचे अतिक्रमण झटपट हटवले जाते. मात्र सत्ताधाऱ्यांच्या जवळ असलेल्या ठेकेदारावर किंवा प्रभावशाली लोकांवर प्रशासन गप्प बसते. हे भूमिका उघडपणे भ्रष्टाचार पक्षपात करणारी असल्याची पांडे यांनी ठणकावले. गोळीबार चौक आणि नर्सिंग होम समोरील अतिक्रमण काढताना व्यापाऱ्यांचे पुनर्वसन न करता केलेली कारवाई अन्यायकारक असल्याचेही त्यांनी नमूद केले. जिथे ठेकेदार आणि सत्ताधारी जोडलेले आहेत. तिथे प्रशासन गप्प बसते. पण सामान्य जनता मात्र अन्यायाला बळी पडते. हा डाव आम्ही उधळून लावू. असा इशारा त्यांनी दिला. नगर परिषदेच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांची नेमणूक तातडीने करावी.

# "बुद्धिस्ट सोसायटी, वंचित बहुजन आघाडी आणि समता सैनिक दलाचा विराट मोर्चा



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - बिहार येथील महाबोधी महाविहार बौद्धाच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी बीटीएमसी कायदा रद्द करणे, या महत्त्वाच्या मागणीसह तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जन्म स्थान महू त्याचप्रमाणे नागपूर येथील दीक्षाभूमी ही मनुवाद्यांच्या वर्चस्वातून मुक्त करून बौद्धाच्या ताब्यात देण्यात यावे, या तीन महत्त्वाच्या मागणीसाठी बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया, वंचित बहुजन आघाडी आणि समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने यवतमाळ येथे आज विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

वरील तीन महत्त्वाच्या मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यवतमाळ यांना देण्यात आले असून या मोर्चामध्ये ग्रामीण भागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकाच दिवशी सर्व जिल्ह्यावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून निवेदनाद्वारे बौद्ध बांधवांनी आपल्या भावना शासनापर्यंत पोहोचवल्या आहेत. या मोर्चात वंचित चे डॉ नीरज वाघमारे मोहन भवरे रवी भगत जयकुमार भवरे रुपेश वानखडे राहुल राऊत गौतम कुंभार ज्ञानेश्वर अभंग मोरेश्वर देवताळे अरुण खंडारे उषा खंदारे रंजना ताकसांडे संगीता कुंभारे वंदना कानंदी विविध तालुक्यातून पदाधिकारी जयकुमार भवरे सिद्धार्थ बनसोड सिद्धार्थ गायकवाड नागोराव बनसोड विनायक देवतळे भारत कांबळे प्रकाश खंडारे धम्मदीप पाईकराव प्रा. उत्तम शेंडे, शिवदास कांबळे, मधुकर कांबळे कळंब तालुकाध्यक्ष, राजू निमसरकार, गौतम दारुण्डे, र. वी नगराळे, अशोक निमसरकार, आनंद भगत, उत्तम कांबळे करुणा मुन, पुष्पा सिरसाट, स्वप्नील कोल्हे, नामदेव इंगोले, गजानन कोकाटे, राहुल रामटेके उपस्थित होते.

# पुसद येथे अभियंता दिन मोठ्या उत्साहात

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - विश्वेशवरैय्या इंजिनियर्स अँड आर्किटेक्ट असोसिएशन पुसद तर्फे १५ सप्टेंबर हा अभियंता दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. संपूर्ण सप्ताहभर कार्यक्रमात आखणयात आले होते .सुरुवातीला रक्तदान करून आपल्या सेवेचे भावना अभीयंतानी व्यक्त केले.२९ रक्तदात्यांनी रक्त देऊन रक्तदान शिबिर यशस्वी केले रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाचे उद्घाटन सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद चे कार्यकारी अभियंता महेश माथुरकर यांनी केले.

सदर कार्यक्रमात पत्रकार संघाचे नवनियुक्त अध्यक्ष ललित सेता यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला तसेच येथील नामवंत रक्तदाते गिरीश अनंतवार यांनी आतापर्यंत १२० वेळी रक्तदान करून स्वतःची कीर्तिमान स्थापित केलेला आहे त्यांचा पण यावेळी संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला.१३,१४ व १५ सप्टेंबर रोजी अभियंता चषक क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले.याचे उद्घाटन कार्यकारी अभियंता महेश माथुरकर व उपअभियंता कुरेशी यांच्या हस्ते झाला. सदर सामन्यांमध्ये एकूण आठ टिम सहभागी झाले होते पुसद येथील अभियंत्यांचे संघ तसेच उमरखेड ,दिग्रस ,यवतमाळ येथील संघ व कंत्राटदार यांचा एक संघ या सर्वांनी खेळाचा मनसोक्त आनंद घेतला. या स्पर्धेमध्ये सर्व कनिष्ठ व ज्येष्ठ अभियंता आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. अंतिम सामन्यात अन्वर ११ ने उमरखेड अभियंत्याचा शेवटच्या चेंडूवर विजय मिळवला. स्पर्धेतील सर्व सामने चुरशीचे झाले.सदर सामने,स्पर्धा हे पॉलीटेक्निक कॉलेजच्या मैदानात घेण्यात आले. मैदानात सदर स्पर्धेला शहरातील विविध राजकीय व सामाजिक लोकांनी भेट दिली व सामन्याचा आनंद घेतला शिवसेना उबाठाची पूर्ण पुसद येथील सर्व नेते मंडळी यांनी संघटनेचे अध्यक्ष अनवर अली यांचा शाल व श्रीफळ देऊन मैदानावर सत्कार केला, तसेच माजी आमदार अॅड.निलय नाईक हे सुद्धा मैदानावर पोहचले व एक पूर्ण सामना चा त्यांनी मनसोक्त आनंद घेतला व सर्वांना शुभेच्छा दिल्या. नंतर ग्रामीण रुग्णालय येथे गरजुना अन्नदान करण्यात आले.

# वेचक

## आरोग्य सेवा समितीच्या अध्यक्षपदी प्रणय कऱ्हे व सचिवपदी विनोद तुमवार यांची निवड



महागाव - तालुक्यातील कासार बेहळ येथे 15/9/2025 रोजी युवकांची सभा घेण्यात आली.या सभेमध्ये आरोग्य सेवा समिती स्थापन करण्यात आली. सदर समिती ही गावं तालुका व जिल्हा पातळीवर स्थापन करण्यात आल्या आहेत. हि समिती गांव पातळीवर लोकांच्या सहभागातून आरोग्य विषयक सुविधाची जनजागृती आणि नियंत्रण यासाठी बनविण्यात आली. गावामध्ये आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून देणे शासकीय आरोग्य योजना लोकांपर्यंत पोहोचवणे गावांमध्ये स्वच्छता,लसिकरण, कुपोषण निर्मूलन या संदर्भात जनजागृती करणे,माता बालक आरोग्य, कुटुंब नियोजन, प्रसूती सेवा यावर भर देणे शासनाच्या विविध योजना गरजू लाभार्थींपर्यंत पोहचविणे असे विविध कामे या समितीमार्फत केले जातात.
या समितीचा मुख्य उद्देश आरोग्य शिबीराचे आयोजन करणे प्राथमिक आरोग्य केंद्राशी समन्वय ठेवणे, औषधे, पोषण आहार व इतर वैद्यकीय सोयीसुविधा उपलब्ध करून देणे.नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे.अपंग जेष्ठ नागरिक व गरजूंसाठी विशेष योजना राबविणे या समितीच्या अध्यक्षपदी प्रणय कऱ्हे, उपाध्यक्षपदी पांडुरंग ठाकरे, सचिवपदी विनोद तुमवार, सदस्य महेंद्र कऱ्हे, मारोती हनवते, दिलीप पिटलेवाड, नामदेव मर्कटे, अविनाश हनवते,प्रशिक बरडे, सचिन कवाने, शंकर गाढवे, गजानन लांडगे, नारायण बिरंगणे, अविनाश कऱ्हे,रूपेश कऱ्हे, गणेश पाटे,किरण पावडे,यांची निवड करण्यात सदर समिती भावीक भगत हेल्प फाउंडेशन यवतमाळ चे संचालक भाविक भगत, अशोक तुमवार मा.सरपंच यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली आहे.



## युवकांना मानसिक स्वास्थ्यासाठी आनापान ध्यान साधना उपक्रम

यवतमाळ - महाराष्ट्र सरकार आणि विपश्यना रिसर्च इंन्स्टिट्यूट इगतपुरी व डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत वसंतराव नाईक शासकीय कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे धम्ममल्ल विपश्यना केंद्र,यवतमाळ द्वारा सकाळी 11 ते 1 वाजेपर्यंत मानसिक स्वास्थ्य आणि ध्यान केंद्रित करण्याची क्षमता प्राप्त करण्यासाठी युवकांना आनापान ध्यान साधनेत 70 मिनिट ध्यान युवकांना देण्यात आले.या साधनेमुळे मन एकाग्र होते. मनातील भीती,चिंता, तणाव कमी होतो.अभ्यासात मन एकाग्र होते. अभ्यासात प्रगती होते. सुप्त कला विकसित होतात.कोणतीही गोष्ट समजणे,समजून सांगण्याची शक्ती वाढते.आत्मविश्वास वाढतो. सद्भावना वाढते.मन बलवान होते याकरिता या ध्यान साधनेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात 31विद्यार्थी व 51 विद्यार्थिनींसह महाविद्यालयाचे सहभागी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी प्रा.अंजली गहरवाल,सहयोगी अधिष्ठाता, प्रा.धीरज वसुले,मंगेश शेटे, एकनाथअकाले,डॉ.पि.के.प्रधान, विपश्यना सहायक आचार्य ई.डी.गडलिंग ,सर्वश्री.देवेंद्र मेश्राम,बंडोपंत पोहेकर,गौतम कुंभारे,बळीराम अडागळे,इंजि.घनश्याम भालशंकर, डॉ.बाळकृष्ण सरकटे यांची उपस्थिती होती.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनी स्वच्छता अभियान



पुसद - देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिना निमित्य मौजा बेलोरा या गावी माजी आ.निलय नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामस्वच्छता अभियान राबविले. याप्रसंगी माजी आ.निलय नाईक, निळकंठ पाटील, अनिरुद्ध पाटील चोंढीकर, पुंजाराम काईट महेश नाईक सरपंच रूपालीताई पोले देवराव जाधव विवेक मस्के ओमप्रकाश शिंदे योगेश मुराई हेमंत माने अप्पाराव मारकड सागर मारकड माणिक मारकड धोंडेराव पोले गजू शिंदे कैलास मारकड प्रशांत गडदे दारासिंग राठोड रमेश पवार नामदेव बेले नामदेव राठोड मिठा आडे सुधाकर राठोड सुनील चव्हाण रामराव काईट देवानंद इंगोले किसन चव्हाण तसेच भाजप नेते पदाधिकारी आणि गावकरी मंडळी उपस्थित होते.

# एसटी प्रवर्गाच्या मागणीसाठी बंजारा समाजाचा टाहो

## जिल्हाधिका-यांनी दिले निवेदन

**अमरावती/का.प्र.**

एसटी संवर्गाच्या आरक्षणासाठी अमरावती जिल्ह्यातील सकल बंजारा समाज आक्रमक पवित्र्यात रस्त्यावर उतरला. हजारोच्या संख्येने जमलेल्या बंजारा समाजबांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.



एकच मिशन एसटी आरक्षण, हक्क आमचा देणार कोण?, हैदराबाद गॅझेट लागू जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक करा. अशा जोरदार घोषणा देत मोर्चेकरी मार्गक्रमण करत होते. महिलांचा आणि युवकांचा लक्षणीय सहभाग हे या मोर्चाचे विशेष वैशिष्ट्य ठरले. समाजातील विविध गट, संघटना आणि नेत्यांनी एकत्र येत आरक्षणाच्या मागणीचा पुनरुच्चार केला. बंजारा समाजाने हैदराबाद गॅझेटचा दाखला देत इतर जातींप्रमाणे आपल्यालाही एसटी आरक्षण देण्यात यावे, अशी ठाम भूमिका मांडली. मोर्चाच्या शेवटी समाजातील प्रमुख प्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करत एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी, या मागण्यांसाठी बंजारा समाज रस्त्यावर उतरला आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

# संक्षिप्त

## ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

**अमरावती-** इन्टेक अमरावती चॅप्टर तर्फे या कार्यक्रमाचो आयोजन श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय,



अमरावती येथे करण्यात आले होते. नवनवीन उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने यामध्ये ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूल मधील विद्यार्थी सहभागी झाले होते. शाळेतील धनश्री खंडारे, साहिल शेंदरे, निनाद मतकर, अर्णव कोकाटे, सार्थक इंगळे, सम्राट भालचक्रे, एंजल बोबडे, फएेझा बेग, स्वरा साव, मोहम्मद मवीय मो. इम्रान या १० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या स्पर्धेमध्ये मोहम्मद मवीय मो. इम्रान आणि सम्राट भालचक्रे यांनी दुसरा क्रमांक पटकावला. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आणि शाळेला सन्मानचिन्ह (ट्रॉफी) देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी विषय शिक्षिका वैशाली ठाकरे यांनी मार्गदर्शन करून पार पाडली.शिक्षिका संगीता पवार, मुख्याध्यापिका वर्षा राठोड यांनी कौतुक केले. तसेच व्यवस्थापन समिती गौरी देशमुख, ममता ठाकरे,अंगद देशमुख यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## पोटे स्कूलच्या विद्यार्थ्यांचे मिनीगोल्फ स्पर्धेत यश

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे मिक्स डबल इव्हेंट मध्ये वर्ग सहावीची विद्यार्थिनी मनस्वी निंबोरकर व वर्ग आठवीचा विद्यार्थी अंश राऊत याची



विभागीय स्तरावर निवड करण्यात आली. त्याचबरोबर सिंगल इव्हेंट U१४ मध्ये वर्ग आठवीची विद्यार्थिनी आरोही विल्हेकर हिने जिल्हास्तरावर तिसरा क्रमांक पटकावून विभागीय स्तरावर तिची निवड झाली. या विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्राचार्यांनी उपप्राचार्यांनी भरभरून कौतुक केले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्यापीठात इंग्रजी संवाद कौशल्य पदविका अभ्यासक्रमाकरीता प्रवेश सुरु

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे पदव्युत्तर पदविका 'पी.जी. इन कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लिश' या एक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. सदर अभ्यासक्रम पदवीधरांसाठी असून करिअरमध्ये उत्कृष्ट संवाद कौशल्य विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविण्याबरोबरच सादरीकरण कौशल्य, व्यावसायिक लेखन आणि आंतर-सांस्कृतिक संवाद यांसारख्या कौशल्यांवर लक्ष केंद्रित करण्याकरीता सदर अभ्यासक्रम उपयुक्त आहे. अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना



कॉर्पोरेट क्षेत्र, मीडिया, जनसंपर्क आणि आंतरराष्ट्रीय व्यवसायात आवश्यक असलेले आत्मविश्वास आणि कौशल्ये मिळविण्यास मदत होते.

अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्ये- सदर अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्षाचा असून कोणत्याही शाखेतील पदवीधर अभ्यासक्रमाकरीता पात्र असेल. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षक, कॉर्पोरेट प्रशिक्षण, मीडिया, जनसंपर्क, ग्राहक संबंध, व्यवसाय संवाद आदींमध्ये करिअरच्या संधी असणार आहे.

सदर अभ्यासक्रम व्हर्च्युअल आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीत असणार असून तज्ज्ञ शिक्षकांकडून प्रात्यक्षिक सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.तरी आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे सुरु झालेल्या इंग्रजी संवाद कौशल्य पदविका अभ्यासक्रमाकरीता जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी प्रवेशित होवून लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# 'ज्ञानाला नवी दिशा-विद्यार्थ्यांचा लेखकांशी थेट संवाद'

## 'स्वराज्य निर्मिती' पुस्तकातून उलगडली समाजघटकांची शौर्यगाथा

## अठरा पगड जातीच्या योगदानातून घडले रयतेचे राज्य-डॉ. प्रवीण राऊत

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

माध्यमिक विद्यालय व खंडेराव देशमुख उच्च माध्यमिक विद्यालय, राजुरा यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेला 'विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष लेखकांशी संवाद' हा आगळावेगळा उपक्रम विद्यार्थी, शिक्षक आणि साहित्यप्रेमींसाठी एक संस्मरणीय अनुभव ठरला. या कार्यक्रमात इतिहास संशोधक व लेखक डॉ. प्रवीण राऊत यांनी आपल्या 'स्वराज्य निर्मिती' या पुस्तकावरील विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले तसेच विद्यार्थ्यांच्या थेट प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्याशी मुक्त संवाद साधला.

पुस्तकाच्या माध्यमातून डॉ. राऊत यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत अठरापगड जातींच्या निष्ठावंत मावळ्यांचे योगदान अधोरेखित केले. 'शिवाजी महाराजांचे राज्य हे फक्त एका वर्चस्व गटासाठी नसून शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य घटकांसाठी घडविलेले खरे रयतेचे राज्य होते.या संवादात विद्यार्थ्यांनी 'त्या काळातील लोकशाही मूल्ये आजच्या काळाशी कशी जोडता येतील, 'शिवाजी महाराजांच्या स्वराज्य धोरणांचा आधुनिक शिक्षण व समाजकारणात काय उपयोग होऊ शकतो?'अशा प्रश्नांची सरळसरळ विचारणा केली. लेखकाने प्रत्येक प्रश्नाचे ऐतिहासिक संदर्भ देऊन समाधानकारक स्पष्टीकरण दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्रा. शारदा हिवरे यांनी आपल्या भाषणात



'विद्यार्थ्यांनी फक्त पुस्तक वाचून न थांबता लेखकांशी संवाद साधून विचारांची देवाणघेवाण करणे ही खऱ्या अर्थाने ज्ञानप्रक्रियेची श्रीमंती आहे, असे प्रतिपादन केले.

प्राचार्य विश्वंभर कापसे यांच्या मार्गदर्शनात आयोजित या कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका व प्रास्ताविक डॉ. नितीन टाले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.आशिष बोरकर यांनी विद्यार्थ्यांना चर्चेत सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित केले. प्रा. पल्लवी गनगणे व प्रा.वैशाली पतीगे यांनी आभार प्रदर्शन केले.या वेगळ्या संवादात्मक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी कुतूहल जागृत झाले असून वाचनाची आवड अधिक दृढ होण्यास हातभार लागला. या चर्चासत्राच्या आयोजनामध्ये नावेद पठाण, संध्या वानखडे, पुनम मोहिते, सुजल हजारे, राम वानखडे, वंश डोंगरे, आयुष बनसोड, कुणाल कदम यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# ओझोन संरक्षण दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी काढल्या अप्रतिम रांगोळ्या

## आदर्श पूर्व माध्यमिक शाळेत ओझोन संरक्षण दिन

**अमरावती/का.प्र.**

खापर्डे बगीचा येथील आदर्श पूर्व माध्यमिक शाळेत ओझोन संरक्षण दिवसानिमित्त इयत्ता पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम रांगोळ्या काढल्या. इतक्या छोट्या वयात सुबक रांगोळ्या विद्यार्थिनींनी काढल्या त्यामुळे त्यांचे सर्व शिक्षकांनी भरभरून कौतुक केले.

अनेक विद्यार्थ्यांनी निसर्ग संरक्षणावर आधारित बोलके चित्र काढले आणि रंगवले. मृदुला जवंजाळ निसर्गावर आधारित गीत गायले. सुरभी वानखडे हिने तिच्या भाषणातून ओझोन वायूचे महत्त्व सांगितले. इयत्ता पाचवीतील आसावरी कुरवाडे, स्वरा टिंगरे, स्पृहा देशमुख, आस्था काळे इयत्ता सहावीतील श्रीजीत जुनगरे निल आखरे हार्दिक अवघड स्वरा राऊत गुरु राऊत राघव पठाडे जीत बसाल हर्ष तरुडकर कौशिक चव्हाण इयत्ता सातवीतील संचित काटे कबीर गारले या विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक मॉडेल्स तयार करून निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी आपण काय करू शकतो हे प्रत्यक्ष दाखविले. Let's Protect The Ozone Layer ही





नाटीका मधुरा उमाळे,सानवी वानखडे,मानवी पिंजरकर, आराध्या मानकर, आरव तवेकर, आरव काकडे, स्वरूप फसाटे, लावण्या मावळे, प्रज्ञेश खरबडे इत्यादी विद्यार्थ्यांनी स्वादिग्दर्शित उत्तम नाटिका सादर केली.कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी जोशी यांनी कविता सादर केली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या शितल केने यांनी अध्यक्षीय भाषणातून ओझोन संरक्षणासाठी आपले कर्तव्य विद्यार्थ्यांना समजून सांगितले.संचालन संचित काटे आणि आभार प्रदर्शन सिद्धी सोनारे यांनी केले.

## पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त नांदगाव खंडेश्वर

# आयटीआयतर्फे स्वच्छता अभियान

## खंडेश्वर मंदिर व येनस परिसरात केले श्रमदान

**नांदगाव खंडेश्वर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांना देशभरात प्रारंभ करण्यात आला असून त्याचाच एक भाग म्हणून एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदगाव खंडेश्वर (आयटीआय) तर्फे स्वच्छ भारत अभियानांतर्गत श्रमदानाचे आयोजन प्राचार्य सुरेश मेंढे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शहरातील खंडेश्वर मंदिर व येनस परिसरात हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात संस्थेचे प्रशिक्षणार्थी, कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग



नोंदविला. परिसरातील कचरा, गवत व प्लास्टिक गोळा करून स्वच्छता करण्यात आली. मंदिर परिसराला स्वच्छ व देखणे ठेवण्याचा संकल्प यावेळी विद्यार्थ्यांनी केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होऊन समाजात स्वच्छतेचा संदेश पोहोचला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता आयटीआयचे शिल्पनिदेशक राजेंद्र उन्होंणे, राजकुमार धोटे, तुषार जैन, प्रफुल्ल कचरे, वैभव जाधव, निलेश देऊळकर, राम इखार, शहजाद खान, सुशिल सरोदे, सागर डांगे, चिन्मय दहाट, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, सचिन वाहणे, सचिन दुवदने, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगिता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे, सुरक्षारक्षक धिरज तायडे यांच्यासह प्रशिक्षणार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## अचलपूर येथील दि.अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील

# वीज बिल भरणा केंद्र १ महिन्यापासून बंद

## ग्राहकांना मानसिक व आर्थिक फटका

**अचलपूर/वार्ताहर**

दि.अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अचलपूर शाखेत शहरातील ग्राहक महावितरणचे विजेचे बिल भरायचे. पण गेल्या एक महिन्यापासून माळवेशपुरा येथील विजेचे बिल भरणा केंद्र बंद झाले आहे.यामुळे अचलपूर शहरातील जवळपास १५ हजार महावितरणच्या ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून विज बील भरण्यासाठी परतवाडा महावितरण कार्यालयात जावे लागत आहे.

यामुळे परतवाडा शहरातील महावितरण कार्यालयात पूर्वीच ग्राहकांची गर्दी असल्याने तासनतास रांगेत उभे राहण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे. पण याबाबत महावितरण परतवाडा कार्यालयाचे कार्यकारी अभियंता यांच्या कडे अनेक तक्रारी देऊनही कोणतीही दखल घेतलेली नाही.आजही वीज बील भरण्यासाठी ग्राहक चक्क शहरातील अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चकरा मारत आहे.एकीकडे महावितरणचे मुख्य कार्यालय परतवाडा शहरात आहे .यामुळे अचलपूर शहर व ग्रामीण भागातील ग्राहक वीज बिल



भरण्यासाठी या बँकेत जात होते. पण सायबर अटॅक चे कारण समोर ठेऊन हा वीज बिल भरणा केंद्र बंद झाल्याने ग्राहक त्रस्त झाले आहे.यामुळे ग्राहकांना या वीज बिल भरणा केंद्र अभावी होणाऱ्या त्रासातून मुक्त करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात ओझोन दिन साजरा

## पर्यावरण संरक्षणाचा ठसा उमटवणारा उपक्रम




**अमरावती/का.प्र**

आजच्या युगात वाढते औद्योगिकीकरण, वाहतुकीतून होणारे प्रदूषण आणि रासायनिक खतांचा अतिरेकी वापर यामुळे ओझोन थराच्या संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने भासू लागली आहे. या पार्श्वभूमीवर ओझोन थर संवर्धनाचा जागर देण्यासाठी श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात जागतिक ओझोन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गृहर्थशास्त्र विभाग प्रमुख व भूगोल विषयाच्या प्रभारी विभाग प्रमुख डॉ. सुजाता सबाने (झाडे) यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी पर्यावरणीय समतोल टिकवण्यासाठी विद्यार्थ्यांनी ठोस पावले उचलण्याचे आवाहन केले. पर्यावरणाचे रक्षण हे केवळ शासकीय धोरणांवर अवलंबून नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे त्या म्हणाल्या.प्रमुख वक्ते डॉ. राजेंद्र ढगेकर यांनी ओझोन थराच्या वैज्ञानिक रचनेबाबत माहिती देत वाढत्या जागतिक तापमानवाढीमुळे त्यावर होणाऱ्या परिणामांची सखोल मांडणी केली. तसेच डॉ. हरिहर गाडबैल यांनी ओझोन थर कमी होण्याची कारणे स्पष्ट करत त्यातून उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक समस्या, विशेषतः त्वचेच्या कर्करोगाचा धोका, याबाबत विद्यार्थ्यांना जागृत केले.डॉ. रामेकर यांनी दैनंदिन जीवनात पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून ओझोन थराचे संवर्धन कसे करता येईल याबाबत विद्यार्थ्यांना उपयुक्त मार्गदर्शन केले.

संचालन डॉ. रेखा निर्मळ आभार प्रदर्शन स्वप्नील राऊत यांनी मानले.या प्रसंगी विभागातील डॉ. प्रवीण माटोडे, डॉ. मनिषा गावंडे आणि इतर प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पर्यावरण संरक्षणाच्या संकल्पनेशी आपली बांधिलकी अधोरेखित केली. कार्यक्रमाच्या माध्यमातून 'ओझोन थर वाचवा-पृथ्वीचे भविष्य घडवा' हा प्रभावी संदेश विद्यार्थ्यांसमोर ठेवण्यात आला.

## पारदर्शकता,विश्वसनीयता व गतिमान कारभार हेच

# जिल्हा महिला बँकेच्या यशाचे गमक -आ.सुलभा खोडके

## अमरावती जिल्हा महिला सहकारी बँकेची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**अमरावती/का.प्र.**

महिलांच्या जिव्हाळ्याची बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दि.अमरावती जिल्हा महिला सहकारी बँक ही आज एक महिलांच्या आर्थिक विकासाचे एक केंद्रबिंदू बनले आहे. महिलांचा आर्थिक विकास करून त्यांना सक्षम व आत्मानिर्भर बनविण्यासाठी तसेच कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका वाढविण्यासाठी बँकेच्या विविध ठेवी योजना व कर्ज योजना तसेच आर्थिक व्यवहार मोलाचे ठरू पाहत आहे. ग्राहक व सभासदांचा विश्वासाच्या जोरावर बँकेची आतापर्यंतची वाटचाल उल्लेखानीय असून पारदर्शकता,विश्वसनीयता व गतिमान कारभार हेच बँकेच्या



यशाचे गमक असल्याचे गौरवोद्गार बँकेच्या अध्यक्ष आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी व्यक्त केले.

दि.अमरावती जिल्हा महिला सहकारी बँक लिमिटेड, अमरावती ची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच रायली प्लॉट स्थित अग्रसेन भवन येथे पार पडली. यावेळी त्या सभेमध्ये संबोधित करीत होत्या. यावेळी व्यासपीठावर बँकेच्या संचालिका- रेश्मा सावरकर, पुष्पा गावंडे, संजीवनी देशमुख, श्रीमती-सुचिता काळे, डॉ. ज्योती धोपटे ( शेटिया), मंदाकिनी बागडे, अंजली चौधरी, सोनाली पाटील, ज्योत्स्ना कोरपे, हर्षा जगताप, दर्शना देशमुख, नीता मिश्रा, दीपाली भेटाळू, नीता उगले, माधुरी ठाकरे, बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी-ऋषिकेश भामोदकर आदी उपस्थित होते. सर्वप्रथम बँकेच्या अध्यक्षा-आ.सुलभा खोडके यांच्या हस्ते माँ लक्ष्मी यांच्या प्रतिमेस वंदन, पूजन व माल्यार्पण करण्यात आले.यादरम्यान बँकेच्या ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी अहवाल वर्षात दिवंगत झालेले बँकेचे सभासद, ठेवीदार, सेवक, हितचिंतक यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजादरम्यान बँकेच्या सन २०२४-२५ अखेर संपलेल्या वर्षाचा वार्षिक अहवालाचे वाचन केले. यासोबतच ताळेबंद चे वाचन,नफातोटा पत्रकाचे सुद्धा वाचन केले. तसेच बँकेचे सन २०२५-२६ चे अंदाजपत्रकाचे वाचन करून त्यास मंजुरी देण्यात आली.

कामकाजादरम्यान बँकेच्या अध्यक्ष आ.खोडके यांनी सांगितले की,वर्ष १९७५ पासून बँकेच्या कामकाजाला सुरुवात झाली. तेव्हापासून आजपर्यंत बँकेचे कामकाज सुरळीतपणे सुरू आहे.आर्थिक व्यवहार व उलाढाली करण्यासाठी महिला बँकेच्या उपलब्ध सेवेचा सर्वांनी लाभ घ्यावा,असे आवाहन सुद्धा आ. सुलभा खोडके यांनी केले.यावेळी बँकेच्या अध्यक्षा-आ. सुलभा खोडके यांनी बँकेच्या कामकाजाविषयी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले. वार्षिक सर्वसाधारण सभेत सभेपुढील सर्व विषय व ठरावांना यावेळी सर्व उपस्थित सदस्यांचे वतीने हात उंचावत एकमताने मंजुरी देण्यात आली. यावेळी अमरावती जिल्हा महिला सहकारी बँकेचे सभासद व ग्राहक प्रामुख्याने उपस्थित होते. सर्व सभासदांना बँकेच्या ५० व्या सर्वसाधारण सभा लेखी अहवालाच्या पुस्तिकेचे वाटप देखील करण्यात आले.

# अमरावती शिक्षक मतदारसंघ-२०२०

# फेक नोंदणीचे धक्कादायक वास्तव

**भा**रतीय लोकशाहीतील शिक्षक मतदारसंघ ही एक विशेष व महत्त्वपूर्ण संकल्पना असून शिक्षकांच्या विचारशील, विवेकी व प्रगल्भ प्रतिनिधित्वाची अपेक्षा यामागे दडलेली आहे. पण दुर्दैवाने, या निवडणुकांमध्ये अपात्र नावे, फेक नोंदणी व गैरव्यवहार यांचा अंधार वारंवार जाणवतो. अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या २०२० च्या निवडणुकीत तब्बल दहा ते बारा हजार अपात्र नावे समाविष्ट झाल्याचे वास्तव उघडकीस आले होते. ही केवळ निवडणुकीच्या शुचितेला धक्का देणारी बाब नाही, तर शिक्षक वर्गाच्या राजकीय प्रतिनिधित्वालाही कलंक लावणारी आहे.२०२६ च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या गंभीर वास्तवाचा चिकित्सक आढावा घेणे काळाची मागणी आहे. त्या दृष्टीने हा लेख लिहिण्याचा प्रपंच!

भारतीय लोकशाहीची रचना ही केवळ सार्वत्रिक मतदानावर आधारित नसून, समाजातील काही विशेष गटांना प्रतिनिधित्व मिळावे यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यात शिक्षक मतदारसंघ ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. संविधानाच्या कलम १७३ (३ )(सी) अंतर्गत विधान परिषदेतील काही जागा शिक्षक मतदारसंघासाठी राखीव आहेत. या मागचा मूळ उद्देश असा की, शिक्षण क्षेत्राशी थेट जोडलेले, अनुभवसंपन्न शिक्षकच विधान परिषदेच्या माध्यमातून शिक्षणविषयक प्रश्न राज्यकारभारासमोर मांडतील. परंतु दुर्दैवाने आज या मतदारसंघाची शुचिता गंभीर प्रश्नचिन्हासमोर आहे. फेक मतदान, अपात्र व्यक्तींची नोंदणी आणि पैशासाठी मतांची खरेदी-विक्री यामुळे शिक्षक मतदारसंघाचा मूळ हेतू धोक्यात आला आहे.

**अमरावती शिक्षक मतदारसंघ २०२० चा अनुभव**

अमरावती विभागातील शिक्षक मतदारसंघ निवडणूक- २०२० मध्ये ३४,६९० मतदारांची नोंदणी झाली होती. परंतु त्यापैकी अंदाजे १०,००० ते १२,००० मतदार हे प्रत्यक्षात अपात्र किंवा फेक नोंदणी झालेले शिक्षक असल्याचे विविध संघटनांच्या निदर्शनास निवडणुका झाल्यानंतर आले होते, ही बाब अत्यंत गंभीर होती, कारण इतक्या मोठ्या प्रमाणात अपात्र नोंदणीमुळे निवडणुकीच्या निष्पक्षतेवर परिणाम होणे स्वाभाविक आहे. निवडणूक आयोगाने काही प्रमाणात छाननी केली असली तरी, अंतिम मतदार यादी एकदा प्रसिद्ध झाल्यानंतर तिच्यात बदल करता येत नाही हा नियम असल्यामुळे अनेक अपात्र मतदार मतदान प्रक्रियेत सहभागी झाले होते.

**फेक मतदार कोणते?**

अमरावती शिक्षक मतदार संघाच्या - २०२० च्या निवडणुकीत झालेली फेक नोंदणी ही अत्यंत चिंताजनक बाब होती.तपशीलवार पाहता, अपात्र नावे विविध स्वरूपात मतदार याद-ीत समाविष्ट झाल्याचे स्पष्ट झाले. यामध्ये सर्वप्रथम कॉन्व्हेंट शाळांतील शिक्षक यांचा समावेश होता.या संस्था प्रत्यक्षात माध्यमिक अथवा उच्च माध्यमिक मान्यताप्राप्त श्रेणीत मोडत नसतानाही त्यांचे कर्मचारी मतदार म्हणून नोंदवले गेले. दुसरी मोठी श्रेणी म्हणजे प्राथमिक शाळांतील शिक्षक. लोकप्रतिनिधित्व कायदा,१९५० मधील स्पष्ट व्याख्येनुसार ते पात्र ठरत नसतानाही मोठ्या प्रमाणात त्यांची नावे यादीत समाविष्ट झाली.

याशिवाय, मान्यता नसलेल्या विनाअनुदानित शाळांतील शिक्षक व कर्मचारी यांनाही मतदार यादीत स्थान मिळाले. सर्वाधिक गंभीर बाब म्हणजे गैर-अध्यापन कर्मचा-री जसे की क्लार्क, प्रयोगशाळा परिचर, लिपिकीय कर्मचारी, ज्या-ंचा 'शिक्षक' या संकल्पनेशी काह-ीच संबंध नाही, त्यांचीही नावे मतदार यादीत समाविष्ट झाल्याचे दिसून आले. या सर्व प्रकारामागे काही शैक्षणिक संस्थांचे मालक, उद्योगपती किंवा ठेकेदार यांचा स्वार्थी हस्तक्षेप असल्याचे गंभीर आरोप झाले. परिणामी, खरे शिक्षक दुय्यम ठरले आणि शिक्षक मतदारसंघाच्या स्थापनेमागचा मूळ उद्देश म्हणजेच शिक्षकांच्या प्रगल्भ आणि स्वतंत्र प्रतिनिधित्वाची संकल्पना अक्षरशः कोलमडून पडली.




**संविधानकर्त्यांचा विरुद्ध वास्तव**

भारतीय संविधानकर्त्यांनी शिक्षक मतदारसंघाची संकल्पना करताना शिक्षणविषयक धोरणनिर्मितीत शिक्षकांचा थेट सहभाग, गुणवत्तापूर्ण चर्चा आणि त्यांच्या व्यावसायिक प्रश्नांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे, हा उदात्त हेतू ठेवला होता. पण आज या संकल्पनेचे विकृतीकरण झाले आहे. शिक्षक नसलेले व्यक्ती उमेदवार बनतात भांडवलदार, उद्योजक व कॉन्ट्रॅक्टर विविध मार्गांनी नावे नोंदवून निवडणुकीत उतरतात आणि जिंकतात. अनेकदा दहावी-बारावी नापास, पदवीविरहि-त लोक संघटना उभ्या करून या क्षेत्रात प्रवेश करतात. परिणामी खऱ्या शिक्षकांचा आवाज दबतो आणि विधान परिषदेतील चर्चेचे शैक्षणिक गुणवत्ता घसरली, हीच शिक्षक मतदारसंघाची शोकांतिका ठरते.

निवडणूक आयोगाची जबाबदा-री-शिक्षक मतदारसंघाच्या शुचिता साठी निवडणूक आयोगाची भूमिका निर्णायक ठरते. आयोगाने फक्त मान्यताप्राप्त शाळा-महाविद्यालयांतील खऱ्या शिक्षका-ंची नावेच मतदार यादीत समाविष्ट केली पाहिजे. अपात्र नावे टाळण्यासाठी कठोर छाननी करून, फेक नोंदणी करणाऱ्या संस्थाचालक, मुख्याध्यापक, प्राचार्य यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच शिक्षक संघटनांकडून आलेल्या आक्षेपांची वेळेत दखल घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अन्यथा संविधानकर्त्यांनी अपेक्षित केलेल्या 'शिक्षकांचा खास प्रतिनिधी' ही संकल्पना धोक्यात येईल व शिक्षक मतदारसंघाची मूळ उद्दिष्ट अपूर्ण राहतील.

चिंतन-आज शिक्षक समाजास-मोर सर्वात गंभीर प्रश्न उभा आहे, आपणच आपले मतदान पैशासाठी विकतो का? अनेक निवडणुकांत ५,००० ते १०,० ०० रुपयांत मतं विकल्याच्या चर्चा आहेत. कुठे पैठणी, कुठे संविधान प्रत, तर कुठे शिवाजी महाराजांच्या मूर्ती देऊन मत खरेदी केल्याचे उदाहरणे आहेत. आता तर या निवडणुकीत पैठणीसोबत सफारीचे कापड आणि नथ वाटप होत होईल अशी चर्चा आहे,जर हे खरे असेल, तर शिक्षक मतदारसंघाचा ऱ्हास बाह-ेरील शक्तींनी नव्हे, तर आपल्या स्वतःच्या कमकुवतपणाने घडवून आणला आहे. आपणच हक्काचा सौदा करत असू, तर विधान परिषदेत शिक्षकांचा प्रामाणिक आवाज कोण मांडणार ? म्हणूनच ही आत्मपरीक्षणाची निर्णायक वेळ आहे.भविष्यातील प्रश्न-शिक्षक मतदारसंघ हा भारतीय लोकशाहीतील अनोखा प्रयोग आहे, पण आज त्याचे भविष्य प्रश्नचिन्ह आहे. पुढील निवडणुकांत खरोखर पात्र शिक्षकांची नोंदणी होईल का, की पुन्हा अपात्र व फेक नावे घुसवली जातील? या मतदारसंघातून प्रामाणिक शिक्षक प्रतिनिधी विधान परिषदेत पोहोचतील का, की पुन्हा व्यवसायिक, संस्थाचालक वा कॉन्ट्रॅक्टर आमदार होतील? गेल्या काही निवडणुकांत फेक नोंदणी, अपात्र व्यक्तींचा शिरकाव आणि पैशासाठी मतदान विक्री यामुळे या प्रयोगाची शुचिता धोक्यात आली आहे. खऱ्या अर्थाने शिक्षकांचा आवाज जिवंत ठेवायचा असेल, तर आता सजगतेने आत्मपरीक्षण करावे लागेल.शिक्षक मतदारसंघाचे अस्तित्व टिकवायचे असेल, तर निवडणूक आयोगाने कठोर छाननी करून फक्त पात्र शिक्षकांचीच नावे यादीत असावीत. शिक्षकांनी पैशासाठी मतदान विकण्याऐवजी प्रामाणिक उमेदवाराला मत देऊन लोकशाही मजबूत करावी. समाजानेही या मतदारसंघाच्या वेगळेपणाची जाणीव ठेवून बाहेर स्वार्थी गटांना थारा देऊ नये आणि शिक्षकांना पाठबळ द्यावे. अन्यथा संविधानकर्त्यांचा उदात्त हेतू शिक्षकांचा स्वतंत्र व अभ्यासपूर्ण आवाज विधान प्रक्रियेत ऐकू यावा कधीच साकार होणार नाही. ही वेळ आहे शिक्षक समाजाने स्वतःला सिद्ध करण्याची आणि लोकशाहीची खरी शुचिता जपण्याची वेळ आली आहे.

**प्राचार्य डॉ.पी.पी.राजपूत**
अमरावती ९३७३०२३६४४

# एआय फोटो ट्रेंड, महिलांकरिता धोका...?

**आ**धुनिक तंत्रज्ञानात एआय ही सर्वांत वेगाने वाढणारी क्रांती आहे. फोटो तयार करणे, बदलणे आणि नव्या पद्धतीने दिसविणे हे त्याचे मोठे आकर्षण बनले आहे. विशेषतः महिलांसाठी फोटो-जनरेशन एआय हे एक धोकादायक शस्त्र ठरू शकते. दिसायला हा एक साधा ट्रेंड असला, तरी त्याचे सामाजिक, मानसिक आणि नैतिक परिणाम गंभीर असू शकतात.

**एआय फोटो ट्रेंडचे आकर्षण:-** आज फक्त एक साधा फोटो अपलोड केला तरी कृत्रिम बुद्धिमत्ता त्यातून डझनभर नवीन, वेगळे फोटो तयार करून देते. पारंपरिक मेकअपशिवाय सुंदर दिसणे, नवीन ड्रेस घातल्यासारखे फोटोज, किंवा आगळीवेगळी लोकेशन्स हे सर्व एआयमुळे शक्य होते. अनेक महिला व मुली यामध्ये मजा म्हणून सहभागी होतात. परंतु या मागे लपलेला धोका कुणालाही सहज लक्षात येत नाही.



**महिलांसाठी वाढणारा धोका:-** सोशल मीडियावर टाकलेला साधा प्रोफाइल फोटो जर एआयच्या डेटाबेसमध्ये गेला तर, त्याचे रूपांतर कुठल्याही स्वरूपात केले जाऊ शकते.

महिलांचे खोटे फोटो तयार करून त्यांचा वैयक्तिक अपमान करणे किंवा ब्लॅकम-ेलिंगसाठी वापरण्याचा धोका जास्त आहे.परवानगीशिवाय तयार केलेले अश्लील किंवा फेक फोटो त्यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचवतात. अनेकदा असे फेक फोटो इतके खरे वाटतात की त्यातला फरक साध्या व्यक्तीला लक्षात येणं कठीण होते.

**भविष्यातील परिणाम:-** मानसिक असुरक्षितता महिलांना सतत वाटत राहील की त्यांचा फोटो कुठे, कसा वापरला जाईल. हा एक प्रकारे नवीन सायबर-छळ असेल.


**प्रतिष्ठा धोक्यात:-** फेक फोटो पसरल्यास त्यांचा व्यावसायिक आणि सामाजिक सन्मान गमावण्याची वेळ येईल.

**सामाजिक छळ :-** समाजात अन्यायकारक प्रश्न, अपमान किंवा अविश्वासाचा सामना करावा लागू शकेल.

**महिला सोशल मीडिया-पासून दूर जाणे:-** या सततच्या धोक्यामुळे अनेक महिला सोशल मीडिया सोडून द्यायला भाग पडतील, ज्यामुळे त्यांचा सामाजिक सहभाग मर्यादित होईल.

**धोका टाळण्यासाठी उपाय:-** सोशल मीडियावर वैयक्तिक फोटोंचा मर्यादित वापर करा.फोटो शेअर करण्यापूर्वी privacyed est-tings तपासा. नवीन एआय ट्रेंडमध्ये भाग घेण्याआधी चा-ंगले विचार करा की तुमचा डेटा सुरक्षित आहे का. सरकार व कायद्याने एआय फोटोमधील गैरवापराविरुद्ध कडक नियम करणे आवश्यक आहे.

# श्रमणध्वनी : व्याप्तम् येन् चराचरम् !!



**हा** विषय घेण्याचे कारण म्हणजे माझी पत्नी. ती सदैव हसतमुख ,तणाव विरहित आणि अठरा विसा आनंदी दिसते. तिचा गंभीर,नाराज किंवा दुःखी असलेला फोटो आमच्या संग्रहात नाहीच.तो ठरवून काढला तरी निघत नाही. तिच्या चेहऱ्यावर हास्य कायम निवासी. या प्रफुल्लतेचे अनेक रहस्य असतील पण सर्वांत महत्वाचे म्हणजे ती सोशल मेडिया अर्थात wapped ,फेसबुक कडे फार लक्ष देत नाही. आठ आठ दिवस ती wapped उघडत नाही. फेसबुक तर पाहतच नाही. ट्वि-वटर, इन्स्टा वगैरे तर कोसो दूर.

बरं ! मोबाईल नाही असं नाही. बऱ्यापैकी भारिचा अँड्रॉइड मोबाईल तिच्याजवळ आहे. पण त्यापेक्षा भारिचा विवेक आणि संयम आहे तिच्याजवळ.ती मोबाईल पाहत नाही असे नाही. पाहते पण फार फार तर यूट्यूब वर डॉ. तोडकर, रामदेवबाबा ,पाककृती आणि कांही महाराजांचे विचार,कांही घरगुती उपाय ती पाहते. खुपच मूड झाला तर नातेवाईकांच्या ग्रुपवर प्रासंगिक फोटो.बाकी घरकाम ,शिवलीलामृत अकरावा अध्याय , मनात आले तर थोडा वेळ तिचा जुना बालाजी ग्रुप हेच तिचे विश्व. मोबाईलला नगण्य स्थान.कामात असेल तर तिला आलेल्या फोन कडेही दुर्लक्ष. कित्येकदा स्नेहिजन माझ्याजवळ ती फोनच उचलत नाही याबाबत तक्रारही करतात.

wapped चे ग्रुप तर महि-नोन्महिने पाहत नाही. स्टेट्स तर लांबच. कधी कधी मुलगा किंवा मी गंमत म्हणून ठेवतो स्टेट्स तिच्या मोबाईलला पण ती मात्र अज्ञात असते.हे सर्व भारुढ यां-साठी की ती तणावरहित, आनंदी आणि हसतमुख का असते याचे उत्तर त्यातून मिळते. ताणतणाव ,दुःख तिला नाही असं नाही पण ते उफाळून चेहऱ्यावर येत नाही हे सत्य आहे.

जगातले जवळजवळ शंभर टक्के अँड्रॉइड धारक लोक मोबाईलच्या आधीन झाले आहेत. तहानभुक विसरून त्यांची डोकी मोबाईल मध्ये व्यस्त असतात. त्यामुळे मानेचे, डोक्याचे ,डोळ्याचे आणि अनेकांना तर मेंदूचे विकारसुद्धा जाणवू लागले आहेत.गप्प बसून राहावं म्हणून कित्येक माता आपल्या एक दीड वर्षाच्या तान्हुल्याच्या हातात मोबाईल देऊन टाकतात. आणि तो देखिल हाती मोबाईल असेल तर शांत खेळत बसतो पाळण्यात. त्याची माय काम क-रायला मोकळी मोबाईल पाहता पाहता.

सर्व माणसे मोबाईलच्या ताब्यात गेली. मोबाईल वरून उठविले तर घरात भांडण लागतात. चिडचिड ,शिव्या, हाणामारी तर नित्याचेच पण खून आणि आत्महत्या देखिल वाचनात आल्या.कार्यालय असो की दुकान ,कामांवरचा मजूर असो की शेतकरी. इतकंच काय कांही प्राणी देखिल मोबाईलच्या आधीन गेल्याचे सोशल मेडिया वर माझ्या वाचनात आले. थोडक्यात मोबाईल म्हणजे 'व्याप्तम् येन चराचरम्' झाला.पत्नी मला ने-हमीच सांगते मोबाईल आपल्यासाठी की आपण मोबाईलसाठी. याचे यथार्थ उत्तर सापडलं की सारी दगदग आणि वदवद संपुष्टात येईल.

मोबाईल मध्ये पन्नास टक्क्यांहून भारत गुंतलेला आहे.त्यामुळे अर्ध्या भारताला देश,समाज या विषयी काहीही घेणे देणे नाही. मोबाईल पुढे देशात काय सुरू आहे,समाजात काय परिस्थिती आहे याचा विचार त्यांना शिवत देखिल नाही.मोबाईल मध्ये लोकांना गु-ंतवून ठेवण्याचे षडयंत्र आहे असे मी म्हणणार नाही पण मोबाईल मुळे षडयंत्र करणाऱ्यांना सोपे झाले. रेल्वे,बस, कार्यालय किंवा कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी पहा सर्व माणसे मोबाईल मध्ये गु-ंग असतात.मॅकलो ने शिक्षणातून भारतीयत्व नष्ट करून देशात स्वार्थी पिढी निर्माण करणारी व्यवस्था निर्माण केली.मोबाईल त्याही पुढे गेला.त्याने भारतीयत्व नाही तर मनुष्यत्वच मोडीत काढले.आपले फॉलोअर्स वाढावे म्हणून पाण्यात बुडणाऱ्या माणसाला वाचविण्या पेक्षा त्याचा व्हिडिओ काढण्यात धन्यता म्हणणारे मनुष्य नव्हे राक्षसच आहेत.मोबाईल निव्वळ वाईटच आहे असे माझे मत नाही. तो चा-ंगलाच आहे पण तो आपल्या आधीन असला तर. पण जर का आपण त्याच्या आधीन गेलो तर मात्र वाटेवर काटेच.

मोबाईल मर्यादित वापरला तर तो अमृत ठरेल अन्यथा तो हलाहल आहे.

**प्रा. दिलीप जोशी,**
वाशीम.

## दिवाळी विशेषांक- २०२५

दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही 'जनमाध्यम' दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामाजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपवावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक 'जनमाध्यम' तर्फे विनंती...आपले साहित्य atimadham@gmail.Com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सअॅप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम'कडे राखीव राहील. इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.१० ऑक्टो.२०२५ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.

# आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन:समाजशास्त्रीय चिंतन

**मा**नव समाजाच्या इतिहासात असमानता ही जणू अपरिहार्य छाया ठरली आहे. जाती, वंश, धर्म, भाषा अशा विविध आधारांवर भेदभाव अनुभवला गेला; मात्र या सर्वात सर्वाधिक दीर्घकाळ आणि खोलवर ठसलेला भेदभाव म्हणजे स्त्री-पुरुष असमानता होय. मानवी सभ्यता जसजशी प्रगत होत गेली तसतसे 'समता' हे मूल्य केंद्रस्थानी आले. प्राचीन काळातील वंशभेद, जातीभेद, धर्मभेद या अडथळ्यांवर मात करत समाजाने लोकशाही, मानवाधिकार, सामाजिक न्याय अशा संकल्पना रुजवल्या आहेत. मात्र आजही लिंगभावभेदाच्या स्वरूपात असमानता टिकून आहे. स्त्री आणि पुरुष या दोन अर्धांगांनी समाजाची उभारणी झाली असली तरी श्रमाचे मोल ठरवताना स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला गेला आहे. घरगुती, सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रांत स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले. कालांतराने शिक्षण, लोकशाही मूल्ये,स्त्रीवादी चळवळी यामुळे परिस्थितीत बदल घडू लागला आहे.तरीदेखील समानतेच्या लढाईत 'समान कामासाठी समान वेतन' हा प्रश्न आजही निकाली लागलेला नाही. स्त्री-पुरुष दोघेही सारखे श्रम करत असले, समान जबाबदाऱ्या पार पाडत असले, तरीही वेतनाच्या बाबतीत स्त्रियांना कमी मोबदला मिळत असतो. समान का-मासाठी समान वेतन हा केवळ आर्थिक मुद्दा नाही; तर तो सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि लोकशाही तत्त्वांचा गाभा आहे. या वास्तवाची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी १८ सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन' साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे स्त्रिया-ंच्या हक्कांची, मानवी मूल्यांची आणि घटनात्मक तत्त्वांची आठवण करून देणारा एक जागतिक उपक्रम आहे. हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून सामाजिक न्यायाच्या प्रवासात आत्म परीक्षणाचा क्षण आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोना तून विचार केल्यास समान वेतनाचा प्रश्न हा केवळ कायदेशीर तरतुदींचा किंवा का-मगार धोरणांचा नाही, तर तो सत्ता-संरचनेशी जोडलेला आहे. शतकानुशतकं पित ृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना घरगुती जबाबदा ऱ्यांपुरते मर्यादित केले गेले आहे. बालसंगोपन, घरकाम, वृद्धांची देखभाल या कामांना आर्थिक मूल्यच दिले गेले नाही. त्यामुळे स्त्रीच्या श्रमाचे अवमूल्यन झाले आहे. ही मानसिकता आजही कायम आहे. स्त्रिया कामाच्या ठिकाणी गेल्या तरी त्यांचे योगदान दुय्यम मानले जाते. परिणामी स्त्रियांच्या श्रमांना 'अदृश्य काम' अशी ओळख मिळाली. त्या घराबाहेर का-मासाठी गेल्या तरी त्यांचे योगदान दुय्यम मानले गेले. यामुळेच ग्रामीण भागातील शेतमजुरी असो किंवा शहरी भागातील कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकरी असो, सर्व स्तरांवर स्त्रियांना कमी वेतन दिले जाते.

भारतातील ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रात स्त्रिया वीटभट्टी, बांधकाम, शेतम जु-री, मोलमजुरी, घरकाम या क्षेत्रांत काम करतात. त्यांना पुरुषांच्या तुलनेत कमी मजुरी मिळते. शहरी भागातील शिक्षण घेतलेल्या स्त्रिया उद्योगधंद्यात, प्रशासनात, आयटी कंपन्यांत कार्यरत आहेत; तरीही त्यांचे वेतन पुरुषांच्या तुलनेत कमी असते. या विषमतेला 'जेंडर पे गॅप' असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवाला नुसार भारतातील स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत सरासरी २७ टक्क्यांनी कमी वेतन मिळते. असंघटित क्षेत्रात ही दरी आणखी मोठी आहे. जागतिक संदर्भात पाहिले तरी परिस्थिती फारशी वेगळी नसून हा प्रश्न गंभीर आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'यूएन वि-मेन' अहवालानुसार जगभरातील स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत सरासरी २० टक्के कमी वेतन मिळते. काही प्रगत देशांनी यावर मात करण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या आहेत. आइसलँडने २०१८ पासून प्रत्येक कंपनीला समान वेतनाचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले आहे. स्वीडन, नॉर्वे, फिनलंड यांसारख्या देशांत वेतन संरचना पारदर्शक ठेवली जाते. त्याच्या तुलनेत भारतात १९७६ मध्ये 'समान वेतन कायदा' करण्यात आला तसेच २०१९ मध्ये 'वेतन संहिता' लागू करण्यात आली. पण अंमलबजावणीच्या बाबतीत मर्यादा आहेत. तपासणी यंत्रणा कमी, महिलांच्या हक्कांविषयी जागरूकतेचा अभाव आणि असंघटित क्षेत्राची व्याप्ती मोठी असल्यामुळे कायद्यांचा परिणाम अपेक्षेइतका झाला नाही.

भारतीय न्यायव्यवस्थेने मात्र 'समान कामासाठी समान वेतन' हा घटनात्मक तत्त्वांचा भाग असल्याचे ठामपणे मांडले आहे. रणधीर सिंग विरुद्ध भारत संघ (१९८२) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की लिंगाच्या आधारावर वेतनात भेदभाव करणे हा घटनात्मक अधिकारांचा भंग आहे. इतर अनेक खटल्यांतही न्यायालयां-नी स्त्रियांना समान वेतनाचा अधिकार दिला. पण प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी अद्यापही अदृश्य अडथळे दिसून येतात. स्त्रियांना एका विशिष्ट पातळीपलीकडे बढती मिळत नाही, निर्णयक्षम पदांवर त्यांना पोहोचता येत नाही. हे आर्थिक आणि सामाजिक दोन्ही स्तरांवर अन्यायकारक असून त्यामुळे आर्थिक व सामाजिक सत्तेतील असमानता अधिक गडद होते.

समान वेतनाची अंमलबजावणी केल्यास त्याचे परिणाम केवळ स्त्रियांसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी सकारात्मक होतात. महिलांना योग्य मोबदला मिळाल्यास त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होऊन कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम होते. घरगुती निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढतो. मुलांच्या शिक्षणावर, आरोग्यावर अधिक खर्च होतो. लवकर लग्न, हुंडा यांसारख्या प्रथा कमी होतात. मुलींचे शिक्षण वाढते आणि पुढील पिढ्या सबलीकरणाच्या दिशेने वाटचाल करतात. आर्थिकदृष्ट्या सक्षम महिला समाजातील लोकशाही प्रक्रियेतही सक्रियपणे सहभागी होतात. त्यामुळे समान वेतन हा मुद्दा राष्ट्राच्या एकूण विकासाशी निगडित असून त्यामुळे राष्ट्राच्या विकासाला गती मिळते.

शेवटी एवढेच म्हणता येईल की, समान वेतन हा आर्थिक मुद्दा नसून सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि घटनात्मक समतेचा प्रश्न आहे. आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन हा स्त्री-पुरुष समतेच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. तो आपल्याला स्मरण करून देतो की खरी लोकशाही आणि खरी प्रगती तेव्हाच साध्य होईल जेव्हा स्त्री-पुरुषांना समान श्रमासाठी समान मोबदला मिळेल. ही जबाबदारी केवळ सरकारची किंवा न्यायालयांची नसून संपूर्ण समाजाची आहे. स्त्री-पुरुष समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येकाला आपला वाटा उचलावा लागेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
मो. क्र.
९९६०१०३५८२

# एसटी आरक्षणासाठी बंजारा समाजाकडून एकदिवसीय धरणे

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील सकल बंजारा समाजाच्या वतीने सकल बंजारा समाज आरक्षण कृती समिती तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारी एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. हैदराबाद मुक्ती दिनाचे औचित्य साधून हे आंदोलन राबविण्यात आले.



बंजारा समाज हा मूलनिवासी असून भारत स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीपासूनच आरक्षणापासून वंचित आहे. ब्रिटीशांच्या काळात १८७१ मध्ये बंजारा समाजाला गुन्हेगारी जमात म्हणून घोषित करण्यात आले होते. पुढे १९५२ मध्ये गुन्हेगारी जमात कायदा रद्द झाल्यानंतर बंजारा समाजाला अनुसूचित जमातीमध्ये (एऊ) समाविष्ट व्हायला हवे होते.

हैदराबाद गॅझेटियरनुसार तत्कालीन आंध्रप्रदेश (सध्याचे तेलंगणा) तसेच मराठवाड्यात बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळत होते. मात्र महाराष्ट्र राज्यात बंजारा समाजाला विमुक्त जाती (DT/VJ) प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे समाज आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिला आहे. १९५२ पासून बंजारा समाज सतत एऊ आरक्षणासाठी संघर्ष करीत असून गॅझेटियरमधील नोंदी हाच त्याचा ठोस पुरावा असल्याचे समाज नेत्यांनी सांगितले. अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या या आंदोलनात जिल्ह्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी व शेकडो बंजारा बांधव, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## अग्रसेन जयंती सप्ताहाची गणेशपूजन व महाआरतीने प्रारंभ

**अकोला :** संपूर्ण अग्रवाल समाजाला आदर असलेले महाराजा अग्रसेन यांच्या जयंती सप्ताहाची सुरुवात बुधवारी स्थानिक अग्रसेन भवनात गणेशपूजन आणि महाआरतीने झाली. संपूर्ण अग्रवाल समाज २२ सप्टेंबर रोजी महाराजा अग्रसेन यांची जयंती साजरी करत आहे. अग्रवाल समितीचे अध्यक्ष दीपक गोयनका यांच्या अध्यक्षतेत स्थानिक अग्रसेन भवनात संपन्न झालेल्या या अग्रसेन जयंती सप्ताहाच्या उद्घाटन समारंभात यजमान श्रीमती सुशीलादेवी भिकूलाल गोयनका, उत्सव गोयनका, किरण व संजय तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक रमाकांत खेतान, शिवकुमार रुहाटीया, वसंत बाछुका, कमलकिशोर अग्रवाल, डॉ. के.के. अग्रवाल, रामलाल अग्रवाल, आदी उपस्थित होते.

# बंजारा समाजाकडून पातूर येथे धरणे आंदोलन

## एसटी प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

बंजारा आरक्षण राज्यव्यापी क्रांतिकारी समिती यांच्या नेतृत्वात पातूर तालुक्यातील सकल बंजारा समाजाने आज (दि.१७ सप्टेंबर) तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले.

हैदराबाद गॅझेटच्या धरतीवर महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी या आंदोलनातून करण्यात आली.

नुकतेच राज्य शासनाने काही समाजांना एसटी प्रवर्गात समाविष्ट करण्यास मंजुरी दिली आहे. तसेच तेलंगणा, कर्नाटक आदी राज्यांत बंजारा समाजाला अनंत काळापासून एसटी प्रवर्गाचा लाभ मिळत आहे. मात्र महाराष्ट्रातील बंजारा समाज अजूनही या आरक्षणापासून वंचित असल्याने संताप व्यक्त करण्यात आला.




या आंदोलनात मोठ्या संख्येने बंजारा बांधवांनी हजेरी लावून शांततेत आपला रोष नोंदवला. समाजामध्ये उच्चशिक्षित आणि बेरोजगार तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, शासनाच्या दुर्लक्षामुळे त्यांना शासकीय सेवेत संधी नाकारली जात आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला.

बंजारा समाजाला तातडीने एसटी प्रवर्गात समाविष्ट करून न्याय द्यावा, अशी ठाम मागणी या धरणे आंदोलनातून करण्यात आली.

# २० गोवंशांना जीवनदान : तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

### चान्नी पोलिसांची अंधारसांगवी परिसरात कारवाई

■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात कत्तलीसाठी बेकायदेशीरपणे नेण्यात येत असलेल्या २० गोवंशांना जीवनदान देण्यात आले. ही कारवाई बुधवार, दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी चान्नी पोलिसांनी केली.



चोंढी धरण ते अंधारसांगवी मार्गावरून तीन इसम जनावरे नेत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्जित चांडक यांच्या ऑपरेशन प्रहार अंतर्गत, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी व बाळापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांच्या आदेशानुसार ही धडक कारवाई करण्यात आली.

ठाणेदार रवींद्र लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विजय घुगे, अनिल सोळंके, सुधाकर करवते व राजकुमार पवार यांनी घटनास्थळी धाव घेऊन चौकशी केली. त्यावेळी जनावरे नेत असलेल्या तिघांकडे कुठलेही दाखले किंवा वाहतुकीसंबंधी परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे ही जनावरे कत्तलीसाठी नेली जात असल्याचे उघड झाले.

पोलिसांनी तत्काळ कारवाई करून अंदाजे १ लाख २० हजार रुपये किमतीची २० जनावरे ताब्यात घेऊन ती गोरक्षणामध्ये जमा केली. या प्रकरणी पिंपरडोळी येथील दिनकर पुजाराम खुळे, अनिल किसन अल्हाट व शिवराम जानकीराम जांबकर या तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास उपनिरीक्षक शेरअली करीत आहेत.

> ‘घटनास्थळी चौकशी दरम्यान आरोपींकडे कोणतेही परवाने किंवा दाखले आढळून न आल्याने जनावरे कत्तलीच्या उद्देशाने नेत असल्याचे निष्पन्न झाले. २० गोवंशांना ताब्यात घेऊन गोरक्षणामध्ये जमा केले असून, तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.’
>
> **रवींद्र लांडे,**
> ठाणेदार, पोलीस स्टेशन चान्नी

# उमरा परिसरातील पीक नुकसानीच्या सर्वेक्षणातील घोळ

## तलाठ्यासह सर्वेक्षण पथक निलंबनाच्या प्रस्तावाची मांडणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील उमरा परिसरात झालेल्या पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात मोठा घोळ झाल्याचे उघड झाल्यानंतर तहसीलदार राहुल वानखेडे यांनी सर्वेक्षण पथकातील तलाठी एस. पी. लठाड, सचिव जयेश तायडे व कृषी सहाय्यक विजय भगत यांना निलंबित करून शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर केला आहे. हा प्रस्ताव १२ सप्टेंबर रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक व उपविभागीय अधिकारी बाळापूर यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.




खासदार अनुप धोत्रे यांनी नुकतेच परिसरात पाहणी केली होती. मात्र नुकसानग्रस्त असूनही काही शेतकऱ्यांनी तलाठ्यांना पैसे देण्यास नकार दिल्याने त्यांना सर्वेक्षण यादीतून वगळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. उलट काही शेतकऱ्यांची जमीन धरणाच्या पाण्यात बुडीत असतानाही त्यांच्या नावांचा समावेश यादीत करण्यात आल्याचे समजते.

तलाठी लठाड यांनी रुजू झाल्यापासून दलालांच्या मार्फत आर्थिक व्यवहार करून सर्वेक्षणात शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा आरोप करण्यात आला आहे. या लाचखोरीच्या कारभाराविरोधात ग्रामपंचायत व शेतकऱ्यांनी मोर्चाचा इशाराही दिला होता.

**काहीच खातेदारांचा सर्वेक्षण :** उमरा परिसरात २०२५ मधील पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात केवळ काहीच खातेदारांचा समावेश झाला असून, मोठ्या प्रमाणात शेतकरी मदतीपासून वंचित राहिल्याचे तहसीलदारांनी प्रस्तावात स्पष्ट केले आहे.

**तलाठ्याविरुद्ध तब्बल ४१ तक्रारी :** तलाठी एस. पी. लठाड यांच्याविरुद्ध केवळ सर्वेक्षणातील घोळच नव्हे तर आर्थिक व्यवहारासंदर्भात एकूण ४१ तक्रारी तहसीलदारांकडे दाखल झाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कारभाराबाबत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# महिला मिडटाऊन शाखेची विद्यार्थीनी साठी मासिक पाळी जागरूकता कार्यशाळा



■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक आणि सांस्कृतिक सेवेत सक्रिय आणि महिला शक्ती ही राष्ट्रीय शक्तीची जाणीव करून देणाऱ्या महिलांच्या मारवाडी युवा मंच मिडटाऊन शाखेने स्थानिक मनुताई कन्या शाळेत विद्यार्थीनीच्या आरोग्यासाठी मासिक पाळी जागरूकता कार्यशाळा घेतली, यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मिडटाऊन अध्यक्षा रूपाली कागलीवाल यांच्या पुढाकारात संपन्न झालेल्या या कार्यशाळेत अकोला येथील प्रसूती आणि स्त्रीरोग सोसायटीच्या अध्यक्षा व वरिष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ भारती राठी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात देवी सरस्वतीच्या प्रार्थनेने झाली. सर्व पाहुण्यांचे आणि मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. डॉ. सौ राठी यांनी पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनद्वारे मासिक पाळीशी संबंधित सर्व अडचणी आणि गैरसमजांचे तपशीलवार वर्णन केले. मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, ज्यामुळे तरुणींमध्ये हार्मोनल बदल होतात. त्यांनी आपल्या शरीरावर याचा काय परिणाम होतो याबद्दल पुरेसे मार्गदर्शन केले आणि आहार आणि व्यायामाचे महत्त्व देखील स्पष्ट केले. हा प्रकल्प राज्य उपाध्यक्ष रोहित रुंगटा यांच्या प्रेरणेने आणि सह-कोषाध्यक्ष निधी मित्तल यांनी प्रकल्पाचे कामकाज हाताळले.

## केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे जयंती साजरी

■ प्रतिनिधी | अकोला ■

१७ सप्टेंबर २०२५ रोजी अकोला महानगरपालिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून पुजन करण्यात आले. यावेळी मंगेश जाधव, गणेश गावंडे, योगेश मारवाडी, राजेश शिरसाट आदींची उपस्थिती होती.

**Change In Name**

My Old name was
**MOHAMMAD JAVED ABDUL AZIZ MANIYAR**
now my new name is
**MOHD JAVED ABDUL AZIZ MANIYAR**
For All Futures Purposes
Address
LAL BANGLA BEHIND CHOTI MASJID AKOLA

**Change In Name**

I Have Change "Mother Name" in My Son's Passport :- **(N1989476)**
From
**SHABANA PARVEEN KHAN**
--TO--
**SHABANA PARVEEN ASHFAQUE HUSAIN KHAN**
My Residential Address is :- Lakkadganj Road back side of Al hira appartment Firdos Colony Akola 444001

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport No is - **(N1989476)** From
**SHADAB HUSAIN KHAN**
--TO--
**SHAHDAB HUSAIN KHAN ASHFAQUE HUSAIN KHAN**
My Residential Address is :- Lakkadganj Road Near Pakiza Pan Center Firdos Colony Akola 444001

### जाहिर सूचना

सर्व लोकांना एवं वितीय संस्थांना या जाहीर सूचना व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी श्री . १ ) भरतकुमार चंदुलाल वखारिया २) मुकेश चंदुलाल वखारिया, ३) धनसुखलाल चंदुलाल वखारिया, ४) नितिन चंदुलाल वखारिया ५) सौ. आशा मुकुंद सांगाणी (मृतक) तर्फे त्यांचे सर्व वारसांसोबत त्यांचे वडिलोपार्जित स्थावर मिळकत संबंधी सौदा केलेला आहे आणि ७ दिवसा नंतर कधीही नोंदणीकृत खरेदीखत करुन घेणार आहे. स्थावर मिळकतीचे विवरण :- नझूल शिट नं. ३८-बी, प्लॉट नं. ५२/६ वरील बांधण्यात आलेले घर, ज्यास चतु: सिमा- पूर्वेस - रोड आणी ओपन स्पेस, पश्चिमेस - उत्तर दक्षीण ३० फुट लांब व ११९ फुट रुंद ओपन स्पेस कॉमन टू प्लॉट होल्डर उत्तरेस - धिरजलाल मंगलजी वखारीया यांचे घर दक्षिणेस - ३.६ फूट रुंदीची सर्व्हेस लेन नंतर जवाहर वृंदावनदास वखारिया यांचे घर

येणे प्रमाणे वरील वर्णित व चतू: सिमेतील स्थावर मालमत्यावर बांधलेल्या घराच्या टेरीस इत्यादी वर कोणाचे कोणत्याही प्रकारचे हक्क, कर्ज, गहाण, बोझा, ताबा, व इतर अधिकार व हित संबंध असल्यास त्यांनी वरील नोटीस प्रकाशित झाल्याचे ७ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावे अन्यथा त्यानंतर कोणाचेही कसल्याही प्रकारचे उजर / आक्षेप चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी, करिता ही जाहीर सूचना.

स्थळ : अकोला
दि : १७/०९/२०२५ **सही**

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६६३/२०२५ — प्रोसेस नं.१४६१७/२०२५
चौ.ता. २७/१०/२०२५ — दिनांक : ०२/०९/२०२५

**अर्जदार :** १. मोहसीना परवीन शेख अजहर रा. कुबा मस्जिद जवळ, अशोक नगर, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला. २. समिना सुलतान सरोधानी रा. सोमलपुर, पिसनगन अजमेर, राजस्थान.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शेख सलीम शेख अजीज
**पत्ता :-** रा. कुबा मस्जिद जवळ, अशोक नगर, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शेख सलीम शेख अजीज यांचे दि. ०१/०२/२०२३ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०९/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५६४/२०२५ — प्रोसेस नं.१३८९१/२०२५
चौ.ता. २०/०९/२०२५ — दिनांक : १४/०८/२०२५

**अर्जदार :** १. शरद बाबुराव देशमुख रा. खरप बु. अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : केशरबाई बाबुराव देशमुख
**पत्ता :-** रा. खरप बु. अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत केशरबाई बाबुराव देशमुख यांचे दि. ०५/ ११ / २०२४ रोजी खरप बु. अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २०/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), बार्शिटाकळी, जि. अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३०/२०२५ — प्रोसेस नं.६३२/२०२५
चौ.ता. २६/०९/२०२५ — दिनांक : २८/०८/२०२५

**अर्जदार :** १) वनिता जनार्धन जाणोरकर २) अनैया जनार्धन जानोरकर अ. क्र. ०२ अ. पा. क. अर्जदार क्र. ०२ तर्फे आई अर्जदार क्र. ०१ दोघी रा. जिल्हा परिषद कॉलनीचया मागे, म्हाडा कॉलनी, खडकी, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** (१) गणेश साहेबराव जानोरकर २) गोवर्धन साहेबराव जानोरकर (३) कांता रमेश पावडे ४) शोभा रमेश काकड गैरअर्जदार क. ०१ व ०२ रा. पाटिलपूरा, महान, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला गैरअर्जदार क्र. ०३ रा. गुडधी, ता. जि. अकोला गैरअर्जदार क. ०४ रा. पुनोती बु., ता. बार्शिटाकळी, जि. अकोला
**मयताचा पत्ता :-** मयत : साहेबराव मोतीराम जानोरकार
**पत्ता :-** रा. पाटिलपूरा, महान, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत साहेबराव मोतीराम जानोरकार यांचे दि. ०७/०१/२०१२ रोजी रा. पाटिलपूरा, महान, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला येथे निधन झाले आहे..

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहा अधिक्षक**
दिवाणी न्यायालय (क. स्तर), बार्शिटाकळी जि. अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२१६/२०२५ — प्रोसेस नं.१०९७२/२०२५
चौ.ता. २३/०९/२०२५ — दिनांक : १०/०७/२०२५

**अर्जदार :** मतीन हुसैन अब्दुल लतीफ रा. दहिहांडा, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. अब्दुल लतीफ शेख लाल २. नजमा बी अब्दुल लतीफ
**पत्ता :-** रा. दोघेही रा. दहिहांडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अब्दुल लतीफ शेख लाल यांचे दि. २४/०४/२०१५ रोजी राहते घरी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत नजमा बी अब्दुल लतीफ यांचे दि. २३/११/२००७ रोजी राहते घरी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २३/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जांतीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५१८/२०२५ — प्रोसेस नं.१३३८८/२०२५
चौ.ता. १३/१०/२०२५ — दिनांक : ०८/०८/२०२५

**अर्जदार :** १. विनीता संतोष भिडे रा. ३०४, निलेटा गार्डन, ५२ बंगला, पनवेल जि. रायगड २. सुभाष शशिकांत गोरे रा. फ्लॅट नं. १०४, रॉयल रिजेन्सी, महाजनी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. शशिकांत वामनराव गोरे २. सरिता शशिकांत गोरे
**पत्ता :-** रा. दोघेही रा. फ्लॅट नं. १०४, रॉयल रिजेन्सी, महाजनी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शशिकांत वामनराव गोरे यांचे दि. २१/०६/२०२५ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत सरिता शशिकांत गोरे यांचे दि. २९/०४/२०२२ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १३/१०/२०२५) रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५७१/२०२५ — प्रोसेस नं.१४१७०/२०२५
चौ.ता. ०१/१०/२०२५ — दिनांक : २०/०८/२०२५

**अर्जदार :** १. विष्णू रामदास पागृत २. श्रीरंग रामदास पागृत रा. आलियाबाद, अकोला, ता. जि. अकोला. ३. धनंजय रामदास पागृत ४. अनंत रामदास पागृत रा. फततेपूरवाडी, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामदास तुकाराम पागृत
**पत्ता :-** रा. आलियाबाद, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामदास तुकाराम पागृत यांचे दि. २८/०१/२०१५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०१/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४४४/२०२५ — प्रोसेस नं.१३२०६/२०२५
चौ.ता. ०३/१०/२०२५ — दिनांक : ०७/०८/२०२५

**अर्जदार :** १. रामगोपाल सत्तुलाल मालविया २. सौ. राधाबाई रामगोपाल मालविया दोघेही रा. इंजिनिअरींग कॉलनी, धनवंतरी नगर, मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जगदीश रामगोपाल मालविया
**पत्ता :-** रा. मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जगदीश रामगोपाल मालविया यांचे दि. ०१/०५/२०२५ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०३/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २९१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# भावींना आणखी चार महिने खर्च करावा लागणार

**वर्धा/जनमाध्यम**

चार वर्षांच्या अखंड होत्या निवडणूक थांबवण्याच्या सावटाखाली महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अखेर सर्वोच्च न्यायालयाच्या कडक आदेशानंतर पुढील टप्प्यावर येणार आहेत.

राज्य सरकारला निवडणुका घेण्यासाठी देण्यात आलेली अंतिम मुदत आता ठरली आहे. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व महनगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकांच्या निवडणुकांचे सुरळीत आयोजन आणि निकाल जाहीर करणे आवश्यक.

मागील काळातील ढिलाई व सरकारची पट्टी काढत सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीत राज्य सरकारला कठोर प्रश्न उपस्थित केले.

आयोगाने कर्मचाऱ्यांची कमतरता, सणासुदीचा फटक, आणि ईव्हीएमची उपलब्धता ह्या मुद्यांनी निर्णय विलंबवण्याचा ठपका दिला असला तरी न्यायालयाने यास मान्यता न देता जनतेच्या हितासाठी आणि लोकशाहीच्या कळसाला गती देत योग्य वेळेत काम पूर्ण करण्याचे आदेश दिले.

मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर या राजकीय दंगलासाठी प्रख्यात महानगरपालिका आणि वर्ध्यासह अन्य जिल्हा परिषद क्षेत्रीय राजकारण पाहण्यासाठी आता माडगे उंदीर थांबणार नाहीत. सत्ता हस्तांतरणाचा रणरणाट लवकरच पेटणार आहे.सरकारच्या मागच्या बहाण्यांवर बिंधास्त थेट टोला लगावणारा हा संपूर्ण प्रकरणाचा शेवटचा टप्पा आहे.

आता राजकीय पक्षांमध्ये रणनिती आखण्याची वेळ आली असून, स्थानिक स्वराज्य संस्थांवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रत्येक पक्ष खुनी हाती-थेट संघंडित होण्याची शक्यता उभी राहणार आहे.

राजकारणाच्या रंगभूमीवर कोण ठरतो हे भविष्यातील मोठा घमासान ठरणार आहे. परंतु यावेळी जनतेच्या अपेक्षा आणि स्वराज्य संस्थांच्या ध्येयांची पूर्तता पाहणे अत्यंत गरजेचे आहे.



**स्थानिक स्वराज्य निवडणुका ३१ जानेवारीपर्यंत**

**सर्वोच्च न्यायालयाचा राज्य सरकारवर कडक इशारा**

# शेतकऱ्यांचे लाखो रूपयांचे नुकसान

## शेतकऱ्यांचे लाखो रूपयांचे नुकसान

**हिंगणघाट/जनमाध्यम**

सततच्या मुसळधार पावसामुळे व रोगराईमुळे हिंगणघाट, समुद्रपूर व सिंदि(रेल्वे) विधानसभा क्षेत्रातील सोयाबीन, कापूस व तूर ही मुख्य खरीप पिके अक्षरशः नष्ट झाली आहेत. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसला आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार प्रा. राजु तिमांडे यांनी राज्य व केंद्र शासनाला निवेदन देवून तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्येकी एकरी किमान ५० हजार मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे.

लाखो हेक्टर पिकांचे नुकसान-हिंगणघाट तालुक्यातील बोपापूर, पिपरी, वेनी, हिवरा, पोहणा, आजनसरा, चिंचोली आदी गावांसह समुद्रपूर तालुक्यातील खंडाळा, नारायणपूर, हळदगाव, मांडगाव, तळोदी, राळेगाव, गिरगाव आदी गावांमध्ये शेकडो हेक्टरमधील सोयाबीन व कापूस उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

पाणथळ व रोगराईमुळे एकरी एक किलोही सोयाबीन मिळणे अवघड झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

हवालदिल शेतकरी-उत्पन्नाचा मुख्य आधारच उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी कुटुंबांचे अर्थकारण कोलमडले आहे.

कर्जफेड, संसाराचा खर्च आणि सणासुदीचे दिवस यामुळे शेतकरी चिंता व नैराश्यात आहेत.

अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी हताश होऊन शेतात जनावरे सोडली आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था ठप्प होण्याची भीती व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या उपस्थितीत निवेदन-माजी आमदार प्रा. राजु तिमांडे यांच्या नेतृत्वाखाली काजळसरा व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले.

विविध शेतकरी संघटनांनीही शासनाने वेळ न घालवता संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी केली आहे.

तात्काळ मदतीची मागणी-प्रभावित भागातील सर्व शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करावेत.शेतकऱ्यांना किमान प्रति एकर ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी.

केंद्र व राज्य शासनाच्या कृषी विभागाने तज्ञ पथके नेमून सर्वेक्षण पूर्ण करून तातडीने मदत वितरित करावी.

शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे. की जर शासनाने त्वरित उपाययोजना केल्या नाहीत, तर ते रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील.

# ‘तणावमुक्त जीवन कसे जगावे’

**देवळी/जनमाध्यम**

स्व. श्यामसुंदर अग्रवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित व्याख्यानमालेचे यावर्षी ४१ वे वर्ष सुरू होत आहे. या अंतर्गत, २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ८:३० वाजता डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांचे प्रेरणादायी व्याख्यान होणार आहे.

महाराष्ट्राचे माजी पोलिस महानिदेशक डॉ. उपाध्याय हे ‘तणावमुक्त जीवन कसे जगावे’ या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर मार्गदर्शन करणार असून, त्यांच्या विचारसरणीमुळे अनेकांना जीवनात नवी दिशा मिळाली आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी खासदार रामदास तडस भूषवणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून नागपूरचे माजी पोलिस उप-महानिरीक्षक चंद्रकांत उदगीरकर उपस्थित राहतील.व्याख्यानमालेच्या यशस्वी आयोजनासाठी समाजसेवक मोहनबाबु अग्रवाल यांचे विशेष प्रयत्न लक्षवेधी ठरत असून, सचिव डॉ. गणेश मालधुरे, प्रकाशचंद्र कांकरिया,प्रा. केशवराव कुवारे, महेश अग्रवाल, राहुल चोपडा, मधुसूदन अग्रवाल, दीपक अग्रवाल, नरेश अग्रवाल आदी परिश्रम घेत आहेत.



**डॉ. उपाध्याय यांचे व्याख्यान**

# महिला तस्करीसह गांजा जप्त

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात गांजा तस्करीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेकडून मोठी कारवाई करण्यात आली. समुद्रपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्ती दरम्यान जाम बसस्टॉप परिसरात सापळा रचून एका महिलेसह गांजा जप्त करण्यात आला.

रेश्मा मुस्तफा शेख (वय ४३, रा. बायपास नाना-नानी पार्क, चंद्रपूर) या महिलेकडून ट्रॉलीबॅग आणि कापडी पिशवीमध्ये ठेवलेला तब्बल ८ किलो ३८७ ग्रॅम गांजा, तसेच दोन अँड्रॉइड मोबाईलसह १ लाख ९९ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.तपासात आरोपीने हा गांजा हिंगणघाट येथील रशीद शेख यांच्या सांगण्यावरून ओडिशा राज्यातील मुनीगुडा येथील आर्यन नावाच्या व्यक्तीकडून खरेदी केल्याचे समोर आले.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध समुद्रपूर पोलिस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# अतिवृष्टी, अस्मानी-सुलतानी संकटात शेतकरी भरीव मदतीची मागणी

**देवळी/जनमाध्यम**

यावर्षी हवामानातील प्रचंड बदलामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट कोसळले आहे. सुरुवातीला उशिराने झालेली पेरणी, त्यानंतर दोन नक्षत्रांपर्यंत उघडझाप झालेला पाऊस आणि मघा नक्षत्रापासून सुरू झालेली सततची संततधार यामुळे सोयाबीन, कापूस, तुर, मका, भाजीपाला आदी पिकांचे अक्षरशः धुऊन नुकसान झाले आहे. शेतकरी पिके वाचविण्यासाठी शर्यतीचे प्रयत्न करीत असला तरी उत्पादन किती होईल हे सांगणे अवघड झाले आहे.भावाची घसरण, संसाराचा खर्च, मुलांचे शिक्षण, जेष्ठ पालकांचे आजारपण या सर्व प्रश्नांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. पुढील हंगामासाठी शेती करणे कठीण होईल, असे चित्र उभे राहत आहे.निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करून ‘सातबारा कोरा’ करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, सध्याची परिस्थिती पाहता सरकारने तात्काळ ते आश्वासन पूर्ण करून शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. अन्यथा आत्महत्यांच्या घटनांमध्ये वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.दरम्यान, मागील सरकारच्या काळात नैसर्गिक आपत्ती निवारण निधी (एनडीआरएफ) अंतर्गत मदतीचे निकष लागू होते. त्यावेळी प्रति हेक्टर १३,६०० रुपये आणि तीन हेक्टरपर्यंत मर्यादा होती. मात्र, नवीन नियमांनुसार मदत केवळ ६,८०० रुपये आणि मर्यादा दोन हेक्टर इतकी करण्यात आली आहे. परिणामी बहुभुधारक शेतकऱ्याचे तब्बल २७,२०० रुपयांचे नुकसान होत आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने जुन्या निकषांनुसार मदत सुरू ठेवावी आणि शेतकऱ्यांना त्वरित भरीव आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी संघटना युवा आघाडीचे माजी प्रा. अध्यक्ष सतीश दाणी यांनी केली आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ३० कोटीं निधीवर हल्ला

## मोठ्या कंत्राटदारांचा मेवा : छोट्यांना फक्त हवा

**वर्धा/जनमाध्यम**

शासनाने दिलेला निधी हा लहान कंत्राटदारांच्या डोळ्यातील पाणी पुसायला होता.पण कार्यकारी अभियंत्यांनी तो मोठ्या माशांच्या तोंडातच घातला, अशी सडकून टीका कंत्राटदारांमध्ये सुरू आहे.

अधीक्षक अभियंत्यांनी ‘५० लाखांखालील देयकं आधी फेडा’ असा स्पष्ट फतवा काढला होता. पण वर्ध्याचे सतिश अंभोरे आणि आर्वीचे प्रशांत सोळंके यांनी हा फतवा वाचून सरळ कचऱ्यात टाकला. कारण दलालांकडून मिळालेलं प्रसादाचं लिफाफं मोठे कंत्राटदार झाले तुपाशी, तर छोटे कंत्राटदार झाले उपाशी. सुशिक्षित बेरोजगार अभियंते व मजूर सहकारी संस्था थाळीतल्या उरलेल्या तुकड्यांवर बसल्या आहेत, तर मुंबईच्या गल्यातून सुत्रं हालवणारे गोटाळेबाज ठेकेदार सरळ क्रेनने कोटींची देयकं उचलून घेऊन निघून गेलेत.संजय हातमोडे, सचिन खोडके यांच्यासारख्या दलालांच्या हाताखाली या देयकांची ‘खिचडी’ शिजली असल्याचे ठोस बोलले जात आहे. निधी वाटपाची पारदर्शकता धुळीस मिळाली, आणि शासनाची निर्मळ उद्दिष्टे भ्रष्टाचाराच्या रणांगणावर ढाल-कवच होऊन पडली.

# नायरा डेपो मार्ग खड्डेमय

**वर्धा/जनमाध्यम**

पुलगाव मार्गावरील निमगाव सबाने येथील नायरा डेपोला जाणारा रस्ता प्रचंड खड्डेमय झाला असून वाहनधारक अक्षरशः हैराण झाले आहेत. या मार्गाने दररोज शेकडो पेट्रोल-डिझेल टँकरची ये-जा होत असते. मात्र, मोठमोठ्या खड्ड्यांमुळे टँकर व इतर वाहनांना अपघातांचा धोका निर्माण झाला आहे.

नागरिकांच्या तक्रारीनुसार रस्त्याची देखभाल करण्याची जबाबदारी नायरा कंपनीची आहे. तथापि, कंपनीकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्यामुळे गावातील रहिवासी आणि चालकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.‘कंपनीचे नफा वाढवण्यावर लक्ष, पण गावकऱ्यांच्या सुरक्षिततेवर नाही. आम्ही वारंवार मागणी केली, पण कोणी ऐकत नाही. आता जर काम झाले नाही, तर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल, अशी चेतावणी या युवकांनी दिली.स्थानिकांचे म्हणणे आहे की, प्रशासनानेही या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष घालावे. अन्यथा नागरिक कंपनीविरोधात तीव्र आंदोलनाचा पवित्रा घेतील, असा इशारा देण्यात आला आहे.दररोज टँकर आणि जड वाहने या रस्त्यावरून जातात.

खड्ड्यांमुळे कधीही मोठा अपघात होऊ शकतो. नायरा कंपनीने तातडीने काम करायला हवे.



**अपघातांचा धोका, नागरिकांत संताप**

## इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**देवळी** - इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना कामडी चौक परिसरात उघडकीस आली. विजय चिंधुजी मांढरे (वय ५२) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. कुटुंबवत्सल व आपुलकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून विजय व मांढरे यांची ओळख होती. त्यांच्या आत्महत्येने परिसरातील नागरिक, नातेवाईक मित्रमंडळीत हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर देवळी येथील मोक्षधामावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रकरणी देवळी पोलिसांनी नोंद केली.

## डोक्यावर काठी मारून केले जखमी

**हिंगणघाट** -माझ्या काकाला दारू पिण्यासाठी घेऊन जायचे नाही, असे म्हणणाऱ्याला एकाने डोक्यावर काठी मारून जखमी केल्याची घटना हिंगणघाट तालुक्यातील सातेफळ येथे घडली.राजू विठ्ठल पावडे (४२) रा. सातेफळ असे जखमीचे नाव आहे. तर सचिन हरिभाऊ मुजबैले व दिलीप बांगडे दोन्ही रा. सातेफळ असे आरोपींची नावे आहेत. सचिन हा दारू पिण्याच्या सवयीचा असून तो नेहमी राजूचे काका यांना दारू पिण्यास घेऊन जात होता. दरम्यान राजूने सचिन यास माझ्या काकाला दारू पिण्यास घेऊन जायचे नाही, असे म्हटले.

# बालविवाह रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्न करा -अध्यक्षा रुपाली चाकणकर

**वर्धा/जनमाध्यम**

अक्षय तृतीया व तुळसी विवाहाच्या मुहूर्तावर मोठ्या प्रमाणात बालविवाह होत असतात. काही ठिकाणी तर जन्मतारखेमध्ये बदल करुन विवाह केले जातात. असे बालविवाह रोखण्यासाठी पोलिस पाटील, ग्रामसेवक यांची बैठक घ्यावी. दामिनी पथक, बिट मार्शल यांनी शाळा, कॉलेज मध्ये जाऊन मुलींचे समुपदेशन करावे. बालविवाह थांबविणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी असून यासाठी सामूहिक प्रयत्न करावे, अशा सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्याल याच्या सभागृहात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी वान्मथी सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक अनुराग जैन, राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. पद्मश्री बैनाडे, विधी सेवा प्राधिकरणचे सचिव विवेक देशमुख, जिल्हा महिला बालविकास अधिकारी मनिषा कुरसुंगे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.बालविवाह रोखण्यासाठी समाज मंदीर, प्रिंटींग प्रेस, छायाचित्रकार यांना नोटीस द्या.

बालविवाहाबद्दल माहिती देण्यासाठी टोल फ्री क्रमांकाची जनजागृती करा. कौटुंबिक हिंसाचारापासून पिडीत असलेल्या महिलेला प्राधान्याने निवासी व्यवस्था उपलब्ध करुन द्या. माहितीच्या अभावी एखादी गरजवंत महिला उपेक्षित राहता कामा नये, सखी वन स्टॉप सेंटरबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याच्या सूचना चाकणकर यांनी दिल्या.आस्थापनांनी कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षणासाठी समितीची स्थापना करणे आवश्यक आहे.

समिती स्थापन न केल्यास ५० हजार रुपयाच्या दंडाची तरतुद आहे. याबाबत जिल्हा कामगार अधिकाऱ्यांनी आकस्मित भेट देऊन पाहणी करावी, यात कसूर आढळल्यास आस्थापनांना सिल करणे किंवा दंडात्मक कारवाई करावी. कमी वयात मुलीचे लग्न करण्यासाठी बरेचदा तिची जन्मतारीख बदलविली जाते, असे करणाऱ्यांवर कारवाई करावे, असे त्यांनी सांगितले. बसस्थानकावर हिरकणी कक्ष नेहमी सुरू ठेवा. बसस्थानकावरील महिला स्वच्छता गृहामध्ये महिला सफाई कामगारांचीच नियुक्ती करण्यात यावी. स्त्रीभृण हत्या ही एक मोठी समस्या आहे. स्त्रीभृण हत्या रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची अंमलबजावणी योग्यरित्या करणे आवश्यक आहे. रुग्णालयांना आकस्मित भेट देऊन तपासणी करा. दोषी आढळल्यास गुन्हा दाखल करुन परवाना रद्द करण्याची प्रक्रिया करा. अशा सूचना चाकणकर यांनी आरोग्य विभागाला दिल्या.

यावेळी चाकणकर यांनी महिलांसाठी असलेले वसतिगृह, लेक लाडकी योजना, मनोधैर्य योजना, माझी कन्या भाग्यश्री, मुलींना शाळेत उपलब्ध सुविधा, महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षण योजना, सखी वन स्टॉप सेंटर, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजना, भरोसा सेल, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिलांवरील अत्याचाराचे प्रलंबित गुन्हे आदींचा सविस्तर आढावा घेतला.



**लैंगिक छळापासून संरक्षण समितीची अंमलबजावणी करा**

**स्त्रीभृण हत्या रोखण्यासाठी रुग्णालयांना आकस्मित भेट द्या**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४१,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक -प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे

(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष -१३ अंक २९१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालयः- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

# राष्ट्रीय मुट कोर्ट स्पर्धेत डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे यश

## उपविजेतेपदासह पटकावली तीन पारितोषिके



**अमरावती/प्रतिनिधीः-** विविध क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असलेल्या डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी नुकत्याच बडोदा येथे झालेल्या राष्ट्रीय मुट कोर्ट स्पर्धेत उत्तम कामगिरी करत मुट कोर्ट स्पर्धेत बेस्ट एडवोकेट प्रथम पारितोषिक, बेस्ट लीगल ड्राफ्टिंग प्रथम पारितोषिकासह चमूने उपविजेते पद पटकाविले.

बडोदा येथे १३ व १४ सप्टेंबर रोजी नॅशनल मुट कोर्ट स्पर्धा व लीगल ड्राफ्टिंग या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात विविध राज्यातील जवळपास ३० चमुनी भाग घेतला होता.मुट कोर्ट स्पर्धेचे प्राथमिक फेऱ्या आभासी पद्धतीने २३ ऑगस्ट रोजी पार पडल्या व फायनल राऊंड सयाजीराव शिंदे विद्यापीठ बडोदा येथे १३ व १४ सप्टेंबरला पार पाडल्या. डॉ. पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाची चमू यामध्ये गौरी कंकरानिया, श्रावणी निस्ताने व अल्फिया सईद या विद्यार्थिनींचा समावेश होता, स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. रोख ३०००० आणि ट्रॉफी असे या पुरस्काराचे स्वरूप होते. गौरी कंकरानिया या विद्यार्थिनीस बेस्ट एडवोकेट चे प्रथम बक्षीस मिळाले तर अल्फिया सईद या विद्यार्थिनीने बेस्ट लिगल ड्राफ्टिंग चे प्रथम पारितोषिक मिळविले. महाविद्यालयाच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी चमूचे व त्यांचे मार्गदर्शक प्रा.डॉ. राजेश पाटील व प्रा.ॲड .वैभव इंगळे यांचे अभिनंदन केले आहे.

---

## YUVASHAKTI COLLEGE OF PHYSICAL EDUCATION
Mardi Road, Amravati-444602 (M.S.)
DHE CODE - 10014

### ADMISSION NOTICE - YEAR 2025-26
Institute Level Round for ACAP Seats

| | | |
|---|---|---|
| 1 | Display of Vacant Seat | 17-09-2025 |
| 2 | Candidates fill in on line Options/ College choices for institute level Admissions | 18/09/2025 to 19/09/2025 |
| 3 | Colleges Generate on line Merit list through CAP portal from their log in for ACAP seats and Management Quota seats if Applicable. | 20-09-2025 |
| 4 | Colleges upload the Merit list on the College Notice Board and College Web site. The Generated Merit list will be available on the CAP portal. | 20-09-2025 after 05:00 PM |
| 5 | Candidates Seek Admission as per declared Merit list in the Institute Level round and colleges confirm admission through college log in. | 22/09/2025 to 24/09/2025 |
| 6 | Cut-off Date of Admission. No admission after the cut-off Date. | 24-09-2025 |

**Note :** B.P.Ed. Ist Year Admission for Application Institute Level Round, Time : 10:30 am to 5:00 pm
**Helpline No.9511909956**

Principal / Ad. Incharge

---

## प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती) अमरावती

पत्ता- विद्यापीठ रोड कृषि संकूल परिसर, अम.-४४४६०६
इमेल आयडी rameti.amravati@rediffmail.com दुरध्वनी नं.०७२१-२९५२८६३

### ई-निविदेबाबत जाहीरात

प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती) अमरावती, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ रोड, कृषि संकूल, कॅम्प अमरावती येथे गृह व परिसर व्यवस्थापन आणि देखभाल (हाऊस किपिंग) करीता वार्षिक कंत्राट करावयाचे आहे. त्याकरीता दिनांक १८.०९.२०२५ रोजी दुपारी १२.०० ते २६.०९.२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजता पर्यंत ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा फॉर्मची किंमत रु.५७००/- (अक्षरी पाच हजार सातशे रुपये फक्त) असून ती देखील ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे. ई-निविदा सच तसेच याबाबतची माहिती https://mahatenders.gov.in या सकेतस्थळावर उपलब्ध असून सर्व ऑनलाईन प्रकिया याच सकेतस्थळावरुन करावयाची आहे. निविदा उघडण्याची वेळ या कार्यालयात दिनांक २९.०९.२०२५ रोजी दुपारी १४.०० वाजता राहील.

**स्वाक्षरी/**
**(विजय चवाळे)**
**प्राचार्य**
**प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, (रामेती) अमरावती**

(विमाका/अम/जाही/४७१/२०२५-२०२६)

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### श्री.एस.जी.कळदाते ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज -२०५४/२०२५
पुंडलिकराव वि.निरंक
पुढील तारीख १६.१०.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :-
१. **पुंडलिकराव निळकंठराव आमले,** वय ६२ वर्षे, धंदा -शेती
रा.शिराळा, ता.जि.अमरावती
२. **वासुदेवराव निळकंठराव आमले,** वय ६७ वर्षे, धंदा - निवृत्त
रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. **सुमन दादारावजी भुरे,** वय ८० वर्षे, धंदा - घरकाम
रा.मोझरी, ता.जि.अमरावती
४. **आशा रामचंद्र देवतारे,** वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.शेंदुरजना खं.ता.तिवसा, जि.अमरावती
५. **कमलाबाई भिमराव पाटील (मयत)**
५.१ **भिमराव सितारामजी पाटील**, वय ७५ वर्षे, धंदा -शेती
रा.शिराळा, ता.जि.अमरावती
५.२ **सौ.नंदा नरेंद्र निखाडे,** वय ४८ वर्षे, धंदा -घरकाम
रा.आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा
५.३ **कृष्णा भिमराव पाटील**, वय ४५ वर्षे, धंदा -वकिल
रा.शिराळा, ता.जि.अमरावती
५.४ **विष्णु भिमराव पाटील**, वय ४२ वर्षे, धंदा -शेती
रा.शिराळा, ता.जि.अमरावती

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत निळकंठ दाउजी आमले दि.२६/०९/२००७ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार पुंडलिकराव निळकंठराव आमले व इतर** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पुंडलिकराव निळकंठराव आमले व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १२.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## सायटेशन/जाहीरनामा
### विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५८६/२०२५ ने.ता.२७/१०/२०२५

अर्जदार -
१. **श्री गोविंदा रामराव कोंडे,** वय ४२ वर्षे, धंदा - शेती
रा.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. **सौ.अर्चना संजय भुसारी,** वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
रा. मायवाडी, पो.पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ.प्रिती नरेंद्र चिखले,** वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.कारंजा बहिरम, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन** २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराची आई नामे **शशिकला रामराव कोंडे** ही **दिनांक ३१/०७/२०२२ रोजी खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे.** तिचे मृत्यूनंतर तिचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १२.०९.२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## सायटेशन/जाहीरनामा
### विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.४७९/२०२५ ने.ता.२६/०९/२०२५

अर्जदार -
**श्री मंगेश मधुकर पुरेकर,** वय ४९ वर्षे, धंदा - खाजगी नौकरी
रा.आदित्य गार्डन सिटी, फेस-४, फ्लॅट क्र.२ एन-३३
सर्वे नंबर १०९/११०, निअर आर.एम.डी.सिंहगड शाळा वारजे पुणे

-- गैरअर्जदार--

**श्री धनेश मधुकर पुरेकर,** वय ४५ वर्षे, धंदा - खाजगी नौकरी
रा.आदित्य गार्डन सिटी, फेस-४, फ्लॅट क्र.२ एन-३३
सर्वे नंबर १०९/११०, निअर आर.एम.डी.सिंहगड शाळा वारजे पुणे

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन** २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांची आई नामे **मनिषा मधुकरराव पुरेकर ही दिनांक १२/११/२०१९ रोजी** आदित्य गार्डन सिटी, फेस-४, फ्लॅट क्र.२ एन-३३ सर्वे नंबर १०९/११०, निअर आर.एम.डी.सिंहगड शाळा, वारजे पुणे येथे मय्यत झालेली आहे. तिचे मृत्यूनंतर तिचे वारस अर्जदार व गैरअर्जदार आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदार व गैरअर्जदारांशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- ०७.०९.२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## सायटेशन/जाहीरनामा
### विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५८८/२०२५ ने.ता.२७/१०/२०२५

अर्जदार -
**सौ.शिला दशरथ गायकी,** वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.उत्तमनगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन** २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराची आजी म्हणजेच आईची आई **रुख्मा उदेभान परतेती** ही **दिनांक २०/१२/२०१२ रोजी तिचे राहते घरी राजुरवाडी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे.तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १२.०९.२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## MUNICIPAL CORPORATION, AMRAVATI
## AUTOMOBILE DEPARTMENT
## 'E' TENDER NOTICE

O.No.AUTO/253/2025
Date 16/09/2025

E-Tender are invited by the Hon'ble Commissioner, Municipal, Amravati under Automobile Department.

| Sr. No. | Name of Work | Earnest Money EMD | Cost of Blank Tender Form including G.S.T. | Period of Execution from the Date of Work Order |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | Annual Mintenance Contract for different type of Vehicles of Municipal Corporation, Amravati. | Rs.67000 | Rs.5000 | 3 Yrs. |

* Rate to be quoted inclusive of all taxes and transportation to Amravati. As per specified in GR.

**Publication details of E-Tender :-**

| | |
|---|---|
| E-Tender Publication | - Dt.17.09.2025 @ 5.00 pm |
| State of E-Tendering downloading | - Dt.17.09.2025 @ 5.00 pm |
| End of E-Tender downloading | - Dt.24.09.2025 @ 5.00 pm |
| Date of Opening E-Tender (Technical) | - Dt.25.09.2025 @ 5.00 pm |

**Sd/-**
**Deputy Engineer (Auto)**
**Municipal Corporation, Amravati**

**Sd/-**
**Deputy Commissioner (Gen.)**
**Municipal Corporation, Amravati**

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०३९/२०२५
**शोभाताई -वि- निरंक**
पुढील ता.१७.१०.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
१. शोभाताई देविदास इंगळे, वय ७० वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. आशिष देविदास इंगळे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - नोकरी
३. प्रविण देविदास इंगळे, वय ४० वर्षे, व्यवसाय - नोकरी
नं.१ ते ३ रा.रिलायन्स श्रामस साफळे कॉलनीजवळ, विमवि, अमरावती
४. सौ.संगीता नितीन बाहे, वय ५० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.किशोर नगर, रुक्मिणी नगर, अमरावती
५. अनिता मंगेश माहोरे, वय ४५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.संतकृपा निवास वार्ड नं.३, अमनापूर वडगांव माहोरे, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **देविदास भिमराव इंगळे** हे दिनांक 04.01.2011 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शोभाताई देविदास इंगळे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शोभाताई देविदास इंगळे व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

प्रो.क्र.१६१३४/२०२५
दिनांक ०८ सप्टें. २०२५

No.2
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Shubhangi Manikrao Tamgadge
24th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES**
**(0.5, R, 1, 5)**

R.C.S.180/2020
**State Bank of India - Vs- Ashish Rajesh Inglekar**
NEXT DATE 01.10.2025

To,
Ashish Rajesh Inglekar
R/o. C/o Mrs.Sandhya Wankhade, House Near Fulbag School, Kaloti Nagar Amravati, Tq.Dist.Amravati (Maharashtra)

Whereas **State Bank of India** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 01.10.2025 at 11.00 o'clock in the forenoon, to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 08.09.2025.

शिक्का

**24th Jt.Civil Judge, Sr.Dn., Amravati**

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९२१/२०२५
**श्रीमती जानकी अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२३.०९.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Janki Ramesh Chandel, Age 74 Yrs. Occu.: Household
2. Jaykumar Ramesh Chandel, Age 49 Yrs. Occu.: Pvt.Job
3. Pavan Ramesh Chandel, Age 44 Yrs. Occu.: Service
4. Kiran Ganesh Yadav, Age 46 Yrs. Occu.: Household
All R/o Bhagatsingh Chowk, Frezarpura Rukhmini Nagar, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रमेश समरसिंग चंदेल** हे दिनांक 24.12.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **जानकी अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **जानकी अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्रीमती एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९६९/२०२५
**श्री समीर -वि- निरंक**
पुढील ता.०३.१०.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Sameer Vijayrao Patki
Age 36 Yrs. Occu.: Pvt. Job
R/o Near Patel House, Ganesh Vihar Part-2 Sai Nagar, Amravati,

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सिमा विजय पतकी** हे दिनांक 07.05.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **समीर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **समीर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## E-TENDER NOTICE

Separate sealed Quotations in prescribed forms are invited for execution of Enquiry for replacement of old deteriorated Lan Cables, Ethernet Switches and Lan Networking with Rack Equipment's at 1st and 2nd Floor of Vidyut Bhavan under O&M Circle Amravati Limited to **Rs. 2.00 Lakhs** Last Date & Time for Submission of Bid: **25.09.2025 at 3 p.m.** Contact person Executive Engineer (Adm) **Tel. No 0721-2663640**

PRO No.162

Superintending Engineer
M.S.E.D.C. Ltd. O&M Circle Office, Amravati

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.एस.बिंगरदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०४३/२०२५
**श्रीमती कमल अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०३.०९.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Smt.Kamal Rameshwar Hande, Age 82 Yrs. Occu.: Household
2. Pradip Rameshwar Hande, Age 53 Yrs. Occu.: Service
3. Rajesh Rameshwar Hande, Age 50 Yrs. Occu.: Labour
Appli.No.1 to 3 R/o Galli No.4, Vilas Nagar, Amravati. Tq.Dist. Amravati
4. Rajani Rajendra Kinhikar, Age 55 Yrs. Occu.: Household
R/o Near V.M.V.College, Shrikrushna Nagar, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रामेश्वर जानुसा हांडे** हे दिनांक 29.09.2008 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कमल अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कमल अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९७१/२०२५
**मिना -वि- निरंक**
पुढील ता.०६.१०.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
१. मिना सुरेशराव वाकपांजर, वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.प्रियंका कॉलनी, हनुमान मंदिराजवळ, अमरावती
२. राहुल सुरेश वाकपांजर, वय ३६ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.शेगांव-रहाटगांव रोड, तुळजा भवानी मंगलम शेगांव नाका, अमरावती
३. विकी सुरेशराव वाकपांजर, वय ३३ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
रा. वार्ड नं.१, प्रियंका कॉलनी, अमरावती, ता.जि. अमरावती
४. दिपाली सुरेश वाकपांजर, वय ३४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.प्रियंका कॉलनी, हनुमान मंदिराजवळ, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुरेश श्रीरामजी वाकपांजर** हे दिनांक 19.05.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मिना सुरेशराव वाकपांजर व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मिना सुरेशराव वाकपांजर व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०९४/२०२५
**मिना -वि- निरंक**
पुढील ता.०४.११.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
१. महेंद्र दादाराव चुके,
वय ५४ वर्षे, व्यवसाय - व्यापार
रा.अभिनव चौक, वलगांव, ता.जि. अमरावती
२. गोपाल दादाराव चुके,
वय ५६ वर्षे, व्यवसाय - व्यापार
रा.अभिनव चौक, वलगांव, ता.जि. अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दादाराव बाजीराव चुके व कांचनबाई दादाराव चुके** हे अनुकमे दिनांक 22.07.2021 व दिनांक 29.09.2024 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **महेंद्र दादाराव चुके व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **महेंद्र दादाराव चुके व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com



# अंजनगाव बारी परिसरात ढगफुटी सदृश्य परिस्थीती

### पार्डी येथील गाय गेली वाहून
### वडगाव जिरे येथील रायघोळ नदीला महापूर
### परिसरातील गावांचा संपर्क तुटला, वाहतूक ठप्प



**अंजनगाव बारी/वार्ताहर**

परिसरात दि.१६ रोजी दुपारी दोन ते तीन वाजताच्या सुमारास झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे जोरदार हजेरी लावली. यामध्ये शेती पिकासह जनावरे, नदी-नाल्यांना मोठा पुर आल्याने जनजीवन विस्कळित होऊन वाहतूक ठप्प झाली. पार्डी-उतखेड रेल्वे पुलाजवळून पशुधन जात असताना एक गाय पुरात वाहून गेल्याचे समजले तसेच पार्डी येथील भुयारी अंडरपास पुर्णपणे जलमय झाल्याने पुलाचे पाणी गावात, रेल्वे पटरीवर साचले तसेच शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांत पावसाचे पाणी घुसल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले. परिसरातील भिवापूर, कोंडेश्वर तलाव व नदी-नाले दुथडी भरून वाहत असल्याने जनजीवन विस्कळित झाले.

डगाव जिरे येथील रायघोळ नदीला महापूर आल्याने स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता वाहून गेला तसेच वडगाव जिरे -मालखेड रेल्वे रस्ता वाहुन गेल्याने दोन गावांचा संपर्क तुटला असून वाहतूक ठप्प झाली आहे. नदीला आलेल्या महापूरामुळे पाणी थेट शेतकऱ्यांच्या शेतात घुसून शेती पिकांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना शेतात ये-जा करणे बंद झाले आहे, ग्रामस्थांनी जिल्हा प्रशासनाला मदतीची मागणी केली आहे.अशी माहिती सरपंच घनश्याम ब्राम्हणे ,उपसरपंच गोलू मडके, माजी सरपंच मनोहर मारोडकर यांनी दिली असून यावेळी प्रवीण अरक, दिपक लाहाबर, किसन मात्रे,किसन जेवडे,किसन लाहाबर, सारंगधर वानखडे, प्रकाश लाहाबर, विलास जेवडे, विजय वासनिक, अनामत वासनीक, अमोल लाहाबर, अमोल रामटेके, पंकज ब्राम्हणे, मारोती मात्रे, मारोती अरक, संतोष टोम्पे,गजानन घोडे, प्रभाकर खोब्रागडे प्रकाश वासनीक, गणेश मारोडकर ,नंदू लाहाबर, दिनेश मात्रे, प्रभाकर अरक,जर्नाधन लाहाबर व समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.

## रूग्णांसाठी अल्पदरात रूग्णवाहिकेची व्यवस्था

**अमरावती-**श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, शिवाजीनगर, पंचवटी चौक, मोर्शी रोड, अमरावती हे गरजू व गरीब रूग्णांना मागील चार दशकांपासून उत्तम आरोग्य सेवा पुरवित आहे.डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालय येथे पोहोचण्यासाठी ब-याच वेळेस रूग्णांचे नातेवाईकांकडे वाहनांची उपलब्धता नसल्यामुळे वेळेवर धावपळ होते. कधी कधी त्यांना रात्रीच्या वेळेस भाडे जास्त प्रमाणात चुकवावे लागते. रूग्णालयात रूग्ण भरती करीता आणण्याविषयी असलेल्या अडचणी लक्षात घेऊन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख व संस्था व्यवस्थापन तसेच महाविद्यालय व रूग्णालय प्रशासन यांनी रूग्णांना रूग्णालयात पोहोचण्याकरीता महाविद्यालयाची रूग्णवाहिका उपलब्ध करून दिलेली असून त्याचे नाममात्र शुल्क १००/- रूपये प्रती फेरी आकारले जाईल, जेणे करून रूग्णाला अल्पदरात रूग्णालयात पोहोचविणे शक्य होईल. ही सुविधा फक्त अमरावती शहरातील रूग्णांसाठीच लागू असेल. संबधितांनी रूग्णवाहिकेकरीता आकस्मिक कक्षाचा दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२३२३ व भ्रमणध्वनी क्रमांक ८७६७५४७०३३ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख व वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे यांनी केले आहे.

# बेकायदेशीर दारूविक्री करणाऱ्या हॉटेलवर जिल्हाधिकाऱ्यांची कारवाई

**अमरावती/का.प्र.**

अमरावतीतील रीच गार्डन हॉटेलमध्ये मध्यप्रदेश राज्यात विक्रीस असलेली परराज्यातील दारू बेकायदेशीरपणे विक्रीस ठेवल्याची माहिती मिळाल्यानंतर या ठिकाणी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठी कारवाई करण्यात आली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या तपासणीत मध्यप्रदेशातील विविध ब्रँडची २९२ बॉटल्स सापडल्या. यामध्ये १ हजार मिली, ७५० मिली, ३७५ मिली व १८० मिली क्षमतेच्या बॉटल्सचा समावेश आहे. सदर दारूची एकूण किंमत सुमारे १ लाख १७ हजार इतकी आहे.अनुज्ञप्तीधारक राज सुनील शाहू तसेच हॉटेलचे व्यवस्थापक निखिल अनिल शाहू यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर हॉटेलमध्ये परराज्यातून आणलेली दारू बेकायदेशीररित्या विक्रीस ठेवण्यात आली होती. ही दारू ग्राहकांना विक्री करण्यासाठी सज्ज स्थितीत होती. यामुळे संबंधित अनुज्ञप्ती कायमस्वरूपी रद्द करण्यात आली.तसेच अमरावती येथील हॉटेल आर. के. रेस्टॉरेंट ॲण्ड बार, बायपास बडनेरा रोड येथेही कारवाई करण्यात आली. येथील मद्य भेसळयुक्त तसेच कमी तीव्रतेचे असल्याचे नमुन्याच्या तपासणीअंती आढळून आले. अनुज्ञप्तीधारक राजकुमार छतुमल रतणानी यांची जिल्हाधिकारी यांच्या समक्ष सुनावणी घेण्यात आली.

जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, शासन महसुलाचे नुकसान होते तसेच जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे निरीक्षण नोंदवून सदर अनुज्ञप्ती एक महिन्यासाठी रद्द करण्यात आली. परराज्यातील दारूची विक्री राज्यात परवानगीशिवाय करणे गंभीर गुन्हा आहे. यापुढील काळातही अशा बेकायदेशीर कारवायांवर कठोर पावले उचलली जातील, असा इशाराही जिल्हाधिकारी येरेकर यांनी यावेळी दिला.

# धामणगाव रेल्वे तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा

### जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यात मे महिन्यापासून प्रचंड स्वरूपात पर्जन्यवृष्टी झाल्याने तसेच विविध धरणे व बंधाऱ्याच्या पाण्याचा विसर्ग झाल्यामुळे सर्वत्र पूर परिस्थिती निर्माण झाली नद्या नाले त्यांचे पाणी तुंबल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभी पिके पाण्याखाली जाऊन शेकडो हेक्टर पिकाचे नुकसान झाले असून जमिनीचे सुद्धा नुकसान झाले आहे. तसेच एनडीआरएफच्या निकषानुसार सदर पिकाचे पंचनामे करून तात्काळ दुष्काळ जाहीर करावा. तसेच शेतकऱ्यांना तातडीची मदत जाहीर करावी.

धामणगाव रेल्वे शहरात सुद्धा अतिवृष्टीमुळे घरांची पडझड होऊन नुकसान झाले आहे या कुटुंबीयांना तात्काळ मदतीचा हात द्यावा.मे, जून महिन्यात पाऊस पडल्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या शेवटपर्यंत अतिवृष्टी झाली त्यामुळे वातावरणात अमुलाग्र बदल झाला वातावरणामुळे पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे पिकांची वाढ झाली परंतु बदलत्या वातावरणामुळे सोयाबीन पिकाची मोठी वाढ होऊन शेंगा लागल्या नाही लागल्या त्याची भरण झाली नाही ही बाब गांभीर्याने घेण्याची गरज आहे.तालुक्यातील शेतकरी मोठ्या संकटात आहे तरी तात्काळ उपरोक्त बाबी लक्षात घेऊन पिकांचे, घरांचे पंचनामे करून व आर्थिक मदतीचा हात देऊन दिलासा द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी शहराध्यक्ष मंगेश श्रीराम ठाकरे,नानासाहेब होणाडे,विजय कोंबे, राजाभाऊ ढोबळे, विजय दुबे, अनिल बगाडे, विशाल भैसे, गणेश भाऊ वाकेकर, सचिन उडाखे,संगीता मेश्राम,रजनी खंडार, मनोज शिवणकर इत्यादी पक्षाचे कार्यकर्ते हजर होते.

# साहित्य अकादमीच्या साहित्य मंच अमरावतीचा सन्मान

### डॉ. शोभा रोकडे व डॉ. सतीश तराळ निमंत्रित



**अमरावती/का.प्र.**

साहित्य अकादमी नवी दिल्ली ही २४ भारतीय भाषांसाठी कार्य करणारी केंद्रीय संस्था आहे. या संस्थेद्वारे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. विविध साहित्य उपक्रमांचे देशभर आयोजन केले जाते. याचाच एक भाग म्हणून अमरावती शहरात साहित्य अकादमी द्वारे साहित्य मंच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात कथाकथन-कथावाचन व काव्यगायन-काव्यवाचन आयोजित करण्यात आले आहे. कथाकथनासाठी अमरावतीतून सुप्रसिद्ध कथा लेखक, समीक्षक डॉ. सतीश तराळ यांना निमंत्रित करण्यात आले आहे तर कवी संमेलनासाठी मराठीच्या सुप्रसिद्ध कवयित्री, पहिल्या स्त्री अभंगकार प्राचार्य डॉ. शोभा रोकडे यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

डॉ. सतीश तराळ व डॉ. शोभा रोकडे दीर्घ काळापासून साहित्य सेवा करीत असून त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. डॉ.रोकडे यांना महाराष्ट्र शासनाचा पुण्यलोक अहिल्यादेवी होळकर समाजसेवा पुरस्कार व इतर प्रतिष्ठेचे साहित्यपुरस्कार व डॉ.तराळ यांनाही विविध महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. विविध साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद अनेकदा या दोन्ही लेखिकांनी भूषविले आहे व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अनेकदा सहभाग घेतला आहे.हा कार्यक्रम शुक्रवार १९ सप्टेंबरला सकाळी दहा वाजता शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय येथील पंजाब पंजाबराव देशमुख सभागृहात होणार असून समारंभाच्या अध्यक्षस्थानी ख्यातनाम कवी नारायण कुलकर्णी- कवठेकर राहणार आहेत उद्घाटन प्राचार्य अंबादास कुलट हे करणार असून सूत्रसंचालन डॉक्टर राजेश मिरगे करणार आहेत. साहित्य अकादमीच्या सामान्य परिषदेचे सदस्य सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी हा कार्यक्रम अमरावतीला दिला असून ते या कार्यक्रमाचे स्वागतपर भाषण करणार आहेत .अमरावती करांनी व अमरावती विभागातील रसिकांनी साहित्य अकादमीच्या या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन साहित्य अकादमी परिवार व शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमात कथाकथनात वाशिमचे बाबाराव मुसळे व कवी संमेलनात वाशिमचे मोहन शिरसाट सहभागी होणार आहेत.

# रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकाचा रोटरी युथ लीडरशिप अवॉर्ड कार्यक्रम

### यशस्वी लोकांच्या अयशस्वी झालेल्या गोष्टी जास्त प्रेरणादायी असतात
### किशोर केडिया यांनी तरुणाईला दिला यशस्वी जीवनाचा मंत्र




**अमरावती/का.प्र.**

जीवनाच्या वाटेवरून मार्गक्रमण करीत असताना मनुष्य अनेक अडथळ्यांना पार करीत यश संपादन करीत असतो. अशा यशस्वी झालेल्या लोकांच्या अयशस्वी झालेल्या गोष्टी प्रत्येकासाठी जास्त प्रेरणादायी असतात आणि अशा प्रेरणादायी गोष्टींचा प्रत्येकाने आदर्श घेऊन यशाचे शिखर गाठावे असा मोलाचा सल्ला किशोर केडिया यांनी तरुणाईला दिला.

सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य अशा रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकाच्या वतीने वलगावस्थित सिकची रिसॉर्ट येथे दोन दिवसीय रोटरी युथ लीडरशिप अवॉर्ड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकाचे अध्यक्ष अमोल चवणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उद्घाटन समारंभाला विशेष अतिथी म्हणून डीजीएन किशोर राठी नागपुर यांची उपस्थिती होती तर रोटरीचे सचिव प्रा. डॉ. लोभस घडेकर, डॉ. पूजा कोल्हे,प्रकल्प समन्वयक दिलीप कौसकीया, सीकची चॅरिटेबल ट्रस्ट्र चे सचिन माळकर ,शशांक विश्वरूपे ,आनंद दशपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

दोन दिवसीय करियर मार्गदर्शन शिबिरात विविध विषयात नावलौकिक मिळवलेल्या विषय तज्ञांनी युवकांना मार्गदर्शन केले. यामध्ये 'करिअर गायडन्स' यावर अमित राठी ( नाशिक), 'ध्यानयोग' शिवाजी कुचे (अमरावती), 'कॉर्पोरेट जगासाठी तयारी' या विषयावर स्नेहा टावरी( नागपुर), 'मोबाईलचे व्यसन' डॉ मोनालि ढोले (अमरावती), पायलट टेनर दिलीप कोसकिया मी आणि माझे पालक व टाईम लाईन मॅनेजमेन्ट 'युवापीढ़ी डॉ.सायसिकमल,'सनातन धर्मात पालकांची जवाबदारी' अनिल राठी, 'उद्योजकता' अतुल कोल्हे, 'बिग बॉस गेम' रवि टांक, 'मुलींच्या शरीरातील बदल' डॉ. मोनाली कादंबे, 'या रिदम गेम' या विषयावर हार्दिक कक्कड ,गौरव वानखडे तसेच निलेश खंडेलवाल यांनी बँकिंग जगताचे फायदा व जोखीम याची माहिती खेळीमेळीच्या वातावरणातून करून दिली यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते रोटरी युथ लीडरशिप अवॉर्डचे वितरणही करण्यात आले. प्रथम पारितोषिक अशोक बोबडे, अंशुलिका नागरिया, द्वितीय दृष्टि शर्मा, श्रुती पांडव तर तृतीय पारितोषिक जयेश झांबानी, देवश्री काळबांडे यांनी पटकाविले. या कार्यक्रमाला रोटरीचे प्रवीण बोड़खे, अखिलेश खेतान, डॉपंकज मोरे, डॉ शशिकांत थोरात, प्रवीण परिमल, रामभैया छुटलानी, संकेत मोहता, गौरव वानखड़े, स्वप्निल करवा, पायल करवा, संजय बोरोडे, डॉ.दिपक डागा, ज्योती डागा, दिनेश सराओगी, डॉ.अंकुश मानकर, अमित तिडके, सरोज तीडके, अमित हिंडोचा, गीता हिंडोचा, कृति टांक, श्वेता खेतान , निलेश खंडेलवाल, शीतल खंडेलवाल, अक्षय पेटे, युंगधरा गुल्हाने, विजय गुल्हाने यांची उपस्थिती होती.

## संजय सातपुते यांचे निधन



**अंजनगाव बारी-**येथील ऑटो चालक संजय विठ्ठलराव सातपुते (५७) यांचे प्रादिर्घ आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी, मुलगा , मुलगी, एक भाऊ, एक बहीण असा बराचसा आप्त परिवार आहे. त्याच्यावर हिंदू स्मशानभूमी अंजनगाव बारी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## संक्षिप्त

### ॲड. हेलोंडे यांची आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला भेट



**अमरावती-** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी शिवणी रसुलापूर, ता. नांदगाव खंडेश्वर येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब सुफला योगेश नेरकर यांच्या घरी भेट दिली.यावेळी त्यांनी कौटुंबिक माहिती घेऊन शासकीय योजनेचा लाभ घेतला असल्याबाबत माहिती घेतली. नेरकर कुटुंबाला उर्वरित योजनाचा लाभ देण्याबाबत विभाग प्रमुखांना सूचना दिल्या. तसेच शिवनी, रसूलापूर येथील सोयाबीन पिकाची पाहणी करून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या.भेटी दरम्यान तहसीलदार अश्विनी जाधव, गट विकास अधिकारी डॉ. श्रीमती. स्नेहल शेलार, तालुका कृषी अधिकारी विकास पाटील, महिला व बालविकास अधिकारी श्री. गलफड, ग्राम महसूल अधिकारी अश्विनी उईके, वैभव लाड, कृषी सहायक पुरुषोत्तम वंजारी, सरपंच शशिकला खडसे, चंद्रशेखर गावंडे, गजानन देशमुख, पोलीस पाटील प्रवीण इरतकर, चंद्रशेखर गावंडे उपस्थित होते.

### विद्यापीठात प्रबोधनकार यांना आदराजंली



**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, राज्यपाल नामित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व प्रबोधनकार ठाकरे यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

### मनपात प्रबोधनकार ठाकरे जयंती



**अमरावती -** केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे जयंती कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंती निमित्य अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांचे हस्ते केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांचे प्रतिमेस हारार्पण महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे करण्यात आले.यावेळी उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, भुषण खडेकार, सिमंत गजभिये, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### प्रबोधनकार ठाकरे यांना आयुक्तालयात अभिवादन



**अमरावती-**केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त सुरज वाघमारे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी उपस्थित अपर आयुक्त अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशालीपाथरे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

### विद्यापीठात 'फिजिक्स क्लब २०२५-२६' आज

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने १८ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता 'फिजिक्स क्लब २०२५-२६' कार्यक्रमाचे आयोजन भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहात करण्यात आले आहे. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून वरीष्ठ प्राध्यापक तथा भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. श्रीनिवास ओमनवार यांचे शुभहस्ते उद्घाटन संपन्न होईल. कार्यक्रमाला रिसोर्स पर्सन म्हणून वरीष्ठ प्राध्यापक तथा इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.दुपारी १ वाजता प्रश्नमंजुषा होणार असून त्यानंतर लगेचच मान्यवरांचे हस्ते बक्षीस वितरण सोहळा संपन्न होईल. तरी भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित 'फिजिक्स क्लब २०२५-२६' कार्यक्रमाला सर्वांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे व फिजिक्स क्लब २०२५-२६ चे अध्यक्ष आदित्य प्रधान यांनी केले आहे.

# संविधानाकरिता लढणाऱ्यांनाच उमेदवारी, नातेवाईक टाळा -कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

## झेडपी, पंस, महापालिकेवरकेवर कॉँग्रेसचाच झेंडा फडकवा

### -कार्यकर्ता मेळाव्यात अनेकांचे प्रवेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा परिषद पंचायत समित्या, नगरपालिका आणि महापालिकेवर आगामी काळात कॉंग्रेसचाच झेंडा फडकला पाहिजे, याकरिता आपणाला उमेदवारीचे सर्व अधिकार देतो, अशी घोषणा करीत केवळ संविधानाकरिता लढणाऱ्यांनाच उमेवारी द्या, नातेवाईकांची (पान २ वर)

येथे शेतकरी संकटात असताना पंतप्रधान आपला वाढदिवस साजरा करत आहेत, पालकमंत्र्यांचे देखील जिल्ह्यावर लक्ष नाही. हे शासन आपल्या सर्वसामान्यांचे नाही, त्यामुळे आता त्यांना त्यांची जागा दाखवायची आहे.
**-यशोमती ठाकुर,** माजीमंत्रा



### माजी आमदार राजकुमार पटेल कॉंग्रेसमध्ये-

माजी आमदार राजकुमार पटेल व त्यांचे सुपुत्र धारणी बाजार समितीचे सभापती रोहीत पटेल यांचेसह मेळघाटातील शेकडो कार्यकर्त्यांनी बुधवारी कॉंग्रेसच्या कार्यकर्ता मेळाव्या कॉंग्रेसमध्ये प्रवेश घेतला. प्रदेशाध्यक्ष (पान २ वर)

# इर्विन चौकात आढळला लांडगा

## शहरवासीयांमध्ये भीतीचे सावट, -वनविभाग अलर्ट



**अमरावती/प्रतिनिधीः-** गजबजलेल्या इर्विन चौकात लांडगा दिसल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास काही नागरिकांना हा वन्यप्राणी फिरताना दिसला. त्यानंतर सोशल मीडियावर याची माहिती पसरली आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. वनविभागाला याबाबत कळविण्यात आल्यानंतर पथकाने घटनास्थळी धाव घेऊन शोधमोहीम सुरू केली आहे. लांडगा गर्दीच्या ठिकाणी कसा पोहोचला, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

इर्विन चौकातील सुरज रिफ्रेशमेंटच्या बाजुला असणा-या खुल्या प्लॉटमधून श्वानासारखा एक प्राणी नागरिकांना दिसला. परंतू तो श्वान नसल्याची शंका नागरिकांना बळावली. त्यामुळे हा प्राणी लाडंगाच असल्याचे मत नागरिकांचे झाले. परंतू या ठिकाणी लाडंगा येणे शक्य नाही, असे काहींचे मत होते. काहींचे म्हणणे आहे की, तो एखाद्या अज्ञात मार्गाने शहरात भटकत आला असावा. तर काहींनी तो गेल्या काही दिवसांपासून इर्विन चौकातच वास्तव्यास असल्याची शक्यता वर्तविली. या घटनेनंतर नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन सुरू केले असून, सुरक्षिततेसाठी वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली जात आहे. गेल्या काही वर्षांत अमरावतीत वन्यप्राण्यांचे दर्शन होण्याचे प्रकार वाढले आहेत. यापूर्वी अमरावती शहरालगतच अनेकदा बिबटचे दर्शन झाले आहे, तर व्हीएमव्ही परिसरात सुध्दा बिबट्याने ठाणे मांडला होता. आता लांडगा शहराच्या हृदयस्थानी दिसल्याने वन्यजीवांच्या (पान २ वर)



**अमरावतीः** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित सेवा पंधरवडा अभियान अंतर्गत भाजपा अमरावती शहर द्वारा आयोजित रक्तदान शिबिरामध्ये माजी राज्यमंत्री प्रविण पोटे पाटील यांनी रक्तदान केले. तसेच यावेळी उपस्थित सर्वांना रक्तदानाचे महत्त्व सांगत रक्तदान करण्याचे आवाहन सुद्धा केले. यावेळी भाजपचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धारणीत ३५ किलो गोमांस जप्त

## आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

धारणी/प्रतिनिधीः- स्थानिक मांडवा मार्गावर असणाऱ्या कुरेशी पुरामध्ये पोलिसांनी धाड टाकून ३५ किलो गोमास जप्त केले आहे. आरोपी शेख नासिर शेख गफूर (वय ४०) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार धारणी पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की कुरेशीपुरा मध्ये राहणारा शेख नासिक शेख गफूर अवैधरित्या गोवंशाची कत्तल करून गोमांस विक्री करत आहे. यावरून पोलिसांनी त्याच्या घरात धाड टाकून तेथून ३५ किलो गोमांस ५ हजार ४५० रुपये जप्त केला. आरोपी विरुद्ध कलम ३२५ सह गोवंश प्रतिबंध अधिनियमचे कलम ५,५(अ),(२) ,५(ब),५(क),९(अ) व ११ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान सहन होणार नाही

## युवती सेनेचे पोलिस प्रशासनाला निवेदन



**अमरावती/प्रतिनिधीः-**अमरावती शहरात ज्या प्रकारे गलिच्छ ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे बॅनर राजमुद्रे सोबत लावण्यात आले त्याच्या जाहीर निषेधार्थ १७ सप्टेंबर २०२५ रोजी युवतीसेनेच्यावतीने जिल्हाधिकारी तसेच पोलीस आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून अमरावती शहरातील विविध ठिकाणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे देवा भाऊ असे छापिल असलेले राजमुद्रा व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समोर हात जोडून (पान २ वर)

# तरुणाची आत्महत्या

**अमरावती/प्रतिनिधीः-**फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या किरण नगर नं. २ मध्ये एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारीं रात्री समोर आली आहे. विशाल किसनराव माहोरे (वय ३४, किरण नगर गल्ली नंबर २) असे मृतक तरुणाचे नाव आहे. माहितीनुसार मृतक विशाल माहोरे याला दारू आणि गांजाचे व्यसन होते. तो नेहमी दारू पिऊन असायचा किंवा गांजाचा नशा केलेल्या स्थितीत राहयचा. मंगळवारी दुपारी त्याने दारूच्या नशेमध्ये किरण नगर गल्ली नंबर २ येथील घरात आत्महत्या केली. याबद्दल त्याचा चुलत भाऊ अक्षय माहोरे (वय ३२,विद्यापीठ कॉलनी) याला माहिती मिळाल्यावर त्याने पोलिसांच्या मदतीने विशालला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. जेथे डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. या प्रकरणात अक्षय सुरेशराव माहोरे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे.

# महिलेचा मोबाईल हॅक, खात्यातून ५७ हजार काढले

## गाडगेनगर पोलिसांत गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गाडगेनगर परिसरात राहणारी एक महिला सायबर फसवणुकीची बळी ठरली आहे. ट्रॅफिक उल्लंघनाची नोटीस पाठवून मोबाईलवर एपीके फाईल डाउनलोड करण्यास भाग पाडण्यात आले. ती फाईल डाउनलोड करताच मोबाईल हॅक झाला आणि आरोपींनी तिच्या बॅंक खात्यातून तब्बल ५७ हजार ४०० रुपये ऑनलाइन काढले. या धक्कादायक घटनेनंतर गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात मोबाईल धारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. २२ ऑगस्ट रोजी महिलेच्या (पान २ वर)

# प्रा.धिरज कल्याणकर यांना पीएचडी प्रदान



**अमरावती/प्रतिनिधीः-** डॉ. राजेंद्र गोडे तंत्रज्ञान व संशोधन संस्था, अमरावती येथील कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅन्ड इंजिनिअरिंग विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रा. धिरज सं. कल्याणकर यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यापीठ, इंदौर येथून पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी डॉ. अजय रौंदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. त्यांचे संशोधन हे गतिशील वायरलेस बॉडी एरिया नेटवर्क च्या संदर्भात डेटा प्रसारण अधिक विश्वासार्ह व सुरक्षित करण्यासाठी एक नाविन्यापूर्ण अल्गोरिदम विकसित करण्यावर आधारित आहे. हे संशोधन तंत्रज्ञान क्षेत्रात उपयोगी ठरणारे आहे. प्रा. कल्याणकर यांचे ६५ शोध निबंध स्कोपस व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये, तसेच ०७ आंतरराष्ट्रीय (पान २ वर)

# साक्षगंधानंतर भावी पत्नीवर बलात्कार

## -येवदा परिसरातील धक्कादायक प्रकार -आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** येवदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. साक्षगंध झाल्यानंतर २० वर्षीय तरुणीवर तिच्याच भावी पतीने वारंवार बलात्कार केल्याचा प्रकार समोर आला आहे. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी दर्यापूर तालुक्यातील अंतरगाव येथील तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पीडिता व आरोपी यांच्यात आधीपासूनच प्रेमसंबंध होते. कुटुंबाच्या संमतीने त्यांचा साखरपुडा पार पडला होता. मात्र, यानंतर आरोपीने (पान २ वर)

## बनावट जन्म प्रमाणपत्र प्रकरणः

# ४२ जणांविरुद्ध गाडगेनगर पोलीसांची चार्जशीट दाखल




**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती तहसील कार्यालयातून बनावट जन्म प्रमाणपत्रे जारी केल्याच्या प्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी मोठी कारवाई करत अखेर ४२ जणांविरुद्ध चार्जशीट दाखल केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत असलेल्या या प्रकरणामुळे शहरात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

भाजपा नेते व माजी खासदार किरीट सोमैया यांनी सातत्याने या प्रकरणावर आवाज उठवला होता. त्यांच्या पाठपुराव्यानंतर फेब्रुवारी महिन्यात पोलिसांनी ४२ जणांविरुद्ध गुन्हा नोंदवून चौकशी सुरू केली. जवळपास पाच महिन्यांच्या तपासानंतर तहसील कार्यालयातून मिळालेल्या शेकडो कागदपत्रांची छाननी करण्यात आली. यात काहींमध्ये नावातील तफावत, विवाहापूर्वी व नंतर आडनावातील बदल किंवा स्पेलिंग चुका आढळल्या. मात्र काही दस्तऐवजांत गंभीर फेरफार आढळल्याने अखेर पोलिसांनी कारवाईचा मार्ग अवलंबला.

दरम्यान, शहरातील वरिष्ठ वकील अ‍ॅड. शोएब खान यांनी या कारवाईवर आक्षेप घेत पोलिसांवर थेट भाजपाचा दबाव असल्याचा आरोप केला. त्यांच्या मते, चार्जशीटमधील अनेक जण हे स्थानिक (पान २ वर)

# मालवाहू वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार महिलेचा मृत्यू

## गडगडेश्वर मंदिर रोडवरील दुर्दैवी घटना





**अमरावती/प्रतिनिधीः-** गडगडेश्वर मंदिर मार्गावर झालेल्या भीषण अपघातात बबीता रामचंद्र गेडाम (वय ५०) या महिलेचा मृत्यू झाला. भरधाव टाटा मालवाहू वाहनाने त्यांच्या दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेमुळे हा प्रकार घडला. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिस सुत्रानुसार, बबीता गेडाम मध्यवर्ती बॅंकेच्या भातकुली शाखेत कार्यरत होत्या. १६ सप्टेंबर रोजी (पान २ वर)

# घडा सावंगा गावात ढगफुटी, शेतकऱ्यांचे लाखोचे नुकसान

**जीवन हरणे**
**असदपुर/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील घडा सावंगा या गावी आज अचानक ढगफुटी झाल्याने हाहाकार पसरला. शेतकऱ्यांचे लाखोचे नुकसान झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेल्या दोन दिवसापासून सतत पाऊस सुरू असतानाच आज दुपारी घडा सावंगा गावासह इतर परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. अचानक दुपारी एकच्या सुमारास ढगफुटी झाल्यामुळे गावातील रोड नाल्यासह ओढ्याला पुराचे स्वरूप प्राप्त झाले. काही क्षणातच नाले तुडुंब वाहू लागल्याने शेतकऱ्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले. यामुळे उभ्या पिकांसह शेत जमीनही वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. महिमापुर, सावंगा परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे शिंगणापूर, रांजणगाव या रोडवरील वघाडी नाल्याला मोठा पूर आला. सध्या देखील रस्त्यावरून पाणी वाहत असल्याने परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. अचानक झालेल्या ढगफुटीमुळे अनेक शेतकरी शेतात अडकले असून प्रशासनाने शर्तीचे प्रयत्न करून त्यांना घरापर्यंत पोहोचवण्याचे कार्य पूर्ण केले. घडा सावंगा परिसरातील गावांना सतर्कतेचा इशारा (पान २ वर)




# खून प्रकरणात १७ वर्षांपासून फरार आरोपी अखेर जेरबंद



**अमरावती/प्रतिनिधीः-** गुन्हेगारी जगतातील अनेक आरोपी न्यायव्यवस्थेपासून दूर राहण्यासाठी आपले ठाण बदलत राहतात. मात्र, कितीही वर्षे लपून बसले तरी कायद्याच्या जाळ्यातून सुटका अशक्य आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. २००६ मध्ये घडलेल्या खून प्रकरणातील आरोपी मनोहर केशवराव खंडाते (वय ५५, रा. दुधगंगा कॉलनी, जेवड नगर, अमरावती) याला तब्बल १७ वर्षांच्या फरारीनंतर राजापेठ पोलिसांनी जेरबंद केले.

सदर आरोपीवर अप.क्र. १९७/२००६ अंतर्गत भा.दं.वि. कलम ३०२ नुसार खुनाचा गुन्हा दाखल होता. (पान २ वर)

